कृषीवल

१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | बुधवार | दि. १८ नोव्हेंबर २०२६ | अंक १६२ | पृष्ठ ८ | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

भरधाव कारच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

शिहू : नागोठणे येथील रिलायन्स इंडस्ट्रीज कंपनीच्या म टेरियल गेटसमोरील रस्त्यावर भरधाव कारने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत तरुण कामगाराचा जागीच मृत्यू झाला. मच्छिंद्र भिकाजी घासे (३९, रा. मुंढाणी, तरशेत, ता. पेण) असे मृत कामगाराचे नाव आहे. या भीषण अपघातामुळे मुंढाणी गावासह परिसरात शोककळा पसरली आहे. मच्छिंद्र घासे हे आपल्या ॲक्टिव्हा दुचाकीवरून रिलायन्स कंपनीच्या मटेरियल गेटकडे कामावर जात होते. यावेळी मार्केटिंग बिल्डिंगसमोर मागून भरधाव वेगाने आलेल्या रेनो क्विड कारने त्यांच्या •➤पान ५ वर

प्रशांत नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त शिबीर

रायगड : अलिबागचे माजी नगराध्यक्ष, विद्यमान बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवारी (दि.२१) मोफत नेत्र तपासणी, डायबेटिस, हिमोग्लोबीन व जनरल तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. लायन्स क्लब अलिबाग, लायन्स हेल्थ फाऊंडेशन यांच्या सौजन्याने शेतकरी कामगार पक्ष पुरोगामी युवक संघटना आणि प्रशांत नाईक मित्र मंडळ आयोजित हा उपक्रम सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास सुरू होणार आहे. अलिबागमधील जलसापाडा येथे शिबीर भरविले जाणार आहे. •➤पान ५ वर

वेधक

नर्सरी-केजी प्रवेशासाठी मुलाखतींना बंदी

मुंबई : नर्सरी आणि केजी प्रवेशासाठी मुलांच्या मुलाखती, लेखी किंवा तोंडी परीक्षा घेण्यास तसेच पालकांकडून देणगी किंवा अतिरिक्त शुल्क मागण्यास राज्य सरकारने बंदी घातली आहे. प्रवेशप्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी प्राथमिक शिक्षण संचालनालयाने खासगी शाळांसाठी चार पानी नियमावली (एसओपी) तयार केली आहे. पुण्यातील शाळांमधील अनियमिततेविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने केलेल्या पाठपुराव्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. २०२७-२८ पासून नर्सरीसाठी तीन, ज्युनिअर केजीसाठी चार, सिनिअर केजीसाठी पाच आणि पहिलीसाठी सहा वर्षे वयोमर्यादा निश्चित केली आहे.

लाचखोर बंदर अधिकारी जाळ्यात

रत्नागिरी : लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रत्नागिरीत मोठी कारवाई करत वर्ग एकच्या बंदर अधिकाऱ्याला ६० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. या कारवाईमुळे बंदर विभागासह प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. राज्यात लाचखोर अधिकाऱ्यांविरोधात एसीबीने कारवाईचा धडाका सुरू ठेवला असून, गेल्या काही दिवसांत मुंबईतील वरळी येथील ईएसआयसी कार्यालयातील लेखा अधिकारी तथा सहायक संचालक जितेंद्र साखरकर यालाही ५० हजार रुपयांची लाच घेताना अटक करण्यात आली होती. प्रलंबित वैद्यकीय उपकरणांच्या बिलासाठी त्याने ७ लाख ५० हजार रुपयांची मागणी केल्याचा आरोप होता.

लहान मुलांना लिफ्ट वापरण्यास बंदी

मुंबई : लिफ्ट आणि एस्कलेटरमधील दुर्घटना रोखून लहान मुलांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. 'महाराष्ट्र लिफ्ट, एस्कलेटर अँड मुव्हिंग वॉक २०२६' या नियमावलीनुसार १२ वर्षांखालील मुलांना पालक किंवा जबाबदार प्रौढ व्यक्तीशिवाय लिफ्ट आणि एस्कलेटरचा वापर करता येणार नाही. या नियमाची अंमलबजावणी १ नोव्हेंबरपासून सुरू झाली आहे. याशिवाय लिफ्टची नियमित तपासणी, वर्षातून एकदा सुरक्षा ऑडिट करणे बंधनकारक करण्यात आले आहे. लिफ्ट अपघाताची माहिती २४ तासांच्या आत देणेही आवश्यक असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यवस्थापनाला जबाबदार धरले जाणार आहे.

कर्जतचं नेपाळ होणार!



नेरळ | संतोष पेरणे |

एका बाजूला सह्याद्रीचे डोंगर फोडायचे, दुसऱ्या बाजूला मोठमोठी धरणे उभारायची आणि डोंगरांच्या पायथ्याशी वसलेल्या कर्जतला संभाव्य संकटाच्या छायेत ढकलायचे, अशी परिस्थिती निर्माण होत आहे. टोरंटच्या दोन धरणांसह शिलार, पोशीर, टाटा आणि कोंढाणे अशा विविध धरण प्रकल्पांचा विळखा कर्जत तालुक्याला पडत आहे. डोंगरांमधील ब्लास्टिंग, धरणांमधील प्रचंड पाणीसाठा आणि कर्जतची सखल भौगोलिक रचना लक्षात घेता भविष्यात नेपाळ किंवा केदारनाथसारख्या •➤पान ५ वर

पर्यावरणप्रेमींकडून चिंता व्यक्त

कर्जत तालुक्यात एकापाठोपाठ एक धरण प्रकल्प प्रस्तावित होत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. धरणांच्या उभारणीसाठी मोठ्या प्रमाणात डोंगर फोडले जाणार आहेत, ब्लास्टिंग आणि मोठ्या प्रमाणातील पाणीसाठा यांचा परिसराच्या नैसर्गिक रचनेवर काय परिणाम होणार, याचा सखोल अभ्यास झाल्याशिवाय प्रकल्पांना मंजुरी देऊ नये, अशी मागणी पर्यावरणप्रेमींकडून होत आहे.

आपत्ती व्यवस्थापनाचा आराखडा कुठे?

धरण परिसरात भूकंप, अतिवृष्टी किंवा धरणफुटीसारखी आपत्ती उद्भवल्यास कर्जत शहर आणि पायथ्याशी असलेल्या गावांचे संरक्षण कसे करणार, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. संभाव्य पूरपेषा, सुरक्षित स्थलांतराचे मार्ग, आपत्कालीन यंत्रणा आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी ठोस आराखडा तयार करावा, अन्यथा विकासाच्या नावाखाली संपूर्ण तालुक्याची सुरक्षितता धोक्यात येऊ शकते.

डॉ. शीतल जोशींचे पद धोक्यात!

- **अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक ऐवजी मूळ पदावर परतण्याचे आदेश**

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालयातील अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी यांचे पद धोक्यात आले आहे. त्यांना अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सकपदावरून हटवून शरीर विकृतीशास्त्रज्ञ या मूळ पदावर काम करण्याचे आदेश सार्वजनिक आरोग्य विभागाने दिले आहेत. मात्र, आदेश देऊन दोन महिने उलटूनही त्यांची कार्यमुक्ती झालेली नाही. त्यामुळे आरोग्य विभागाच्या आदेशालाच रुग्णालय प्रशासनाकडून हरताळ फासला जात आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

अलिबाग येथे अडीचशे खाटांचे जिल्हा सामान्य रुग्णालय आहे. या रुग्णालयात गेल्या तीन वर्षांपासून पूर्णवेळ अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक नव्हते. त्यामुळे वेळोवेळी अन्य डॉक्टरांकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला. डॉ. शीतल जोशी गेल्या दीड वर्षापासून अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सकपदाचा कार्यभार सांभाळत होत्या. काही महिन्यांपूर्वी त्यांची पूर्णवेळ अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, आता त्यांचे हे पदच •➤पान ५ वर

> अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सकांना त्यांच्या मूळ पदावर पाठविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र, सध्या त्यांच्या जागी दुसरे कोणीही अधिकारी आलेले नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडेच ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.
>
> **– डॉ. निशिकांत पाटील,**
> जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड

चिमुकल्याच्या मृत्यूप्रकरणी शेकाप आक्रमक

- **ठेकेदारासह प्रशासनावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा**
- **कुटुंबाला तात्काळ आर्थिक मदत व पर्यायी रस्त्याची मागणी**
- **सुरेश घरत यांचा तीव्र आंदोलनाचा इशारा**



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

बेलकडे-कुरुळ रस्त्याच्या कामातील नियोजनशून्य कारभाराने एका दोन वर्षांच्या चिमुकल्याचा बळी घेतला. पर्यायी रस्त्याची व्यवस्था न करता सुरू केलेल्या कामामुळे निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीत आरांश ठाकूर या बालकाला वेळेत उपचार मिळू शकले नाहीत आणि त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या मृत्यूला ठेकेदार आणि प्रशासनाचा निष्काळजीपणा जबाबदार असून, संबंधितांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी आक्रमक मागणी शेकापचे तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी केली आहे. बालकाच्या कुटुंबियांना आर्थिक मदत द्यावी आणि तातडीने पर्यायी रस्त्याची व्यवस्था करावी; अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

अलिबाग-रोहा मार्गावरील बेलकडे ते कुरुळदरम्यानच्या अपूर्ण रस्त्याचे काम एम एसआयडीसीमार्फत सुरू आहे. दिवाळीपूर्वी काम •➤पान ५ वर

चरी संपाचा वर्धापन दिन होणार भव्यदिव्य

शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांची माहिती

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी लढा देणारे स्व. नारायण नागू पाटील यांच्या नेतृत्वाखाली चरी या ठिकाणी संप पुकारण्यात आला होता. या संपाचा ९३ वा वर्धापन दिन शुक्रवारी (दि.२७) साजरा होणार आहे. संपातील शेतकऱ्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी हा सोहळा एक वेगळ्या पद्धतीने होणार आहे. शेकाप नेते जयंत पाटील यांच्यासह दिग्गज मंडळींच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा होणार असून, या ऐतिहासिक संपाचे महत्त्व व त्याचा इतिहास आजच्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न राहणार असल्याची माहिती शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी दिली.



स्मारकाच्या जागेसाठी सहा महिन्यांचा अल्टिमेटम

चरी येथे शेतकऱ्यांनी एकत्र येत सावकारांविरोधात लढा पुकारला. १९३२ पासून सुरु झालेला हा संप १९३९ ला संपला. तब्बल सात वर्षे अन्नाचा एकही कण न पिकवता हा संप पुकारला होता. या संपात चरी परिसरातील १४ गावे सहभागी झाली होती. साधारपणे ७६७ एकर जमीन पिकविण्याचे थांबले होते. अलिबाग तालुक्यातील केंद्रबिंदू असलेल्या चरीच्या संपाने संपूर्ण देशातील शेतकऱ्यांना त्यांचा हक्क मिळवून दिला. चरी येथे स्मारक उभारले जाणार आहे; परंतु, जागेचा प्रश्न प्रलंबित आहे. सरकारसह प्रशासनाला सहा महिन्यांचा अल्टिमेटम दिला जात आहे. सहा महिन्यांत जागेचा प्रश्न सोडविण्यात यावा, अन्यथा यासाठी रस्त्यावर उतरु, असा इशारा चित्रलेखा पाटील यांनी दिला.

यावेळी शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, गोरखनाथ पाटील, रवींद्र पाटील, प्रशांत पाटील, मंगेश पाटील, किरण पाटील, प्रा. डॉ. पराग पाटील, अभिषेक पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

सावकारांच्या मगरमिठीत सापडलेल्या शेतकऱ्यांना जागे करण्याचे काम स्व. नारायण नागू पाटील तसेच भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. कसेल त्याची जमीन हा कुळ कायदा या संपामुळे संमत झाला. नारायण नागू पाटील यांच्या प्रभावशाली नेतृत्वास अभिवादन करण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या संघर्षाच्या स्मृतींना उजाळा •➤पान ५ वर

न्यायालयीन कर्मचारी रस्त्यावर!



- **'समान काम, समान वेतन'साठी बेमुदत संप**
- **सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचेही अन्नत्याग साखळी उपोषण**

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

'समान काम, समान वेतन' या मागणीसाठी रायगड जिल्ह्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी शासनाविरोधात आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. अलिबाग जिल्हा न्यायालयासमोर मंगळवारी (दि. १७) शेकडो कर्मचारी ठिय्या देऊन बसले असून, बेमुदत संप पुकारण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील न्यायालयीन कामकाजाला फटका बसला असून, अनेक कामे ठप्प झाली आहेत. दरम्यान, या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनीही जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अन्नत्याग साखळी उपोषण सुरू केले आहे.

महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या निर्देशानुसार सफाई कामगारांपासून प्रबंधकांपर्यंत सर्व स्तरांतील साडेपाचशेहून अधिक कर्मचारी या संपात सहभागी झाले आहेत. कामाच्या स्वरूपानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, वेतनातील तफावत दूर करावी आणि 'समान काम, समान वेतन' •➤पान ५ वर

दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना शुल्कमाफीचा ठेंगा!

- **जाचक अटींचा सरकारी फास**
- **श्रीवर्धनमधील गरजू विद्यार्थी सवलतीपासून वंचित राहण्याची भीती**
- **शासनाच्या दुटप्पी धोरणावर संताप**

| श्रीवर्धन | समीर रिसबूड |

दुष्काळ जाहीर करून मदतीचा गाजावाजा करायचा आणि प्रत्यक्ष लाभ देण्याची वेळ आली की जाचक अटींचे कुंपण उभे करायचे, असा प्रकार श्रीवर्धन तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या बाबतीत घडत आहे. शासनाने परीक्षा शुल्कमाफीची घोषणा करून दिलासा दिल्याचा आव आणला असला, तरी कडक निकषांमुळे अनेक गरजू विद्यार्थी या सवलतीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाच्या निर्णयावर पालक आणि विद्यार्थ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार, राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांतील अडीच लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला असून, दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचेही परीक्षा शुल्क माफ करण्यात आले आहे. मात्र, श्रीवर्धन तालुक्यातील नेमक्या किती विद्यार्थ्यांना या सवलतीचा लाभ मिळाला, याची अधिकृत आकडेवारी स्थानिक प्रशासनाने अद्याप जाहीर केलेली नाही. प्रशासनाची ही उदासीनता संशयाला वाव देणारी आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने ३ नोव्हेंबर रोजी काढलेल्या शासन निर्णयातील अटींनी या सवलतीचा मूळ उद्देशच निष्प्रभ केला आहे. नोकरी किंवा व्यवसायानिमित्त पालक शहरात वास्तव्यास असले, मात्र गावाकडे त्यांच्या नावावर शेतजमीन असली, तर त्यांच्या पाल्यांना शुल्कमाफीसाठी अपात्र ठरवण्यात आले आहे. श्रीवर्धन तालुक्यातील अनेक कुटुंबे रोजगारासाठी मुंबई आणि पुण्यात स्थलांतरित झाली आहेत. त्यामुळे या अटीचा फटका नेमक्या गरजू विद्यार्थ्यांनाच बसण्याची शक्यता आहे.

एवढेच नव्हे, तर बहिःस्थ (External) आणि पुनर्परीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांनाही योजनेतून वगळण्यात आले आहे. महाडीबीटी पोर्टलवरील माहिती आणि सातबारा •➤पान ५ वर

टोकेखार-तुरुंबाडी पुलाविरोधात

मच्छिमार आक्रमक

- **अटल सेतूप्रमाणे मोबदल्याची मागणी**
- **विजय गिदींचा आंदोलनाचा इशारा**

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

प्रस्तावित टोकेखार-तुरुंबाडी पुलामुळे राजपुरी खाडीवर अवलंबून असलेल्या हजारो मच्छिमारांच्या उदरनिर्वाहावर गंडांतर येण्याची भीती निर्माण झाली आहे. मच्छिमारांना विश्वासात न घेता प्रकल्पाचे भूमीपूजन केल्याने संतापलेल्या मच्छिमारांनी आता आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. अटल सेतूप्रमाणे प्रत्येक कुटुंबाला मोबदला द्यावा, अशी मागणी श्री महालक्ष्मी मच्छिमार विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे चेअरमन विजय गिदी यांनी केली आहे. येत्या १५ दिवसांत योग्य कार्यवाही न झाल्यास सागरी आंदोलन छेडण्याचा, तसेच पुलासाठी एकही दगड लावू न देण्याचा इशारा त्यांनी हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कंपनीच्या प्रोजेक्ट मॅनेजरला निवेदनाद्वारे दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुरूड तालुक्यातील राजपुरी येथे श्री महालक्ष्मी मच्छिमार विविध कार्यकारी सहकारी सोसायटी असून, या संस्थेचे १ हजार १५१ सभासद आहेत. संस्थेच्या ११५ यंत्रचलित नौकांच्या माध्यमातून स्थानिक मच्छिमार अनेक पिढ्यांपासून राजपुरी •➤पान ५ वर

शेतशिवारात जोरदार लगबग | वर्षभराच्या मेहनतीचे फळ पदरात पडल्याने शेतकरी सुखावला

जिल्ह्यात भातझोडणीला वेग



| खांदेश्वर | प्रतिनिधी |

वर्षभर काळ्या मातीत घाम गाळला, पावसाच्या प्रत्येक सरीसोबत पिकाची काळजी घेतली आणि आता हातात आलेल्या पिवळ्याधमक भाताच्या कणसांनी शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हसू फुलवले आहे. काळ्या मातीतून पिवळे सोने पिकविणाऱ्या बळीराजाच्या कष्टाचे फळ आता घराघरांत दाखल होऊ लागले आहे. दिवाळीपासून पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागात भातकापणी आणि झोडणीच्या कामांना वेग आला असून, शेतशिवार पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या लगबगीने गजबजले आहे.

पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागात भातशेती हा अनेक शेतकरी कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रमुख आधार आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच नांगरणी, चिखलणी, भातलावणी आणि पिकाची निगा राखण्याची कामे शेतकऱ्यांनी मोठ्या मेहनतीने पूर्ण केली. यंदा मोठ्या प्रमाणावर झालेल्या पावसामुळे भातपिकाला चांगला आधार मिळाला. त्यामुळे शेतशिवारात डोलणारी भाताची पिवळीधमक कणसे पाहून शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या. ऑक्टोबर महिन्यातील उन्हाचा फायदा घेत शेतकऱ्यांनी भातकापणीला सुरुवात केली. कापलेले भात वाळवून त्याची झोडणी करण्याची लगबग आता गावागावांत सुरू आहे. दिवाळीच्या सणासोबतच शेतातही कष्टाच्या फळाचा आनंद साजरा होताना दिसत आहे. घरातील पुरुष मंडळींबरोबरच महिलावर्गही भात गोळा करणे, वाळवणे आणि झोडणीच्या कामात उत्साहाने सहभागी होत आहे. •➤पान ५ वर

पंतप्रधानांच्या दौऱ्यासाठी रस्ता उखडला

- **खड्डेमय रस्ता सोडून प्रशासनाची दुरुस्तीकेडे पाठ**
- **सावळे ग्रामस्थांचा संताप अनावर**





| नेरळ | प्रतिनिधी |

पंतप्रधान येणार म्हणून सुस्थितीत असलेला रस्ता खोदला; मात्र दौरा रद्द होताच ग्रामस्थांना त्याच खड्डेमय रस्त्यावर सोडून प्रशासनाने हात वर केले आहेत. कर्जत तालुक्यातील सावळे ग्राम स्थांना या मनमानीचा मोठा फटका बसत असून, रस्ता दुरुस्तीच्या म ागणीसाठी ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. सावळे फाटा ते कमान या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अन्यथा लाखाची वाडी येथील जमीन सपाटीकरणाचे काम सुरू करू देणार नाही, असा पवित्रा घेत ग्रामस्थांनी काम बंद पाडले.

कर्जत तालुक्यातील टोरंट वीज प्रकल्पाच्या •➤पान ५ वर

> आमची मागणी साधी आहे. सावळे फाटा ते कमान हा रस्ता तयार करून द्यावा. त्यानंतरच लाखाची वाडी येथील सपाटीकरणाचे काम सुरू करावे. आम्हाला कायदा हातात घ्यायचा नाही; मात्र आमच्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्षही सहन करणार नाही.
>
> **– बाजीराव दळवी,** ग्रामस्थ

बांगलादेशी चोरांकडून दागिन्यांसह विदेशी डॉलर्स जप्त

■ आंतरराष्ट्रीय टोळीचा वसई पोलिसांकडून पर्दाफाश

पालघर : वसई पश्चिमेतील गिरीज येथे एका वृद्धेच्या घरात भरदिवसा घरफोडी करून लाखोंचा मुद्देमाल लंपास करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीचा वसई पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. माहीम कॉजवे परिसरातून दोन बांगलादेशी घुसखोर चोरट्यांसह चोरीचे सोने खरेदी करणाऱ्या साथीदाराला अटक केली. वसई पश्चिमेकडील गिरीज, सादोडावाडी येथील 'मॅथ्यू स्मृती' बंगल्यात राहणाऱ्या जोस्पीन मॅथ्यू मार्टिन (६७) या वृद्ध महिला घराबाहेर गेल्या असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराच्या मुख्य दरवाजाचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला. कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड असा सुमारे ३ लाख ४५ हजार रुपयांचा ऐवज लंपास करून चोरटे पसार झाले होते. याप्रकरणी वसई पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला होता. पोलिसांनी सापळा रचून मोहम्मद निजाम मोहम्मद तासीर शेख (४४) आणि जहांगीर शुकरअली शेख (४०) या दोघांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान दोघांनी घरफोडीची कबुली दिली. हे दोघेही पश्चिम बंगालच्या २४ परगणा जिल्ह्याचे बनावट पत्ते सांगत असले तरी, ते मूळचे बांगलादेशातील घुसखोर असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. मुख्य आरोपी मोहम्मद निजाम याच्यावर यापूर्वी तब्बल ७ गंभीर गुन्हे, तर जहांगीरवर १ गुन्हा दाखल आहे. चोरीचा माल त्यांनी माहीम येथील दत्तात्रय कोळी (५२, व्यवसाय इलेक्ट्रिशियन) याला विकल्याचे सांगितले. पोलिसांनी दत्तात्रयलाही अटक केली असून, त्यांच्याकडून सोन्या-चांदीचे दागिने, रोकड आणि विदेशी अमेरिकन डॉलर्स असा ६ लाख ६८ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई
MAHARASHTRA STATE AIDS CONTROL SOCIETY
जाहिरात
अशासकीय संस्था (NGO, CBO) **यांच्याकडून काळजी आधार केंद्र चालविण्यासाठी अर्ज मागविण्याबाबत**

राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमांतर्गत काळजी आधार केंद्र (Care and Support Centre) चालविण्यासाठी पात्र अशासकीय संस्था (NGO)/समुदाय आधारित संस्था (CBO) यांच्याकडून खालील जिल्ह्यांसाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. जिल्हे : ठाणे, पुणे, चंद्रपूर, नागपूर, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, जळगाव, अकोला, बीड व रायगड.

अर्जाचा विहित नमुना महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर www.mahasacs.org उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. इच्छुक व पात्र NGO/CBO यांनी सदर अर्जाचा नमुना संकेतस्थळावरून डाउनलोड करून आवश्यक कागदपत्रांसह पूर्णपणे भरलेला अर्ज विहित कालावधीत सादर करावा.

अर्ज सादर करण्याची अंतिम दिनांक : १० डिसेंबर २०२६

लिफाफ्यावर : ''काळजी आधार केंद्र, जिल्हा----- साठी अर्ज'' असा स्पष्ट उल्लेख करावा.

अर्ज आवश्यक कागदपत्रांसह विहित कालावधीत खालील पत्त्यावर स्पीड पोस्ट/खाजगी कुरिअर/प्रत्यक्ष सादर करावेत:

प्रकल्प संचालक,
महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था,
आर. ए. किडवाई मार्ग,
लेप्रसी हॉस्पिटल कंपाऊंड, वडाळा,
मुंबई - ४०००३१.

उशिरा प्राप्त झालेले अर्ज, अपूर्ण अर्ज अथवा आवश्यक कागदपत्रे जोडलेले नसलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

प्रकल्प संचालक
महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे कोंदीवडे, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक १. प्रभाकर एच दाभणे २. रोहिदास एच दाभणे ३. समाधान एच दाभणे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे.आर.पॉ	आकार रु.पै.
२	४/ब	०-२३-८०	३-८७

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १८/११/२०२६

ॲड. समीर आर.सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्हयू बिल्डींग,
तळमजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर,
कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड मो.नं ९१५८३१३७३३

जाहीर सूचना

याद्वारे सर्व संबंधितांना सूचना देण्यात येते की, आम्ही, आमच्या अशिलांच्या वतीने, **१) रजनीश नारायण बर्वे** आणि २) **स्वाती रजनीश बर्वे,** दोघेही राहणार : बी-३५०३, इम्पेरियल हाइट्स बेस्ट कॉलनी, अग्निशमन दलाजवळ, मोतीलाल नगर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई - ४००१०४ यांच्या खालील **परिशिष्टामध्ये** अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या आणि मौजे चोंढी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील सर्व (१) गट क्र. ४६ आणि ४४, एकूण क्षेत्रफळ ७,९४० चौरस मीटरची शेतजमीन, आणि (२) गट क्र. ४५, क्षेत्रफळ ८०९ चौरस मीटरची अकृषिक जमीन यांचा समावेश असणाऱ्या एकूण क्षेत्रफळ ८,७४९ चौरस मीटर जमिनीच्या (एकत्रितपणे ''**जमीन**'') संबंधातील मालकी अधिकार, हक्क आणि हितसंबंधांची चौकशी करीत आहोत.

सर्व व्यक्तींनी/संस्थांनी सदर जमिनीमध्ये किंवा त्यातील कोणत्याही भागामध्ये किंवा त्या संबंधातील कोणत्याही स्वरूपाचा कोणताही करारनामा, करार, भाडे, अनुज्ञप्ती, विक्री, गहाण, धारणाधिकार, आकार, निर्गम, बक्षिस, विकासाधिकार, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, भाडेपट्ट्याखालील, अभिहस्तांकन, वारसा, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, अदलाबदल, भाडेदारी, कब्जा, सुविधाधिकार, मार्गाधिकार, भागिदारी, न्यास, कुटुंब व्यवस्था/तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, प्रसंविदा किंवा अट, परिरक्षा, भार किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही शेअर, अधिकार, हक्क, दावा, लाभ, मागणी किंवा हितसंबंध असेल तर त्यांनी निम्नस्वाक्षरीकर्त्यांना या जाहिरातीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत त्यास पाठींबा देणाऱ्या दस्तऐवजांसह लेखी स्वरूपामध्ये ज्ञात होण्यासाठी कळविणे आवश्यक आहे. याद्वारे लेखी स्वरूपामध्ये न केलेला कोणताही दावा दुर्लक्षित केला जाईल आणि त्यांचा अधित्याग आणि/किंवा परित्याग करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल आणि ते बंधनकारक असणार नाही.

परिशिष्ट
(जमिनीचे वर्णन)

अनु. क्र.	गट क्र.	मालक	एकूण क्षेत्रफळ (चौरस मीटरमध्ये)
१.	४४	१) रजनीश नारायण बर्वे आणि २) स्वाती रजनीश बर्वे	७,७४०
२.	४५		८०९
३.	४६		२००
एकूण			८,७४९

सर्व मौजे चोंढी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील आहेत.

आज दिनांक : १८ नोव्हेंबर, २०२६

मोनिका भोसले
भागिदार
ट्रायलिगल
७वा मजला, टॉवर २ए, वन वर्ल्ड सेंटर,
सेनापती बापट मार्ग,
लोअर परेल (पश्चिम), मुंबई ४०००१३
ईमेल : monika.bhonsale@trilegal.com
varun.shah@trilegal.com

पनवेल महानगरपालिका, पनवेल
जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/
प्र.क्र.१४/३८५/१/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :-१३/११/२०२६

पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना पुरवणी कार्यसूची

प्रति,
श्री./श्रीमती.
मा.सदस्य/सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.
महोदय/महोदया,

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा क्र.१४, गुरुवार दिनांक १९/११/२०२६ रोजी, सकाळी ११:०० वाजता, महापालिकेच्या ''आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल'' येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

सर्वसाधारण सभा क्रमांक १४, दिनांक १९/११/२०२६ ची पुरवणी कार्यसूची विषयपत्रिका

४. मा.आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :
(मुळ विषयपत्रिकेत अ.क्र.१ ते १३ विषय समाविष्ट आहेत.)

१४. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ड, प्रभाग क्र.१४ नवीन मुख्यालयासमोर संविधान स्तंभ उभारणे. या कामास प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत.
(मा.महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये)

सही/-
नानासाहेब कामठे
महापालिका सचिव
पनवेल महानगरपालिका

महापालिका भवन, पनवेल
दिनांक :- १३/११/२०२६.
सोबत :- विषयांचे गोषवारे.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक किरण बळीराम पाटील यांच्या मालकीची मिळकत त्यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पैसे)
तळाशेत ता.अलिबाग	२२	०-६१-५० पो.ख ०-०३-७० एकुण ०-६५-२०	११.०८

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी किरण बळीराम पाटील यांच्या हिश्याचे क्षेत्र ०-४५-५० हे.आर., पो.ख. ०-०३-७० हे.आर, एकुण क्षेत्र ०-४९-२० हे. आर. आकार ११.०८ रु. पै. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-२०-१० हे.आर. ही मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ (सात) दिवसांचे मुदतीत खालिल सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरच्या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

ॲड.मानस सुधाकर पाटील
मु.आंबेघर, पो.पोयनाड
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबा. नं. ७७४३८०९६५३

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल श्री.अलोक मलीक यांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत त्याचे मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

मौजे पोखरकरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकांचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रू. पै.
१) श्री. कुणाल सीतल अहुजा २) श्री. विजय रमेश जसुजा ३) श्री. राजकुमार पमनदास शेवानी ४) श्री. रिंकु राजकुमार शेवानी	१८	१/क	०-७४-४३ पैकी खरेदी दिलेले क्षेत्र ०-४२-७१	०-५१

सदरील जमीन मिळकती या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती तद्भुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरील मिळकतींमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास त्यांनी सोडुन दिलेला आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : नेरळ
दि. १८/११/२०२६

खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट
सही/-
ॲड. साकीब अशरफ पानसरे
ऑफीस - शॉप नं. ३८, पहीला मजला, बी-विंग,
तुलसी सेंटर पॉईंट, रेल्वे स्टेशन जवळ, खांडा, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१
मो. ८०८७७७०५२५/९०११५००२३५

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे आंभेरपाडा ता. कर्जत जि. रायगड येथील खाली सविस्तर वर्णन केलेली शेतजमीन आमचे अशिलांनी गाव नमुना नं.७/१२ चे उताऱ्यावरील भोगवटादार श्रीमती. वैशाली अजय ठाणेकर यांच्या मालकीचे अविभाजीत क्षेत्र त्यांचेकडून कायम खरेदीखतांन्वये खरेदी करण्याचे ठरविले आहे.

शेतजमिनीचे वर्णन

मौजे - आंभेरपाडा ता. कर्जत जि. रायगड

गट/ हिस्सा नं.	भुधारणा पद्धती	क्षेत्रफळ (हे.आर.)	आकार रु.पै.
३९/१/क	२	०-८१-०० पोट खराब ०-०३-०० एकूण क्षेत्र ०-८४-०० पैकी खरेदी देणार यांचे अविभाजीत हिस्स्याचे क्षेत्र ०-३६-००	३-६५ १-६२

सदरहू शेतजमीन वर नमूद भोगवटादारांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारेचा हक्क-हितसंबंध, कुळवहिवाट, ताबेकब्जा,बोजा, सामंजस्य करार, साठेकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, खरेदीखत, विकसन करार, विकसनापूर्वी सामंजस्य करार, विकसनाचे कुलमुखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाण, दान, बक्षीस, लीज, लिन ,पोटगी हक्क, कुळ हक्क, रस्त्याची वहिवाट, दिवाणी दावा, अपील अथवा तत्सम प्रकरण, लिस पेंडन्स नोटिस अथवा सदरहू मिळकतीत अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत योग्य त्या नोटरी पब्लिक यांचे कडून प्रमाणित केलेल्या सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास, सदरहू मिळकत निर्वेध, निर्विवाद व बोजारहित आहे आणि वर नमूद भोगवटादारांचे मालकी हक्क स्वच्छ व निर्विवाद आहे व आमच्या अशिलाचे लाभातील प्रस्तावित खरेदीखतास कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरून, आमचे अशिल वर नमूद भोगवटादारांबरोबर खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत कृपया याची नोंद घ्यावी
दिनांक : १७/११/२०२६

कार्यालयीन पत्ता
११ वा मजला, जेएम प्राईम इन्फाटेक,
द लँडमार्क बिल्डिंग, सेक्टर ७, खारघर-४१०२१०

ॲड.सिद्धाराम ल.शिवशरण
एल.एल.बी.
ॲडव्होकेट हायकोर्ट
मोबाईल नंबर ८१०८८७१८७६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक १) अनुभा आकाश दिक्षीत २) आकाश विजय दिक्षीत यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

मौजे कोठींबे तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

मालकाचे नाव	भूमापन क्रं व उपविभाग / सर्व्हे नं/हिस्सा नं	क्षेत्र (आर.चौ.मी)	आकार (रू.पै.)
१) अनुभा आकाश दिक्षीत २) आकाश विजय दिक्षीत	९०/ब/२३	२-१०-००	२१-००

या मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाणापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि तसेच त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतील जाणार नाही.

ता. १८/११/२०२६

खरेदीदारातर्फे वकील
ॲड वृषाली रघुनाथ मोरे (भोईर) मोबा.९३७१४०२९९९
ऑफीस पत्ता : प्रशाकीय भवन कर्जतसमोर गाळा नं
कर्जत ता कर्जत, जि. रायगड ४१०२०१

जाहीर नोटीस

Date: १७.११.२०२६

सर्वांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळिवणेत येते की, आमचे पक्षकारांनी खालील वर्णन केलेल्या जमिनी खरेदी करणेचे ठरविले आहे. सदर जमिनींचे वर्णन खालीलप्रमाणे-

मौजे कोठींबे- ता. कर्जत, जि.रायगड येथील जमिनींचे वर्णन

मालकाचे नांव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.	आकार रु. पै.
१) जनार्दन भिका पादीर २) मनोहर भिका पादीर ३) नंदू भिका पादीर ४)दत्तात्र्य भिका पादीर ५) मोरू भिका पादीर --,,--	३३ ३३	२ ५	०.५३ ०.१५	०=२० ०=०५

तरी सदर जमिनीसंबंधी इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा साठेकरार, ताबा कबजा, बोजा, चार्ज कुळ वहिवाट, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, भाडेपट्टा वगैरे हक्कहितसंबंध असल्यास त्यासंबंधी संबधीतानी सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खालील सही करणार यांजकडे कळवावी. वरील मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.
दिनांक : १७/११/२०२६
कर्जत -रायगड
Mob.९७३०८३३०४०

सही/-
श्री. मोतीलाल जिवराज ओसवाल
ॲडव्होकेट व नोटरी
मु.पो.ता. कर्जत
महावीरपेठ जि.रायगड

श्रीवर्धन नगर परिषद, जिल्हा रायगड
जा.क्र.: श्रीनप/बांध/कात-२/१३७५/२०२६-२७ दिनांक: १३/११/२०२६

जाहिर दरपत्रक सूचना क्र. १५/२०२६-२६
(कमी कालावधीची दरपत्रक सूचना)

श्रीवर्धन नगर परिषद हद्दीतील 'श्रीवर्धन शहरामध्ये महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याजवळील उद्यान विकसित करणे.' या कामाचे अंदाजपत्रक तयार करणेचे कामी आर.सी.सी. डेकोरेटिव्ह बॅलस्टर व पेशवेकालीन स्थापत्यशैलीतील जी.आर.सी. डेकोरेटिव्ह ब्रेकेट पुरविणे व बसविणे या खालीलप्रमाणे बाबींसाठी इच्छुक पुरवठादार/कंत्राटदार यांच्याकडून सीलबंद लिफाफ्यात कोटेशन/दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

कामाचे नाव :- श्रीवर्धन शहरामध्ये महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याजवळील उद्यान विकसित करणे.

Item No	Descrpition of Item	Unit	Quantity
Fair-1	Providing, manufacturing, casting, finishing, transporting and installing a bronze bust statue of Krantisurya Mahatma Jyotirao Phule, having an overall height of 963 mm, as indicated in the attached drawing, including traditional turban (Pagadi), moustache, facial features, traditional attire and ornamental details, strictly matching the approved reference photograph and sculpture model. The statue shall be manufactured using the lost-wax (investment casting) process, with high-quality silicon bronze alloy conforming to IS 28 or an approved equivalent suitable for outdoor sculpture, with a minimum average bronze shell thickness of 6-8 mm. The work shall include preparation of clay sculpture, mould making, wax modelling, bronze casting, welding, chasing, grinding, hand finishing, application of approved antique dark bronze patina, protective outdoor-grade clear coating, internal stainless- steel reinforcement wherever required, and stainless-steel anchor bolts for secure fixing to the granite pedestal. The complete statue shall be finished to accurately represent the approved facial expression, proportions and historical appearance, including all materials, labour, equipment, transportation, lifting, installation and finishing, complete as directed by the Architect/Engineer-in-Charge.	Nos	1.00
Fair-2	Providing, manufacturing, casting, finishing, transporting and installing a bronze bust statue of Dnyanjyoti Savitribai Phule, with height and proportions as indicated in the approved drawing, including traditional Maharashtrian saree with head covering (Pallu), facial features, traditional ornaments and detailed drapery folds, strictly matching the approved reference photograph and sculpture model. The statue shall be manufactured using the lost-wax (investment casting) process, with high quality silicon bronze alloy conforming to IS 28 or an approved equivalent suitable for outdoor sculpture, with a minimum average bronze shell thickness of 6-8mm. The work shall include preparation of clay sculpture, mould making, wax modelling, bronze casting, welding, chasing, grinding hand finishing, application of approved antique dark bronze patina, protective outdoor-grade clear coating, internal stainless-steel reinforcement wherever required, and stainless-steel anchor bolts for secure fixing to the granite pedestal. The complete statue shall be finished to accurately represent the approved facial expression, proportions and historical appearance, including all materials, labour, equipment, transportation, lifting, installation and finishing, complete as directed by the Architect/Engineer-in-Charge.	Nos	1.00

अटी व शर्ती :-

१. उपरोक्त कामासाठी इच्छुक पुरवठादार/कंत्राटदार यांनी स्वतःच्या फर्मच्या लेटरहेडवर अथवा कोटेशन रिसीटवर दरपत्रक सादर करावे. कोटेशन नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून दिनांक २३/११/२०२६ रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत सीलबंद लिफाफ्यात नगर परिषदेच्या आवक विभागात दरपत्रक सादर करणे आवश्यक राहील.
२. संबंधित कामाच्या ठिकाणाची प्रत्यक्ष पाहणी करून कामाचे स्वरूप, विद्यमान परिस्थिती, आवश्यक साहित्य व इतर बाबींची माहिती घेऊनच कोटेशन/दरपत्रक सादर करणे आवश्यक राहील.
३. विहित कोटेशन दोन स्वतंत्र सीलबंद लिफाफ्यांमध्ये सादर करणे आवश्यक राहील. लिफाफा क्र. १ मध्ये पुरवठादार/कंत्राटदार नोंदणीपत्रक, जीएसटी व ईपीएफ नोंदणीपत्रक आणि मागील आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र अथवा पॅनकार्ड सादर करावीत.
४. लिफाफा क्र. २ मध्ये स्वच्छ अक्षरात, खाडाखोड न करता, कोणत्याही अतिरिक्त अटी व शर्ती नमूद न करता, वरील कामांचे दर अंकात व अक्षरी स्पष्टपणे नमूद करून स्वाक्षरी व शिक्क्यासह दरपत्रक सादर करावे.
५. वरील सर्व आवश्यक कागदपत्रे लिफाफा क्र. १ मध्ये सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा संबंधित कोटेशन अपात्र ठरविण्यात येईल व लिफाफा क्र. २ उघडण्यात येणार नाही.
६. प्राप्त झालेली कोटेशन/दरपत्रके शक्यतो दिनांक २२/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता इच्छुक पुरवठादार/कंत्राटदार अथवा त्यांच्या लेखी अधिकृत प्रतिनिधींच्या उपस्थितीत उघडण्यात येतील.
७. कोटेशनमध्ये नमूद केलेले दर हे सर्व लागू करांसहित असावेत. कोणताही अतिरिक्त कर अथवा खर्च स्वतंत्रपणे अनुज्ञेय राहणार नाही.
८. कोणतेही कारण नमूद करून अथवा कारण न देता प्राप्त झालेली कोणतीही किंवा सर्व कोटेशन स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार श्रीवर्धन नगर परिषदेने राखून ठेवलेला आहे.

सही/-
(अवधूत कुंभार)
मुख्याधिकारी
श्रीवर्धन नगर परिषद

प्रत :
१) नगर परिषद कार्यालय सूचना फलकावर.
२) आवक-जावक विभाग, श्रीवर्धन नगर परिषद.

श्रीवर्धन नगर परिषद, जिल्हा रायगड
जा.क्र.: श्रीनप/बांध/कात-२/१३७४/२०२६-२७ दिनांक: १३/११/२०२६

जाहिर दरपत्रक सूचना क्र. १४/२०२६-२६
(कमी कालावधीची दरपत्रक सूचना)

श्रीवर्धन नगर परिषद हद्दीतील 'श्रीवर्धन नगरपरिषद क्षेत्रात नगरपरिषदेचे बहुउद्देशीय सभागृह बांधणे' या कामाचे अंदाजपत्रक तयार करणेचे कामी आर. सी. सी. डेकोरेटिव्ह बॅलस्टर व पेशवेकालीन स्थापत्यशैलीतील जी.आर.सी. डेकोरेटिव्ह ब्रॅकेट पुरविणे व बसविणे या खालीलप्रमाणे बाबींसाठी इच्छुक पुरवठादार/कंत्राटदार यांच्याकडून सीलबंद लिफाफ्यात कोटेशन/दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

कामाचे नाव :- श्रीवर्धन नगरपरिषद क्षेत्रात नगरपरिषदेचे बहुउद्देशीय सभागृह बांधणे

Item No	Descrpition of Item	Unit	Quantity
Fair-1	Providing and fixing precast reinforced cement concrete decorative balusters, approximately 750 mm high x 150 mm nominal width, of approved shape, profile and finish matching the approved sample, including supply, transportation, loading, unloading, positioning, alignment, bedding and grouting in prepared sockets, joint finishing and curing, complete as directed by the Engineer-in-Charge.	Nos	210.00
Fair-2	Providing and fixing factory-manufactured GRC decorative brackets in approved Peshwa architectural style, approximately 508 × 508 mm with 35-40 mm GRC body thickness, comprising cement, fine silica sand, alkali-resistant glass fibres and approved admixtures, including approved moulded ornamentation, curing, transportation, handling, corrosion-resistant mechanical fixings, bedding, joint finishing, necessary scaffolding, working platforms and dismantling, complete as per approved drawings and sample. Thickness means the GRC body thickness; ornamental relief and local fixing thickening shall follow the approved drawing. The bracket is decorative and non-load-bearing; anchorage must suit its final weight and substrate.	Nos	40.00

अटी व शर्ती :-

१. उपरोक्त कामासाठी इच्छुक पुरवठादार/कंत्राटदार यांनी स्वतःच्या फर्मच्या लेटरहेडवर अथवा कोटेशन रिसीटवर दरपत्रक सादर करावे. कोटेशन नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून दिनांक २३/११/२०२६ रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत सीलबंद लिफाफ्यात नगर परिषदेच्या आवक विभागात दरपत्रक सादर करणे आवश्यक राहील.
२. संबंधित कामाच्या ठिकाणाची प्रत्यक्ष पाहणी करून कामाचे स्वरूप, विद्यमान परिस्थिती, आवश्यक साहित्य व इतर बाबींची माहिती घेऊनच कोटेशन/दरपत्रक सादर करणे आवश्यक राहील.
३. विहित कोटेशन दोन स्वतंत्र सीलबंद लिफाफ्यांमध्ये सादर करणे आवश्यक राहील. लिफाफा क्र. १ मध्ये पुरवठादार/कंत्राटदार नोंदणीपत्रक, जीएसटी व ईपीएफ नोंदणीपत्रक आणि मागील आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र अथवा पॅनकार्ड सादर करावीत.
४. लिफाफा क्र. २ मध्ये स्वच्छ अक्षरात, खाडाखोड न करता, कोणत्याही अतिरिक्त अटी व शर्ती नमूद न करता, वरील कामांचे दर अंकात व अक्षरी स्पष्टपणे नमूद करून स्वाक्षरी व शिक्क्यासह दरपत्रक सादर करावे.
५. वरील सर्व आवश्यक कागदपत्रे लिफाफा क्र. १ मध्ये सादर

सहलींच्या नावाखाली जीवघेणा खेळ

| उरण | प्रतिनिधी |

विद्यार्थ्यांना ज्ञानाची शिदोरी मिळावी, इतिहासाची ओळख व्हावी, विज्ञानाची गोडी लागावी आणि शैक्षणिक अनुभवातून त्यांचे व्यक्तिमत्त्व घडावे, या उदात्त हेतूने शैक्षणिक सहलींचे आयोजन केले जाते. मात्र, काही खासगी शाळा आणि क्लासेसनी या सहलींचे चक्क 'रिसॉर्ट सफरी'मध्ये रूपांतर केले आहे. गड-किल्ले, विज्ञान केंद्रे, संग्रहालये आणि ऐतिहासिक स्थळे बाजूला सारून समुद्रकिनारे, पर्यटनस्थळे आणि मौजमजेच्या ठिकाणांना पसंती दिली जात असल्याने शैक्षणिक सहलींचा मूळ उद्देशच हरवत चालला आहे. त्यातच नुकत्याच घडलेल्या दुर्दैवी घटनांमुळे शिक्षण विभागाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.



उरण तालुक्यासह राज्यभरातील अनेक खासगी शाळा आणि क्लासेसकडून शैक्षणिक सहलींचे आयोजन केले जाते. मात्र, काही ठिकाणी या सहलींचे स्वरूप ज्ञानवर्धक न राहता पर्यटन आणि मौजमजेपुरते मर्यादित राहत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. विद्यार्थ्यांना इतिहास, भूगोल, विज्ञान आणि संस्कृतीची प्रत्यक्ष माहिती मिळावी, हा वार्षिक सहलींमागचा उद्देश आहे. मात्र, हा उद्देश बाजूला ठेवून केवळ पर्यटनस्थळांची निवड केली जात असल्याचे बोलले जात आहे. तसेच, या सहलींसाठी पालकांकडून अव्वाच्या सव्वा शुल्क आकारले जाते. त्यामुळे पालक मुलांच्या ज्ञानासाठी पैसे खर्च करतात की, रिसॉर्टमधील मौजमजेसाठी, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

अलीकडेच मुरूड तालुक्यातील काशीद समुद्रकिनारी आणि श्रीवर्धन तालुक्यातील दिवे आगर समुद्रकिनारी आयोजित सहलीदरम्यान घडलेल्या दुर्दैवी बुडण्याच्या घटनेने या बेजबाबदार नियोजनाचे गांभीर्य अधोरेखित केले आहे. समुद्रकिनारे, खोल पाणी आणि धोकादायक पर्यटनस्थळांवर विद्यार्थ्यांना नेताना विशेष खबरदारी घेणे अत्यावश्यक आहे. शिक्षकांची पुरेशी संख्या, प्रशिक्षित सुरक्षा कर्मचारी, जीवरक्षक, प्राथमिक उपचारांची व्यवस्था, पालकांची संमती आणि सुरक्षित वाहतूक याबाबत कोणतीही तडजोड चालणार नाही. एका निष्काळजीपणामुळे एखाद्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळू शकतो, याचे भान सहल आयोजकांनी ठेवावे. विशेष म्हणजे, अशा सहलींवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असलेल्या शिक्षण विभागाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. त्यामुळे शैक्षणिक सहली म्हणजे शिक्षकांची मौजमजा किंवा खासगी संस्थांचा पर्यटन व्यवसाय नाही. विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याऐवजी त्यांच्या जीवाशी खेळण्याचा अधिकार कोणालाही नसल्याचे बोलले जात आहे.

या गंभीर प्रकाराची दखल घेत उरण तालुका मराठी पत्रकार संघाने शैक्षणिक सहलींच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या हिताशी खेळ करणाऱ्या शाळा व खासगी क्लासेसची चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यांनी गटशिक्षणाधिकारी पवार यांच्याकडे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शाळा व क्लासेसवर तातडीने कठोर कारवाई करण्याच्या मागणीसह शिक्षण विभागाने आता केवळ कागदी आदेश काढून जबाबदारी झटकू नये. तालुक्यातील सर्व शाळा आणि खासगी क्लासेसच्या सहलींची चौकशी करावी. सहलींचे नियोजन, शुल्क, सुरक्षा व्यवस्था आणि नियमांचे पालन यांचा सविस्तर आढावा घ्यावा. नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करून भविष्यात अशा दुर्घटना घडू नयेत, यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी उरण तालुका मराठी पत्रकार संघाकडून करण्यात आली आहे.

जबाबदार कोण?

शिक्षण विभागाकडून शाळा आणि क्लासेसच्या सहलींची तपासणी होते का? आकारल्या जाणाऱ्या शुल्कावर काही नियंत्रण आहे का? सुरक्षा नियमांचे पालन केले जाते का? की दुर्घटना घडल्यावरच चौकशीचे नाटक सुरू होते? तसेच, सहलींचे आयोजन करताना विद्यार्थ्यांसह शिक्षकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोणाची? समुद्रकिनाऱ्यावर आवश्यक सुरक्षा व्यवस्था काय? प्रशिक्षित जीवरक्षक, सुरक्षा साधने आणि योग्य देखरेखीची व्यवस्था काय, या प्रश्नांची उत्तरे शिक्षण विभागाने जनतेला द्यावीत.

- शिक्षण विभाग सुस्त अन् आयोजक मस्त
- मराठी पत्रकार संघाकडून ठोस उपाययोजनांची मागणी

वैभवीची इस्रोच्या भेटीसाठी निवड

| रेवदंडा | प्रतिनिधी |



अलिबाग येथील सेंट मेरी कॉन्व्हेंट स्कूल आणि रिअल अॅकॅडमीची इयत्ता नववीतील विद्यार्थिनी वैभवी वारगे हिने आपल्या शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. राष्ट्रीय स्तरावरील 'नॅशनल सायन्स कलाम स्ट्रीम २०२६ या उपक्रमात सहभाग घेतल्यानंतर तिची आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील भारतीय अंतराळ संशोधन संस्था अंतर्गत असलेल्या सतीश धवन अंतराळ केंद्राला दि.१८ नोव्हेंबर रोजी शैक्षणिक भेट देण्यासाठी निवड झाली आहे. या शैक्षणिक भेटीदरम्यान वैभवीला भारताच्या अंतराळ संशोधन क्षेत्राची प्रत्यक्ष माहिती घेण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. तसेच, रॉकेट प्रक्षेपण केंद्र, लॉन्च पॅड आणि अंतराळ मोहिमांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध प्रक्रियांची माहिती जाणून घेता येणार आहे.

निवडक

खारघरच्या मैदानात सुरक्षेचा बोजवारा

पनवेल : खारघर येथील खेळाच्या मैदानातील सुरक्षारक्षक केबिनला आग लागून ती पूर्णपणे जळून खाक झाल्याची घटना घडली. या मैदानात लहान मुले आणि नागरिकांची नियमित वर्दळ असतानाही सुरक्षारक्षक नियुक्त नसल्याचे या घटनेने पुन्हा समोर आले आहे. वारंवार मागणी आणि पत्रव्यवहार करूनही पनवेल महापालिका प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप माजी नगरसेविका नेत्रा पाटील यांनी केला आहे. खारघर सेक्टर १९ मधील प्लॉट क्रमांक १३२ येथील केबिनला आग लागल्याची माहिती मिळताच नेत्रा पाटील यांनी महापालिकेचे स्वच्छता निरीक्षक अतुल मोहकर यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर संबंधित यंत्रणेला घटनास्थळी पाठवून आग विझविण्याची कार्यवाही करण्यात आली. मात्र, या घटनेने सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे. विशेष म्हणजे, खारघरमधील विविध खेळाच्या मैदानांवर सुरक्षारक्षक नियुक्त करावेत, यासाठी नेत्रा पाटील यांनी महापालिका आयुक्तांकडे यापूर्वीच वारंवार पत्रव्यवहार केला होता. तरीही प्रशासनाने ठोस निर्णय घेतला नसल्याचा त्यांचा आरोप आहे. त्यामुळे खारघरमधील सर्व खेळाच्या मैदानांवर तातडीने सुरक्षारक्षक नियुक्त करावेत, जळालेल्या केबिनची पुनर्बांधणी करावी आणि सार्वजनिक मालमत्तेच्या संरक्षणासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नेत्रा किरण पाटील यांनी केली आहे.






जेट्टी काँक्रिटीकरणाच्या कामावर प्रश्नचिन्ह

उरण : महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या माध्यमातून करंजा-रेवस प्रवासी जेट्टी परिसरात सुरू असलेल्या काँक्रिटीकरणाच्या कामाचा दर्जा पाहता सरकारी यंत्रणेच्या कार्यक्षमतेचे पितळ उघडे पडत असल्याचे चित्र आहे. काँक्रिटीकरणासाठी टाकण्यात आलेली लोखंडी सळईंची फ्रेम केवळ नावापुरती पसरविण्यात आली असून, सळईंची योग्य बांधणीही करण्यात आलेली नसल्याचा आरोप स्थानिकांमधून होत आहे. त्यामुळे विकासाच्या नावाने निधी खर्च करायचा, ठेकेदारांची घरे भरायची आणि जनतेच्या तोंडाला पाने पुसायची, असाच काहीसा प्रकार करंजा-रेवस जेट्टी परिसरात सुरू आहे का, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. लोखंडी सळईंची योग्य बांधणी, काँक्रिटची गुणवत्ता आणि तांत्रिक मानकांचे पालन करणे ही ठेकेदाराबरोबरच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. मात्र, करंजा-रेवस प्रवासी जेट्टी परिसरातील प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी दिसणारी परिस्थिती पाहता अधिकाऱ्यांचे ठेकेदारावर नियंत्रण नसल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे ठेकेदाराच्या कामावर देखरेख ठेवण्याऐवजी अधिकारी केवळ कागदी घोडे नाचवत असून, त्यांच्यात काही साटेलोटे आहे का, असा संशय स्थानिकांमधून व्यक्त केला जात आहे. एकीकडे काँक्रिटीकरणाच्या कामावर प्रश्नचिन्ह, तर दुसरीकडे याच परिसरात शासनाने सुमारे ४ कोटी रुपये खर्चून उभारलेली रो-रो जेट्टी वापराविना पडून आहे. प्रत्यक्षात ही जेट्टी आता सेल्फी काढण्यासाठी, फिरण्यासाठी आणि खुर्च्या टाकून बसण्यासाठीच उपयोगात येत असल्याचे चित्र आहे.

उरणच्या रस्त्यावर मृत्यूचा सापळा

उरण : नगरपरिषदेचा भोंगळ कारभाराचा आणखी एक नमुना समोर आला आहे. जलवाहिनीची दुरुस्ती झाली, कामही दिवाळीपूर्वी पूर्ण झाले; मात्र, त्यासाठी काँक्रीटचा रस्ता खोदून तयार केलेले खड्डे बुजविण्याचे सौजन्य नगरपालिकेला अद्याप सुचलेले नाही. त्यामुळे वाहनचालक आणि नागरिकांच्या जीवाशी उघडपणे खेळ सुरू आहे. एखादा गंभीर अपघात घडल्यानंतरच नगरपालिका प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त सवाल उरणकरांकडून केला जात आहे. उरण शहरातील उरण-मोरा मुख्य रस्त्यावर पेन्शनर पार्क येथून बोरी नाका आणि भवरा परिसराकडे जाणाऱ्या मार्गावरील जलवाहिनी नादुरुस्त झाली होती. त्यासाठी नव्याने तयार केलेल्या काँक्रीटच्या रस्त्यावर खोदकाम करण्यात आले. या खड्ड्यांमुळे दुचाकीस्वारांचा तोल जाऊन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एखाद्या वाहनचालकाचा जीव गेल्यानंतर नगरपालिका प्रशासन जागे होणार का? अपघात घडल्यास त्याची जबाबदारी संबंधित अधिकारी आणि ठेकेदार स्वीकारणार का? की नेहमीप्रमाणे एकमेकांकडे बोट दाखवून हात झटकणार? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.



माणगावात न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा एल्गार

| माणगाव | प्रतिनिधी |

'समान काम, समान वेतन' या न्याय्य मागणीसाठी राज्यातील दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या बेमुदत आंदोलनाला माणगाव न्यायालयातील कर्मचाऱ्यांनीही पाठिंबा दिला आहे. माणगाव न्यायालयात मंगळवारी (दि.१७) कामकाज बंद आंदोलन करण्यात आले. मुंबई उच्च न्यायालयातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांप्रमाणे दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, अशी प्रमुख मागणी या आंदोलनातून करण्यात येत आहे.



मुंबई उच्च न्यायालयामार्फत दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासंदर्भातील प्रस्ताव दि. ३१ जानेवारी २०२५ रोजी शासनाकडे सादर करण्यात आला होता. मात्र, या प्रस्तावाला २० ते २१ महिन्यांचा कालावधी उलटूनही शासनाकडून अद्याप कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नसल्याचा आरोप न्यायालयीन कर्मचारी महासंघाने केला आहे. समान स्वरूपाचे काम आणि जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्यांना उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी मिळावी, ही कर्मचाऱ्यांची प्रमुख भूमिका आहे.

न्यायालय कर्मचारी बेमुदत संपावर



| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

समान कामासाठी समान वेतन मिळावे आणि सुधारित वेतन श्रेणीचा शासन निर्णय (जीआर) तातडीने लागू करावा, या प्रमुख मागण्यांसाठी श्रीवर्धन न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी दि.१७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप पुकारला आहे. मागण्या मान्य होऊन अधिकृत जीआर हाती येत नाही, तोपर्यंत हा लढा सुरूच राहील, असा ठाम निर्धार आंदोलक कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे. सन २०२३ पर्यंत उच्च न्यायालय, जिल्हा न्यायालय आणि तालुका न्यायालयातील कर्मचाऱ्यांचे वेतन समान होते. मात्र, २०२३ नंतर शासनाने केवळ उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन श्रेणी लागू केली. उच्च न्यायालय आणि तालुका न्यायालयातील कामाचे स्वरूप व जबाबदारी सारखीच असतानाही वेतनात मोठी तफावत निर्माण झाली आहे. एकाच न्यायव्यवस्थेतील दोन घटकांमध्ये हा दुजाभाव होत असल्याची भावना कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे. हा संप न्यायपालिका, न्यायाधीश किंवा न्यायालयीन प्रशासनाच्या विरोधात नसून, प्रलंबित प्रस्ताव मंजूर करून हक्क मिळावा यासाठी शासनाविरोधात असल्याचे कर्मचाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

रोह्यातील कर्मचाऱ्यांचा संपाला प्रतिसाद

| नागोठणे | प्रतिनिधी |

राज्यातील सुमारे ३५ हजार न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी दि.१७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप पुकारला आहे. या संपाच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील न्यायालयीन कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत. रोहा दिवाणी व फौजदारी न्यायालयातील सहाय्यक अधीक्षक विशाखा मात्रे व सहाय्यक अधीक्षक नेहा जोशी यांच्यासह रोहा न्यायालयातील सुमारे २१ कर्मचारी संपात सहभागी झाल्याने या संपाला रोहा न्यायालयात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. या संपामुळे रोहा न्यायालयासह जिल्ह्यातील सर्वच न्यायालयीन कर्मचाऱ्यांकडून काम बंद करण्यात आल्याने न्यायालयाच्या कामकाजावर याचा परिणाम झाला आहे.



• (छायाचित्र : महेश पवार)

समान कामासाठी समान वेतन आणि उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्रातील तब्बल ३४ हजार दुय्यम न्यायालयीन कर्मचारी गेल्या २१ महिन्यांपासून शासनाकडे पाठपुरावा करूनही केवळ आश्वासने मिळत असल्याने अखेर कर्मचाऱ्यांनी संपाचे हत्यार उपसले आहे. या संपामुळे रोहा दिवानी व फौजदारी न्यायालयातील दैनंदिन कामकाजावर परिणाम झाला आहे.



पनवेल न्यायालयाबाहेर जोरदार आंदोलन

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

समान काम, समान वेतन या मागणीसाठी महाराष्ट्र राज्यातील न्यायालयीन कर्मचारी वर्ग आक्रमक झाला असून, दि.१७ नोव्हेंबरपासून राज्यभरातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी बेमुदत संप पुकारला आहे. या संपाचे पडसाद पनवेलमध्येही उमटले असून, पनवेल न्यायालयाच्या बाहेर कर्मचाऱ्यांनी एकत्र येत जोरदार आंदोलन केले. उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे समान वेतन मिळावे, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली. गेल्या काही काळापासून या मागणीसाठी कर्मचारी संघटनांकडून पाठपुरावा करण्यात येत असल्याचे सांगण्यात येत आहे.

मात्र, मागण्यांबाबत ठोस निर्णय होत नसल्याने हा बेमुदत संपाचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे. पनवेल न्यायालयाच्या बाहेर कर्मचाऱ्यांनी एकत्र येत घोषणाबाजी करून प्रशासनाचे लक्ष वेधले.

रसायनीतील भटवाडी येथे घरफोडी

| रसायनी | प्रतिनिधी |

रसायनीतील भटवाडी-रिस येथील संबंधित घरमालक हे कुटुंबियांसोबत दि.६ ते १५ नोव्हेंबर दरम्यान कामानिमित्त बोहेर गेले होते. याच कालावधीत यांच्या बंद घराच्या दरवाजाचे कुलूप व कडी उचकटून चोरट्यांनी घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटांमध्ये ठेवलेली रोख रक्कम व जुने मनगटी घड्याळ त्यांनी चोरून नेले. या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घरफोडी प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार पंकज खंडागळे करीत आहेत.

भुरट्या पत्रकारांविरोधात पत्रकार एकवटले

| महाड | प्रतिनिधी |

महाडमधील भुरट्या पत्रकारांमुळे येथील अधिकाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण असून, अशा भुरट्या पत्रकारांच्या विरोधात पत्रकार रवी शिंदे यांच्या अधिपत्याखाली महाडचे स्थानिक पत्रकार एकवटल्याने स्थानिकांमध्ये उत्साह संचारला आहे. गेल्या काही काळापासून महाड तालुक्यात जिल्हा बाहेरील काही तथाकथित पत्रकारांचा वावर वाढला आहे. पत्रकारितेच्या नावाखाली दमदाटी करणे, अधिकाऱ्यांना घाबरवून काम करून घेणे, बातमी लावण्याची भीती दाखवून आर्थिक मागणी करणे, अशा प्रकारांमुळे येथील शासकीय अधिकारी, कर्मचारी आणि सामान्य नागरिक त्रस्त झाले होते. त्यामुळे खरी पत्रकारिता करणाऱ्या स्थानिक पत्रकारांचीही बदनामी होत आहे. या प्रकाराला आळा घालण्यासाठी महाडमधील सर्व स्थानिक पत्रकारांनी आता एकजूट दाखवली आहे.



यावेळी पत्रकारांनी सांगितले की, पत्रकारिता म्हणजे समाजाचा आरसा आहे. जनतेचे प्रश्न मांडणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, हे खरे पत्रकाराचे काम आहे. मात्र, पत्रकारितेचा वापर स्वतःच्या स्वार्थासाठी करणे, ही पत्रकारिता नव्हे. अशा प्रवृत्तींमुळे प्रामाणिक पत्रकारांवरही लोकांचा विश्वास उडत चालला आहे. त्यामुळे अशा भुरट्या प्रवृत्तींना वेळीच रोखले पाहिजे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. यापुढे कोणीही पत्रकारितेच्या नावाखाली दादागिरी करत असेल, अधिकाऱ्यांना त्रास देत असेल, तर त्याची माहिती एकमेकांना देऊन त्याच्याविरुद्ध कायदेशीर आणि संघटनात्मक पद्धतीने लढा दिला जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

- खरी पत्रकारिता जपण्याचा निर्धार

दरम्यान, महाड मधील कार्यालय, औद्योगिक कारखाने, शासकीय कार्यालयांना उपस्थित पत्रकारांच्या स्वाक्षरीचे निवेदन देण्याचे सर्वांनुमते ठरले. यावेळी रवींद्र शिंदे, संजय भुवड, उदय सावंत, श्रीकांत सहस्रबुद्धे, महेश शिंदे, श्रीकृष्ण बाळ, चंद्रकांत कोकणे, रघुनाथ भागवत, चंद्रहास नगरकर, मिलिंद माने, जुनेद तांबोळी, समीर बुटाला, राजेश भूवड, नितेश लोखंडे, पराग वडके, निलेश लोखंडे, मयुरी खोपकर उपस्थित होते.

- वनसंपदेसह पशु-पक्ष्यांची वाताहत
- किल्ला संवर्धनाच्या कामावर पाणी

वणव्यांमुळे सरसगड किल्ल्याची होरपळ

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

सुधागड तालुक्यातील प्राचीन व ऐतिहासिक सरसगड किल्ल्यावर वारंवार लागणाऱ्या वणव्यांमुळे किल्ल्याची होरपळ होत आहे. त्यामुळे येथील वनसंपदा व पशुपक्ष्यांची देखील वाताहत होत आहे. तसेच, सरसगड किल्ल्यावर स्थानिक दुर्गप्रेमी, विविध दुर्ग संवर्धन संस्था व संघटनांकडून केलेल्या कामांवर पाणी फेरले जात असून, त्यांच्यातून नाराजीचे सुर उमटत आहेत.

शिवाजी महाराजांनी सरसगडाचे महत्त्व ओळखून गडास स्वराज्यात दाखल करुन घेतले होते. तसेच, या सरसगडाच्या दुरुस्तीसाठी २ हजार होण देखील मंजुर केल्या होत्या. त्यानुसार दुर्गमता व विपूल जलसंचय यावर विशेष भर देऊन गडाची बांधणी करण्यात आली. दुरवर टेहाळणी करण्यास व इशारा देण्यास ''सरस'' म्हणून या किल्ल्याला सरसगड नाव देण्यात आल्याचे जाणकारांकडून सांगण्यात येत आहे. परंतु, हा ऐतिहासिक किल्ला मानवनिर्मित वणव्यात होरपळत चालला आहे. मागील आठवड्यात सरसगडावर मानवनिर्मित वणवा लागून किल्ल्याचा बहुतांश भाग जळून होरपळला आहे. या वणव्यामुळे किल्ल्यावर नव्याने लावलेली रोपे व संवर्धन केलेली झाडे जळून खाक झाली आहेत. शिवाय येथील माकडे, वानरे व पक्ष्यांच्या अन्नाचा प्रश्न निर्माण होऊन त्यांचा अधिवास देखील नष्ट झाला आहे. दरम्यान, अपुऱ्या यंत्रणेमुळे स्थानिक नागरिक व वन विभागाच्या कर्मचाऱ्यांचे वणवा विझविण्याचे प्रयत्न देखील अपूरे पडत आहेत.



• (छायाचित्रः धम्मशील सावंत)

वणव्यांमुळे वाताहत

ऐतिहासीक सरसगड किल्ल्याच्या चारही बाजूने वणवे लागल्यामुळे मोठ्या प्रमाणात वनसंपदा नष्ट झाली आहे. त्यामूळे येथे राहणाऱ्या पशूपक्ष्यांची अन्नपाण्यासाठी खुप वाताहत होत आहे. त्यामुळे येथे राहणारे पक्षी, माकड, वानरे व इतर प्राणी अन्नपाण्यासाठी पाली शहरात व आजूबाजूच्या गावात येत आहेत. त्यामुळे या प्राण्यांसह स्थानिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तसेच, या वणव्यांमुळे सरसगडाची तटबंदी, बुरुज इत्यादी बांधकामे देखील सैल पडून वेळेस दगड खाली घरंघळत आहेत. त्यामुळे किल्ल्या ढासळण्यासह एखादी दुर्दैवी घटना घडण्याची भीती दुर्गप्रेमींमधून व्यक्त केली जात आहे.

> "वणव्यांमुळे सरसगड किल्ल्यावरील ऐतिहासिक वास्तू, वनसंपदा व जैवविविधतेचे प्रचंड नुकसान होत आहे. अनेकदा जीवाची बाजी लावून येथील वणवे विझवले आहेत. किल्ल्यावर अथक परिश्रम करून झाडे लावून ती वाढवण्यासाठी व जोपसण्यासाठी मेहनत घेत आहोत. जे कोणी लोक वणवा लावत आहेत त्यांना शोधून कडक शासन करण्याची गरज आहे. गेली अनेक वर्षे सरसगड व इतर ठिकाणी लावलेली व संवर्धन केलेली झाडे सततच्या वनव्यांना बळी गेली आहेत. याचे खूप दुःख होते.
>
> – केतन म्हस्के, उपाध्यक्ष, शिवऋण प्रतिष्ठान, पाली

दादांचा मृत्यू, नवा संशय

अजित पवार यांच्या मृत्यूला सुमारे दहा महिने होत आले. पण अजूनही त्यांच्या अपघाताबाबतचा अहवाल समोर आलेला नाही. त्यामुळे या घटनेबाबतचे गूढ कायम आहे. अजितदादा हे उपमुख्यमंत्री होते. बारामतीत अनेकवेळा ते विमानाने गेले असावेत. पण कोणतेही पावसाळी वातावरण किंवा खराब हवा नसताना अचानक त्यांचे विमान कोसळावे हा सर्वांसाठी अत्यंत धक्कादायक प्रकार होता. त्याविषयी बरेच संशय व्यक्त केले गेले व ते अजूनही फिटलेले नाहीत. विशेष म्हणजे अगदी सुरुवातीला खुद्द दादा गटाच्या काही नेत्यांनीही याबाबत काही शंका व्यक्त केल्या. पण भाजपसोबत सत्तेत असल्याने त्यांना बहुदा गप्प केले गेले असावे. सुनेत्रा पवार यांनीही याबाबत मौन बाळगलेले आहे. अजित पवार यांच्या अगदी जवळचे आहोत असे भासवणारे अनेक नेते आहेत. त्यातले काही रायगड जिल्ह्यातलेही आहेत. पण हे कोणी याबाबत चकार शब्द बोलायला तयार नाहीत. शरद पवार यांनी अगदी सुरुवातीलाच हा केवळ अपघात होता अशी भूमिका घेतली. पण त्यांच्याच घरातले आणि पक्षातले रोहित पवार यांनी मात्र हा विषय सोडलेला नाही. ते याबाबत सतत काही प्रश्न उपस्थित करीत आहेत. सोमवारी जिल्हा परिषदेच्या वतीने बारामतीत उभारण्यात आलेल्या अजित पवार यांच्या अर्धपुतळ्याचे उद्घाटन करण्यात आले. त्यासाठी अमित शहा आले होते. शहा यांनी अजितदादांचा बराच गौरव केला. त्यांची कार्यपध्दती मार्गदर्शक होती. हा काम करणारा माणूस होता अशी स्तुतीसुमने त्यांनी उधळली. पण दादांच्या अपघाताबाबत ते बोलायला तयार नाहीत. या कार्यक्रमाला अर्थातच देवेंद्र फडणवीस हजर होते.विविध देशातील पथके व संस्था या अपघाताचा तपास करीत आहेत. त्यांच्या चौकशीचा अहवाल लवकर मिळवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन शहा यांनी दिले आहे असे फडणवीस यांनी आपल्या भाषणात सांगितले. पण खुद्द शहा तसे काही बोलले नाहीत. या प्रकरणात आता शहा लक्ष घालत आहेत असेही मुख्यमंत्री म्हणाले. पण ज्यांच्या कामाची मरणोत्तर इतकी स्तुती शहा यांनी केली त्या दादांच्या मृत्यूच्या चौकशीमध्ये आजवर शहा यांनी गंभीरपणे लक्ष घातले नव्हते का असा प्रश्न त्यामुळे उपस्थित होतो.

तातडीने चौकशी हवी

दादांचा मृत्यू हा अपघात होता की घातपात हे नंतर ठरेल. पण आज सवाल हा आहे की, सत्ताधाऱ्यांपैकी कोणालाही या मुद्द्याची तातडी जाणवत नाही. चौकशी चालू आहे असे म्हणून हे स्वस्थ आहेत असे चित्र समोर येते आहे. कालच्या कार्यक्रमाला हवाई वाहतूक खात्याचे मंत्री मुरलीधर मोहोळ हेही हजर होते. हा प्रश्न त्यांच्याही अखत्यारीतला आहे. पण तेही यावर गप्प आहेत. नशीब, फडणवीसांनी काल एक मान्य केले की जनतेच्या मनात याबाबत शंका आहेत. त्यामुळे या चौकशीत कोणी दोषी आढळला तर त्याला कठोर शिक्षा होईल असे आपण पाहू असे त्यांना म्हणावे लागले. अन्यथा, खरे तर त्यांनी या प्रकरणी वारंवार प्रश्न विचारणाऱ्या रोहित पवार यांना त्यांनी दिमागी नक्षलवादी ठरवायला हवे. काल पुण्यात कार्यक्रम चालू असतानाच तिकडे मुंबईत रोहित पवार यांनी एक पत्रकार परिषद घेतली व या प्रकरणात पुन्हा काही गंभीर आरोप केले. हे एकाच दिवशी व्हावे याला कदाचित राजकारण म्हणता येईल. पण त्यांनी केलेल्या आरोपांना उडवून लावता येणार नाही. अजितदादा ज्या विमानाने प्रवास करीत होते त्या व्हीएसआर कंपनीच्या मालकाबाबत रोहित यांनी आजवर अनेक आरोप केले आहेत. व्ही. के. सिंह असे त्याचे नाव असून त्याचे आर्थिक व्यवहार संशयास्पद असल्याचे त्यांनी म्हटले आहे. काल रोहित यांनी दोन मुद्दे मांडले. एक म्हणजे या सिंह यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतचे काही फोटो दाखवून त्यांची जवळीक सांगितली गेली. मुख्यमंत्री सिंह यांना वाचवतायत का असा सवाल त्यांनी केला. सिंह यांच्या कंपनीतील ८६८ कोटींच्या संशयास्पद गैरव्यवहारांची चौकशी का होत नाही अशी मागणी त्यांनी केली. शिवाय एप्रिल महिन्यात राजस्थानात मुख्यमंत्री आणि व्ही.के. सिंह यांचा मुलगा रोहित हे एका लग्न समारंभात हास्यविनोद करत असतानाचे फोटो त्यांनी दाखवले. याच रोहित याने दादांच्या अपघातानंतर अमेरिकेतील फ्लोरिडा इथे अठरा कोटींचा बंगला खरेदी केला असून तो विकणाऱ्याची पार्श्वभूमी गुन्हेगारी स्वरुपाची असल्याचे रोहित पवार म्हणाले.

आरोप उडवून लावू नका

रोहित यांनी व्ही.के. सिंह यांच्या संदर्भातले असे अनेक तपशील यापूर्वी दिले आहेत. मात्र त्यांची दखल घ्यायला सरकार किंवा चौकशी यंत्रणा तयार नाहीत. दादांच्या अपघात प्रकरणाची फिर्याद दाखल करून घ्यायलाही पोलिसांनी नकार दिला होता. रोहित पवार हे आमदार असूनही पोलिसांनी त्यांना उद्धट वागणूक दिली होती. आता तेच रोहित या प्रकरणात मुख्यमंत्री व्ही.के. सिंह यांना पाठीशी घालत आहेत का असा सवाल करीत आहेत. असे आरोप झाले की त्यांना राजकीय ठरवायचे आणि आरोप करणाऱ्याला मूर्ख ठरवायचे ही भाजपची नेहमीची पध्दत आहे. त्यानुसार केवळ प्रवक्त्यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली. मुख्यमंत्री अजून तरी बोललेले नाहीत. पण ते बोलले किंवा न बोलले तरी महत्वाचे हे आहे की, रोहित यांच्या आरोपांची दखल घेऊन तपास यंत्रणांनी वेगाने सूत्रे हलवायला हवीत. रोहित यांचे आरोप खोटे असतील तर तसे तात्काळ स्पष्ट करायला हवे. पण तसे घडताना दिसत नाही. नाशिकच्या टीसीएसमधील कथित धर्मांतर प्रकरणात मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारीतले पोलिस वेगाने कारवाई करतात. मुस्लिम नगरसेवकांविरुध्द गुन्हे दाखल होतात. बुलडोझर चालवले जातात. भीमा कोरेगाव प्रकरणात कोणत्याही खटल्याविना डाव्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना तुरुंगात सडवत ठेवले जाते. पण अजितदादांच्या प्रकरणात मात्र ही चपळाई दिसत नाही. दादांच्या घातपातामागे फडणवीस आहेत असे आपण म्हणत नाही असे रोहित पवार यांनी काल वारंवार स्पष्ट केले. मात्र या अपघातातील विमान कंपनीचे मालक व्ही.के.सिंह यांना वाचवण्याचा ते प्रयत्न करत आहेत हादेखील तितकाच गंभीर आरोप आहे. दुर्दैवाने या आरोपाचा ज्यांनी तपास करायचा त्या यंत्रणा भाजपच्या दावणीला बांधलेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून कितपत अपेक्षा करावी हा प्रश्नच आहे. पण राज्याच्या मुख्यमंत्र्यांवर असा आरोप होतो आणि केंद्रीय व राज्याच्या तपास यंत्रणा त्याबाबत काहीही करीत नाहीत हे चित्र अत्यंत खेदजनक आहे. राजकीय नेत्यांना सार्वजनिक जीवनात अनेक लोकांबरोबर कार्यक्रम किंवा लग्नासारखे समारंभ यात सहभागी व्हावे लागते हे खरे आहे. पण दुसऱ्या बाजूने असे काही आरोप होतात तेव्हा त्याबाबत तात्काळ चौकशी करून खुलासा करणे ही त्या राजकीय नेत्यांची जबाबदारी असते. तशी निष्पक्ष चौकशी झाली व त्यात मुख्यमंत्री किंवा अन्य कोणीही निर्दोष आढळले तर जनतेचा नेत्यांवर विश्वास राहू शकतो. अन्यथा,निव्वळ मफलर घालून हँसी-मजाक करणारे फोटोच कायम समोर येत गेले तर जनतेच्या मनात संशयाचे घर तयार होऊ शकते लक्षात ठेवायला हवे.

विचार

जमीन टोकनायझेशनची डिजिटल क्रांती

जमिनीचे व्यवहार म्हटले की कागदपत्रांची गुंतागुंत, मालकी हक्काचे वाद आणि व्यवहारातील अपारदर्शकता अशा अनेक समस्या समोर येतात. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने जमीन आणि इतर मालमत्तांच्या टोकनायझेशनच्या दिशेने टाकलेले पाऊल महत्त्वाचे आहे. शासन ब्लॉकचेनच्या आधारे जमीन आणि स्थावर मालमत्तेच्या डिजिटायझेशन आणि टोकनायझेशनसाठी स्वतंत्र कायदेशीर चौकट उभारत आहे.

डॉ.दीपक शिकारपूर

जमिनीचे व्यवहार म्हटले की कागदपत्रांची गुंतागुंत, मालकी हक्कावरील वाद, बनावट दस्तऐवज, फेरफार नोंदीतील विलंब, एकाच जमिनीची अनेकांना विक्री आणि व्यवहारातील अपारदर्शकता अशा अनेक समस्या समोर येतात. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने जमीन आणि इतर वास्तविक मालमत्तांच्या टोकनायझेशनच्या दिशेने टाकलेले पाऊल अत्यंत महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र सरकारने ब्लॉकचेनच्या आधारे जमीन आणि स्थावर मालमत्तेचे डिजिटायझेशन व टोकनायझेशन करण्यासाठी स्वतंत्र कायदेशीर चौकट उभारण्याचा मानस व्यक्त केला आहे. प्रस्तावित कायद्याला 'महाराष्ट्र डिजिटायझेशन अँड एक्स्चेंज ऑफ लँड टोकन असेट ॲक्ट', म्हणजेच 'डेल्टा कायदा' असे नाव दिले जाण्याची शक्यता आहे. हा कायदा अद्याप प्रस्तावित अवस्थेत आहे; प्रत्यक्ष तरतुदी, नियामक यंत्रणा आणि अंमलबजावणीची पद्धत कायदा प्रसिद्ध झाल्यानंतरच स्पष्ट होईल. हा उपक्रम यशस्वी झाल्यास जमीन टोकनायझेशनसाठी स्वतंत्र कायदेशीर चौकट निर्माण करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य ठरू शकते. जमिनीच्या मालकीशी संबंधित अधिकृत माहितीचे सुरक्षित डिजिटल प्रतीक म्हणजे जमीन टोकन. विशिष्ट भूखंडाचा सर्वेक्षण क्रमांक, क्षेत्रफळ, सीमा, मालकी हक्क, व्यवहाराचा इतिहास, बोजा, तारण, न्यायालयीन निर्बंध आणि शासनाच्या परवानग्या यांच्याशी हे टोकन जोडले जाऊ शकते. ब्लॉकचेनवर नोंदवलेल्या प्रत्येक व्यवहाराला कालमुद्रा आणि स्वतंत्र डिजिटल ओळख मिळते. याचा अर्थ प्रत्यक्ष जमीन संगणकात किंवा आभासी जगात जाते असा नाही. जमीन भौतिक स्वरूपात जिथे आहे तिथेच राहते; मात्र तिच्या मालकीचा आणि व्यवहाराचा अधिकृत डिजिटल मागोवा तयार होतो.

या पार्श्वभूमीवर 'टोकन म्हणजेच निर्विवाद कायदेशीर मालकी' असे सुरुवातीपासून गृहीत धरता येणार नाही. टोकन, नोंदणीकृत खरेदीखत, सातबारा उतारा, मालमत्ता पत्रक आणि शासनाच्या महसुली नोंदी यांना कायद्याने परस्पर जोडणे आवश्यक असेल. ज्याप्रमाणे आधार क्रमांक प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र डिजिटल ओळख देतो, त्याचप्रमाणे टोकनायझेशनमुळे प्रत्येक भूखंडाला विशिष्ट आणि सत्यापनयोग्य डिजिटल ओळख मिळू शकते. त्या ओळखीशी भूखंडाचा सर्वे क्षण क्रमांक, नकाशा, क्षेत्रफळ, मालकीचा इतिहास, व्यवहार, तारण, बोजा आणि न्यायालयीन निर्बंध जोडता येतील. त्यामुळे जमीन ओळखताना नावातील फरक, जुन्या नोंदी किंवा कागदपत्रांमधील विसंगती कमी होऊ शकते. परंतु आधार आणि जमीन टोकन यांच्यातील महत्त्वाचा फरकही समजून घेतला पाहिजे. आधार हा व्यक्तीच्या ओळखीचा पुरावा आहे; तो नागरिकत्व किंवा मालमत्तेच्या मालकीचा पुरावा नाही. त्याचप्रमाणे जमीन टोकनला कायद्याची स्पष्ट मान्यता मिळेपर्यंत ते आपोआप अंतिम मालकी हक्काचे प्रमाणपत्र ठरणार नाही. नोंदणीकृत खरेदीखत, सातबारा उतारा, मालमत्ता पत्रक, फेरफार नोंद आणि प्रत्यक्ष भूमापन यांच्याशी त्याची कायदेशीर सांगड घालावी लागेल.

भविष्यात प्रत्येक जमिनीला आधार क्रमांकाप्रमाणे स्वतंत्र, कायमस्वरूपी आणि न बदलणारा डिजिटल क्रमांक मिळाल्यास नागरिक फक्त तो क्रमांक वापरून मालमत्तेची अधिकृत स्थिती तपासू शकतील. मात्र व्यक्तीच्या आधार क्रमांकाची माहिती सार्वजनिक न करता, गोपनीयता आणि माहिती-सुरक्षेचे कठोर नियम पाळणे आवश्यक असेल. योग्य कायदेशीर संरक्षणासह जमीन टोकन हे खऱ्या अर्थाने प्रत्येक भूखंडाचे 'डिजिटल आधारपत्र' बनू शकते. ब्लॉकचेनची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यावर नोंदवलेली माहिती मनमानी पद्धतीने बदलणे अत्यंत कठीण असते. जमीन विक्री, हस्तांतरण, वारसा, तारण किंवा बोजा यांची प्रत्येक नोंद कायमस्वरूपी व्यवहारसाखळीमध्ये दिसू शकते. कोणत्या अधिकाऱ्याने, कोणत्या दिवशी आणि कोणत्या आधारावर बदल मंजूर केला, याचा लेखापरीक्षणयोग्य मागोवा उपलब्ध होऊ शकतो. आज घर किंवा जमीन घेणाऱ्या नागरिकाला विविध कार्यालयांमधून कागदपत्रे मिळवावी लागतात. एखाद्या भूखंडावर पूर्वीचे कर्ज आहे का, न्यायालयीन वाद आहे का किंवा तोच भूखंड दुसऱ्याला विकला आहे का, हे शोधणे सामान्य नागरिकासाठी कठीण ठरते. टोकनायझेशनमुळे अधिकृत नोंदी एकमेकांशी जोडल्या गेल्यास मालकीचा इतिहास अधिक सहज तपासता येईल. त्यातून बनावट दस्तऐवज, खोट्या स्वाक्षऱ्या आणि दुहेरी विक्रीला आळा बसू शकेल.

सामान्य नागरिकासाठी हा बदल सुरक्षित व्यवहाराची सुरुवात ठरू शकतो. जमीन किंवा घर खरेदी करण्यापूर्वी संबंधित मालमत्तेची प्रमाणित डिजिटल माहिती पाहता आल्यास निर्णय घेणे सोपे होईल. मालकी, बोजा, आरक्षण, वापराचा प्रकार आणि व्यवहाराचा इतिहास एकाच अधिकृत व्यवस्थेत उपलब्ध झाल्यास दलालांवर किंवा अनधिकृत माहितीवर असलेले अवलंबित्व कमी होईल. नोंदणी, मुद्रांक शुल्क आणि फेरफार प्रक्रिया परस्पर जोडल्यास खरेदीखत नोंदवल्यानंतर मालकीतील बदलासाठी पुन्हा कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागणार नाहीत. वारसा हक्काने होणारे हस्तांतरणही अधिक सुलभ होऊ शकते. व्यवहाराचा प्रत्येक टप्पा नागरिकाला संदेशाद्वारे कळवल्यास त्याच्या मालमत्तेवर परस्पर व्यवहार करण्याचा प्रयत्न लगेच लक्षात येऊ शकतो. ग्रामीण महाराष्ट्रात सातबारा उतारा, पीक नोंद, वारस नोंद, कर्जाचा बोजा आणि प्रत्यक्ष ताबा यातील विसंगतीमुळे अनेक अडचणी निर्माण होतात. अधिकृत डिजिटल टोकन महसुली नोंदी, भौगोलिक नकाशे आणि बँकिंग व्यवस्थेशी जोडल्यास शेतकऱ्याचा मालकी हक्क अधिक विश्वासार्ह पद्धतीने पडताळता येईल. यामुळे पीककर्ज, शेती सुधारणा कर्ज, सिंचन प्रकल्प किंवा कृषी उद्योगासाठी वित्तपुरवठा मिळवण्याची प्रक्रिया वेगवान होऊ शकते. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी बाधित क्षेत्र निश्चित करणे, भरपाई देणे आणि विमा दावे तपासणेही सुलभ होईल. भूमी अधिग्रहणाच्या प्रसंगी पात्र लाभार्थी निश्चित करणे आणि भरपाई थेट त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यास मदत होईल.

हे होत असताना सामायिक जमीन, वारस नोंदी, कुळकायद्याचे हक्क, वनहक्क आणि आदिवासी जमिनींवरील विशेष निर्बंध यांचा आदर करणे अत्यावश्यक आहे. चुकीची माहिती टोकनमध्ये नोंदली गेल्यास केलेल्या चुकीला तंत्रज्ञान अधिकृत स्वरूप देण्याचा धोका असतो. त्यामुळे प्रथम नोंदींची शुद्धता, नंतर टोकनायझेशन हे सूत्र स्वीकारावे लागेल. जमीन कर्जासाठी तारण ठेवताना बँकांना मालकी हक्क, मूल्यांकन आणि आधीच्या बोज्यांची तपासणी करावी लागते. ही प्रक्रिया वेळखाऊ आणि खर्चिक असते. टोकनायझेशनमुळे अधिकृत डिजिटल पडताळणी शक्य झाल्यास कर्जमंजुरीचा कालावधी कमी होऊ शकतो. एकाच मालमत्तेवर अनेक संस्थांकडून कर्ज घेण्याच्या फसवणुकीवरही नियंत्रण आणता येईल. मालमत्ता तारण ठेवल्यानंतर तिच्या डिजिटल नोंदीमध्ये बोजा त्वरित दिसला पाहिजे. कर्जाची परतफेड झाल्यावर तो नियमानुसार काढला गेला पाहिजे. बँका, नोंदणी विभाग आणि महसूल विभाग यांच्यातील सुरक्षित माहिती विनिमयामुळे वित्तीय व्यवहारांमधील विश्वास वाढू शकतो. गृहनिर्माण प्रकल्प किंवा औद्योगिक गुंतवणुकीपूर्वी जमिनीची कायदेशीर तपासणी करण्यासाठी मोठा वेळ आणि खर्च लागतो. टोकनायझेशनमुळे मालकीची साखळी, विकास परवानग्या, आरक्षण, पर्यावरणीय निर्बंध आणि बोजे यांची एकत्रित माहिती मिळाल्यास प्रकल्प नियोजन जलद होईल. संशयास्पद जमीन व्यवहार कमी झाल्यास उद्योगस्नेही वातावरण मजबूत होऊ शकते.

या प्रक्रियेमुळे भविष्यात कायद्याने परवानगी दिल्यास मोठ्या मालमत्तेचे लहान डिजिटल हिस्से निर्माण करून सामूहिक गुंतवणुकीचे पर्याय उपलब्ध होऊ शकतात. उदाहरणार्थ, मोठ्या व्यावसायिक मालमत्तेत मर्यादित रकमेद्वारे हिस्सा घेणे शक्य होईल. मात्र अशी अंशात्मक मालकी अत्यंत संवेदनशील आहे. ती गुंतवणूक करार आहे, मालकी हक्क आहे की आर्थिक प्रतिभूती आहे याबाबत स्पष्टता आवश्यक आहे. सेबी, रिझर्व्ह बँक, नोंदणी यंत्रणा आणि कर विभाग यांचा समन्वय झाल्याशिवाय अशी व्यवस्था सर्वसामान्यांसाठी खुली करणे योग्य ठरणार नाही. व्यवहारांचे मूल्य कमी दाखवणे, मुद्रांक शुल्क टाळणे किंवा अनधिकृत हस्तांतरण करणे यावर डिजिटल व्यवस्थेमुळे अंकुश येऊ शकतो. बाजारमूल्य, अधिकृत मूल्यांकन आणि व्यवहारमूल्य यांची तुलना केल्यास शासनाचा महसूल वाढेल. जमिनीचा वापर, मालकी आणि व्यवहार यांचा अद्ययावत माहितीकोश नगररचना, रस्ते, सार्वजनिक वाहतूक, औद्योगिक वसाहती आणि गृहनिर्माण धोरणासाठी उपयुक्त ठरेल. तंत्रज्ञान हे साधन आहे; ते स्वतःहून न्यायाची हमी देत नाही. जमीन टोकनायझेशन यशस्वी करण्यासाठी भूमापन नकाशे, सातबारा, मालमत्ता पत्रक, नोंदणीकृत दस्तऐवज आणि न्यायालयीन प्रकरणे यांचा ताळमेळ घालावा लागेल. नागरिकांना चुकीची नोंद दुरुस्त करण्यासाठी सोपी, कालबद्ध आणि मानवी हस्तक्षेप असलेली अपील व्यवस्था द्यावी लागेल. आधार किंवा इतर ओळख साधनांचा वापर करताना वैयक्तिक माहितीचे संरक्षण, सायबर सुरक्षा, बहुपातळी पडताळणी आणि डिजिटल स्वाक्षरी अनिवार्य असावी लागेल. जमीन टोकनायझेशन ही केवळ कागदपत्रांचे संगणकीकरण करण्याची योजना नाही. ती मालकीवरील विश्वास, प्रशासनातील उत्तरदायित्व आणि मालमत्तेच्या आर्थिक उपयोगाची नवी रचना आहे. तिच्यामुळे व्यवहार जलद होतील, पण वेगापेक्षा अचूकता महत्त्वाची असेल. ब्लॉकचेनमुळे नोंद बदलणे कठीण होईल, पण त्यावर प्रथम नोंदवलेली माहिती खरी असणे त्याहून अधिक महत्त्वाचे आहे. स्पष्ट कायदा, शुद्ध भूमिअभिलेख, सक्षम सायबर सुरक्षा, नागरिकांच्या माहितीचे संरक्षण आणि प्रभावी तक्रार निवारण या पाच आधारस्तंभांवर ही व्यवस्था उभी राहिली, तर महाराष्ट्र देशाला नवा आदर्श देऊ शकतो. जमीन व्यवहारांमधील पारदर्शकता वाढवून शेतकरी, नागरिक, बँका, उद्योग, विकासक आणि शासन यांना एका विश्वासार्ह डिजिटल साखळीत आणण्याची क्षमता या उपक्रमात आहे. ज्या भूमीशी माणसाच्या पिढ्यांच्या आठवणी आणि भविष्याच्या आशा जोडलेल्या असतात, त्या भूमीचा व्यवहार अधिक सुरक्षित, न्याय्य आणि पारदर्शक करणे हेच टोकनायझेशनचे अंतिम यश ठरेल.

चर्चा आजची

श्रेयवाद घेणारे लोकप्रतिनिधी हरवलेत



संतोष राऊळ

सध्या अलिबाग तालुक्यात रेवस-रेड्डी रस्त्याचे काम जोरदार सुरू आहे. या रस्त्यामुळे अवघ्या तासांत रेवसवरून कोकणात पोहोचता येणार आहे. तसेच, हा मार्ग मुंबई-गोवा महामार्गापेक्षा जास्त सुखकर असल्याचे देखील बोलले जात आहे. त्यानंतर हा मार्ग रेवस-करंजा पुलावरून थेट मुंबईशी जोडला जाणार आहे. त्यामुळे मुंबईकडील पर्यटक देखील मोठ्या प्रमाणावर या मार्गाचा अवलंब करण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे रायगडासह कोकणातील पर्यटन वाढीला मोठी चालना मिळू शकते. परंतु, हा विकास होताना पाहण्यासाठी आजची पिढी तर जगली पाहिजे. तेच उद्या जिवंत नसतील, तर या जिवघेण्या विकासाचा काय उपयोग, असा संतप्त प्रश्न स्थानिकांमधून उपस्थित केला जात आहे. त्याला कारण असे की, नुकताच एका चिमुकल्याला वाहतुक कोंडीमुळे वेळेवर रूग्णालयात दाखल करून त्याच्यावर उपचार करता आले नाही, त्यामुळे त्याला आपला जीव गमवावा लागला. त्यामुळे रेवस-रेड्डीच्या नियोजन शुन्य कारभारावर स्थानिकांमधून संताप व्यक्त होत आहे. तसेच, अशावेळी या रस्त्याचे काम सुरू होण्याआधीपासून आणि पुर्ण झाल्यावर झगडून श्रेयवाद घेणारे स्थानिक लोकप्रतिनिधी कुठे हरवतात, असा संतप्त प्रश्न देखील सर्वसामान्यांमधून उपस्थित केला जात आहे.

एखादे विकासकाम झाले की, लोकप्रतिनिधींमध्ये श्रेयवादाची स्पर्धा निर्माण होते. तसेच, कुरूळ ते रोहा हा मार्ग होण्याआधी देखील लोकप्रतिनिधींकडून अनेकवेळा नारळ वाढविण्यात आले. अखेर रेवस-रेड्डीचा भाग असलेला कुरूळ ते सहाण बायपास मार्गाचे काम सुरू करण्यात आले. परंतु, हा रस्ता होताना प्रवासी वर्गासह स्थानिकांना मोठ्या संकटांना तोंड द्यावे लागत आहे. नव्याने सिमेंट काँक्रिटचा रस्ता बनविताना सुस्थितीतील डांबरी रस्ते उखडण्यात आले. त्यामुळे परिसरात धुळीचे साम्राज्य पसरले आहे. या धुळीमुळे स्थानिकांसह प्रवासी वर्गाला नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच, रस्ता खोदल्यानंरत तो ओबधोबड होऊन अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. त्यातच या उखडलेल्या रस्त्यावर खडी टाकून त्यावर सिमेंट टाकून बेस तयार केला जात आहे. परंतु, काही ठिकाणी तो बेस होईपर्यंत खडी तशीच पडून असते. त्यामुळे त्या खडीवर दुचाकीचे चाक घसरून अपघात होण्याची मोठी शक्यता आहे. त्यामुळे दुचाकीस्वारांना जीव मुठीत घेऊन बेलकडे ते कुरूळ दरम्यान प्रवास करावा लागत आहे. त्यातच आता एका बाजुच्या रस्त्याचे काम सुरू केल्याने एका मार्गावरील वाहने थांबवून दुसऱ्या मार्गावरील वाहतूक सुरू ठेवावी लागत आहे. त्यातच काही बेशिस्त वाहनचालक एकेरी मार्गावर वाहने रांगेत उभी असतानाही ते दुहेरी रांग लावण्याचा पराक्रम करतात. त्यामुळे समोरून येणाऱ्या वाहनांना मोठा अडथळा निर्माण होतो. विशेष म्हणजे अवजड वाहने, विजेवर चालणाऱ्या मोठ्या बस, बर्फाचे ट्रक ही वाहने तर कुरूळ येथील रस्त्यावर हमखास अडकतात. त्यामुळे रस्त्याच्या कामापेक्षा बेशिस्त वाहन चालकांचा मनस्ताप जास्त सहन करावा लागत आहे. तसेच, सिमेंट काँकेटचे रस्ते उंच असल्याने आणिबाणीच्या वेळेत त्यावरून गाडीही चढवता येत नाही. तसेच, ज्या ठिकाणी काम पुर्ण झाले आहे, त्या ठिकाणच्या साईडपट्ट्या व्यवस्थित न भरल्याने चालकाला गाडी खाली देखील उतरवता येत नाही. त्यामुळे मोठ्या वाहतुक कोंडीला सामोरे जावे लागते. खरंतर या ठिकाणी ठेकेदाराचे योग्य नियोजन असायला हवे होते. परंतु, तसे काहीच निदर्शनसा येत नसल्याचे प्रवासी वर्गातून बोलले जात आहे. त्याचा प्रचंड भार पोलीस कर्मचाऱ्यांवर पडत आहे. खरंतर हे काम ट्रॅफिक पोलिसांचे आहे; मात्र, त्यांची कमतरता असल्यामुळे होमगार्ड वाल्यांना ठेवण्यात आल्याचे बोलले जात आहे. परंतु, तेही वाहतूक कोंडी सोडविण्यात कमी पडताना दिसत आहेत. त्यामुळे या वाहतुक कोंडीचा मोठा फटका नोकरवर्गाला तर बसतच आहे, त्याहीपेक्षा मोठा फटका रुग्णांना बसत आहे. याचे उदाहरण म्हणजे नुकतीच घडलेली दुदैवी घटना. बामणगाव येथील एका चिमुकल्याने फुगा गिळल्यामुळे त्याला तात्काळ उपचाराची गरज होती. परंतु, बेलकडे ते कुरूळ दरम्यानच्या रस्त्याच्या कामामुळे जीवघेणी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. त्यातच पोलिसांचा फौजफाटा देखील कमी होता. अलिबागेत पोहोचण्यासाठी बेलकडे फाट्यावरून जेमतेम १० मिनिटांचा कालावधी लागतो. परंतु, त्या दिवशी तब्बल दिड ते दोन तासांचा कालावधी लागत होता. त्यामुळे त्या चुमकल्याला अलिबागेतील रूग्णालयात वेळेवर पोहोचवता आले नाही. त्यामुळे त्या चिमुकल्याचा नाहक बळी गेला. या घटनेमुळे सर्वस्तरातून हळहळ व्यक्त होत असून, संबंधित प्रशासनावर देखील नाराजी व्यक्त केली जात आहे. दरम्यान, विकासकामे झाल्यावर श्रेयवादासाठी झगडणारे स्थानिक लोकप्रतिनिधी अशी दुदैवी घटन घडल्यावर कुठे हरवतात, असा संतप्त सवाल सर्वसामान्यांमधून उपस्थित केला जात आहे.

लोकसंसद

सचिनची 'बॅटोग्राफी' उदयोन्मुख क्रिकेटपटूंसाठी प्रेरणादायी !

१६ नोव्हेंबर २०१३ यादिवशी मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर जगविख्यात क्रिकेटपटू भारतरत्न सन्मानित सचिन तेंडुलकर आपला २०० वा आणि शेवटचा कसोटी सामना खेळला. त्याच्या निवृत्तीला १३ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने १६ नोव्हेंबर २०२६ रोजी वानखेडे स्टेडियमवरील 'एमसीए शरद पवार क्रिकेट म्युझियम'मध्ये 'बॅटोग्राफी' (बॅट्सच्या माध्यमातून मांडलेला क्रिकेट प्रवास) नावाच्या अनोख्या वस्तुसंग्रहाचे अनावरण करण्यात आले. या 'बॅटोग्राफी' संग्रहामध्ये सचिनच्या १९७८ पासून ते २०१३ मधील शेवटच्या कसोटीपर्यंतच्या प्रवासातील निवडक २५ ऐतिहासिक बॅट्स प्रदर्शित करण्यात आल्या असून प्रत्येक बॅट ही त्याच्या कारकिर्दीतील एका गाजलेल्या ऐतिहासिक क्षणाची आठवण करून देते. १९७८ साली वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षी मोठी बहीण सविता हिने काश्मीरमधून आणून दिलेली पहिली काश्मीर विलो बॅट, १९९० मध्ये वयाच्या १७ व्या वर्षी मँचेस्टर येथे झळकावलेल्या पहिल्या कसोटी शतकाची बॅट तसेच १६ मार्च २०१२ रोजी मीरपूर येथे शतकांचे महाशतक (१०० वे आंतरराष्ट्रीय शतक) पूर्ण करणारी बॅट या ठिकाणी ठेवण्यात आली आहे. याशिवाय १९९८ मध्ये महान फलंदाज सर डॉन ब्रॅडमन यांनी सचिनला भेट दिलेली खास बॅट आणि २००३ च्या दक्षिण आफ्रिकेतील एकदिवसीय विश्वचषकात सचिनला 'मालिकावीर' पुरस्कार मिळवून देणारी बॅट या संग्रहात आहेत. याशिवाय या संग्रहात त्याचे पहिले हेल्मेट, रणजी ट्रॉफीची जर्सी आणि निरोपाच्या भाषणाची मूळ प्रतही येथे जतन केली गेली आहे.

-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

भारतीय सिनेसृष्टीचे पितामह - व्ही. शांताराम



भारतीय सिनेसृष्टीचे पितामह शांताराम राजाराम वणकुद्रे उर्फ व्ही. शांताराम यांची आज जयंती आहे. शांताराम बापू या नावानं सुद्धा ते ओळखले जातात. १८ नोव्हेंबर १९०१ साली कोल्हापुरात जन्मलेल्या शांताराम बापूंनी निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता अशा तिन्ही क्षेत्रांत आपला खोल ठसा उमटवला. दिग्दर्शक म्हणून अनेक नवीन संकल्पना त्यांनी पहिल्यांदा भारतीय चित्रपटसृष्टीत वापरल्या. सुमारे सहा दशकं ते सिनेसृष्टीत कार्यरत होते. त्यांनी भारतीय सिनेसृष्टीला एकापेक्षा एक हिट सिनेमे दिले आहेत.

व्ही. शांताराम यांनी लहान वयातच १९१४-१५ साली गंधर्व नाटक कंपनीत प्रवेश मिळवला. त्यानंतर महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या माध्यमातून त्यांनी सुरेखा हरण या मूकपटाच्या माध्यमातून रुपेरी पडद्यावर पदार्पण केलं. बाबुराव पेंटर दिग्दर्शित या पहिल्याच सिनेमात ते कृष्णाच्या भूमिकेत होते. सिंहगड, श्रीकृष्णावतार, सती पद्मिनी, शहाला शह, सावकारी पाश, राणा हमीर, माया बाजार, गजगौरी, भक्त प्रल्हाद, मुरलीवाला, सती सावित्री, महारथी कर्ण आणि बाजीप्रभू देशपांडे हे व्ही. शांताराम यांचे गाजलेले ऐतिहासिक आणि पौराणिक सिनेमे आहेत. १९२७ साली नेताजी पालकर या सिनेमाच्या माध्यमातून त्यांनी दिग्दर्शन क्षेत्रात पदार्पण केलं. व्ही. शांताराम यांचा संत तुकाराम हा सिनेमा जगातील तीन सिनेमांतील एक उल्लेखनीय सिनेमा मानला जातो.

एकीकडे पौराणिक सिनेमा बनवीत असतानाच शांताराम बापूंनी अनेक उत्तमोत्तम सामाजिक सिनेमांची निर्मिती केली. जरठ विवाहावर टीका करणारा कुंकू, वेश्येच्या पुनरुज्जीवनावर भाष्य करणारा माणूस, हिंदू-मुस्लिक दंगलीच्या पार्श्वभूमीवर मैत्रीचा संदेश देणारा शेजारी हे त्य

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१८ नोव्हेंबर

१) श्रीम.हेमलता पुरूषोत्तम प्रभू
घरतआळी, अलिबाग
दि. १८-११-१९५२
२)श्री.भरत रामचंद्र सातपुते
अलिबाग दि.१८-११-१९५४

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)

- मुख्य संपादक,कृषीवल

आजचे अन्नदाते

विमल सॉ मिल उचेडे पेण



कै.लक्ष्मीबाई दामोदर पाटील स्मरणार्थ अलिबाग

एसटीचे वेळापत्रक कोलमडले

■ जिल्हांतर्गत प्रवासाला मोठा ब्रेक; प्रवाशांचे हाल

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

दिवाळी सण आणि कार्तिकी वारीमुळे रत्नागिरी विभागातील एसटी बसेस लांब पल्ल्याच्या मार्गांवर धावत आहेत. परिणामी एसटी बसेसचे वेळापत्रक कोलमडल्याचे चित्र समोर आले आहे. राजापूर, लांजा, चिपळूण, संगमेश्वर यांसह ग्रामीण भागातील प्रवाशांना एसटीची तासन्तास वाट पाहावी लागत आहे, तर बस ब्रेक डाऊन होण्याचे प्रमाण वाढल्याने प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

आषाढी वारीनंतर कार्तिकी वारीला वारकरी संप्रदायात मोठे महत्त्व असते. त्यामुळे राज्यभरातून लाखो भाविक लाडक्या विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपुरात दाखल होतात. कोकणातील वारकरी आणि भाविकांचा प्रवास सुखकर व सुरक्षित व्हावा, यासाठी रत्नागिरी विभागाने जादा गाड्यांचे आरक्षण सुरू केले. या अंतर्गत रत्नागिरी विभागातून दिवाळी सणानिमित्त ६५० आणि कार्तिक वारीनिमित्त १४६ एसटी बसेसचे नियोजन करण्यात आले होते. पश्चिम महाराष्ट्रासह मुंबई, पुणे, विदर्भ आणि मराठवाडा या मार्गांवर जादा बसेस धावत असल्याने जिल्ह्यातील प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत.



दिवाळी आणि कार्तिकी वारीच्या पार्श्वभूमीवर लांब पल्ल्याच्या गाड्यांचे नियोजन करण्यात आल्यामुळे दोन दिवसांत कित्येक बसेस पंढरपूरला रवाना झाल्या आहेत. ज्यामुळे जिल्हांतर्गत प्रवासाला मोठा ब्रेक बसला आहे. लांजा, पाली, राजापूर, चिपळूण, संगमेश्वर, गणपतीपुळे, जयगड यांसह ग्रामीण भागातील विविध भागांमधील प्रवाशांना एसटीची मोठी प्रतीक्षा करावी लागत आहे. नोकरदार, व्यापारी, प्रवासी, पर्यटक आणि चाकरमानी यांना यामुळे तीव्र त्रास सहन करावा लागत आहे. एसटी वेळेवर येत नसल्यामुळे नाईलाजास्तव प्रवाशांना वडाप, मिनी बस किंवा चारचाकी वाहनांनी रत्नागिरी गाठावी लागत आहे.

पासधारकांची मोठी अडचण

रत्नागिरी विभागात मागील काही महिन्यांत टप्प्याटप्प्याने १०४ राजमाता जिजाऊ बसेस दाखल झाल्या आहेत. असे असतानाही रत्नागिरी ते राजापूर, लांजा, पाली, चिपळूण, देवरूख या मार्गावर साध्याऐवजी स्लीपर बसेस सोडण्यात येत आहेत. स्लीपर बसेसमध्ये पासधारकांना प्रवेश देत नसल्यामुळे पासधारकांची मोठी अडचण होत असून त्यांना आणखी तासभर थांबावे लागत आहे. तसेच सामान्य प्रवाशांना जास्त पैसे देऊन प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे सणासुदीच्या काळात जिल्हांतर्गत वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी योग्य नियोजन करणे आणि लांब पल्ल्याच्या मार्गावर स्लीपर बसेस सोडण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.

डॉ. दत्ताजीराव पाटील, कुरियन डॅनिएल यांना जीवनगौरव



खांदा कॉलनी : प्रशिक्षण, मनुष्यबळ विकास आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे कुरियन डॅनिएल आणि डॉ. दत्ताजीराव पाटील यांना इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंटच्या (आयएसटीडी) वतीने प्रतिष्ठेचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नवी मुंबई शाखेतर्फे आयोजित पश्चिम विभागीय परिषद २०२६ मध्ये हा गौरव करण्यात आला. नवी मुंबईतील नेरूळ येथील डी.वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लॉ येथे ३० आणि ३१ ऑक्टोबर रोजी या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी कॅप्टन बी. व्ही. जे. के. शर्मा यांच्या हस्ते दोन्ही मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार म्हणजे केवळ दोन व्यक्तींचा सन्मान नसून त्यांच्या प्रदीर्घ सेवाभावाचा, दूरदृष्टीचा आणि संस्थात्मक बांधिलकीचा गौरव आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

दिवाळी प्रदर्शन, विक्री महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद



। माथेरान । प्रतिनिधी ।

माथेरान नगरपरिषदेच्या विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या दिवाळी प्रदर्शन व विक्री महोत्सवास ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महिला बालकल्याण समिती सभापती ऐश्वर्या निखिल शिंदे यांच्या संकल्पनेतून हा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. याकामी महिला बचत गटांच्या पुढाकाराने हा महोत्सव अत्यंत उत्साहात पार पडला. महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, यासाठी त्यांनी स्वतः बनविलेल्या आकर्षक वस्तू, दिवाळी फराळ, अल्पोपहार खाद्यपदार्थ विक्री चांगल्या प्रकारे झाल्याने महिला बचत गटांच्या सदस्यांनी समाधान व्यक्त केले आहे. असेंब्ली हॉलच्या प्रांगणात नगरपरिषदेच्या वतीने आठ दिवस स्टोल्स उभारले होते. यामध्ये गावातील महिला बचत गटांच्या महिलांनी विविध आकर्षक वस्तू आणि दिवाळी फराळ विक्रीसाठी उपलब्ध करून दिले होते. त्यास पर्यटकांसह स्थानिक नागरिकांनी खरेदीसाठी गर्दी केली होती.

"आम्ही पहिल्यांदाच असे स्टोल्स उभारून स्वत: बनविलेले दिवाळी फराळ विक्रीसाठी ठेवले होते. आम्हाला ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. अन्य महिलांनी सुध्दा काही आकर्षक वस्तू विक्रीसाठी ठेवल्या होत्या. सर्वांना चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळाला.
– मिताली कदम, अध्यक्षा, प्रगती महिला बचत गट–माथेरान"

प्रशांत नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त शिबीर

अधिक माहितीसाठी अनिल चोपडा, प्रकाश राठोड, संजय कांबळे, सागर भगत, कपिल अनुभवणे, युगांत म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

भरधाव कारच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, मच्छिंद्र यांचा जागीच मृत्यू झाला.

मच्छिंद्र यांच्या पश्चात गर्भवती पत्नी, दोन भाऊ आणि एक बहीण असा परिवार आहे. बाळ जन्माला येण्यापूर्वीच त्याच्या डोक्यावरील पितृछत्र हरपल्याने कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

याप्रकरणी जनार्दन नारायण घासे (रा. मुंढाणी, ता. पेण) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कारचालक अमित राजकुमार सिंग (सध्या रा. गांधी चौक, नागोठणे) याच्याविरोधात नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे पुढील तपास करीत आहेत.

कर्जतचं नेपाळ होणार!

महाप्रलयाचा धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती पर्यावरणप्रेमींकडून व्यक्त होत आहे.

कर्जत शहर तीन बाजूंनी डोंगरांनी वेढलेल्या सखल भागात वसलेले आहे. डोंगरमाथ्यावर धरणे आणि खाली गाव-वस्त्या अशी भौगोलिक रचना आहे. धरणांसाठी सह्याद्रीच्या डोंगरांमध्ये मोठ्या प्रमाणावर ब्लास्टिंग झाल्यास डोंगरांच्या नैसर्गिक रचनेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यात धरणांमधील प्रचंड पाणीसाठ्याचा जमिनीवर येणारा दाब आणि भूगर्भीय हालचाली यांचा संभाव्य परिणामही गांभीर्याने तपासण्याची गरज आहे.

भूकंपासारखी नैसर्गिक आपत्ती आली आणि त्यात धरणाला तडे गेले किंवा धरणफुटी झाली, तर वरच्या भागातील लाखो घनमीटर पाणी वेगाने खाली येऊ शकते. कर्जतचा सखल भाग, डोंगरांच्या पायथ्याशी असलेली गावे आणि शहरातील वस्ती यामुळे मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नेपाळ आणि केदारनाथ येथील आपत्तींचे उदाहरण देत पर्यावरणप्रेमी या संभाव्य धोक्याकडे लक्ष वेधत आहेत. विशेष म्हणजे, हा धोका केवळ एका गावापुरता किंवा एका वाडीपुरता मर्यादित राहणार नाही, तर संपूर्ण तालुक्याच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे धरणांची उभारणी, डोंगरांमधील ब्लास्टिंग आणि त्याचे पर्यावरणीय परिणाम यांचा स्वतंत्र व शास्त्रीय अभ्यास होणे आवश्यक आहे.

विकासाच्या नावाखाली कर्जतच्या नैसर्गिक रचनेशी किती मोठा हस्तक्षेप केला जात आहे, याचा सरकारने गांभीर्याने विचार करावा. भविष्यातील पिढ्यांचे अस्तित्व आणि कर्जतची सुरक्षितता धोक्यात येऊ नये, यासाठी सर्व धरण प्रकल्पांच्या संभाव्य परिणामांचा फेरआढावा घ्यावा आणि टोरंटच्या प्रस्तावित प्रकल्पाला विरोध करण्यासाठी कर्जतकरांनी एकजुटीने भूमिका घ्यावी, असे आवाहन पर्यावरणप्रेमींकडून केले जात आहे.

चिमुकल्याच्या मृत्यूप्रकरणी शेकाप आक्रमक

हाती घेण्यात आले. मात्र, दिवाळीनंतर प्रत्यक्ष काम सुरू करण्याच्या सूचना वाहतूक विभागाने संबंधित ठेकेदाराला दिल्या होत्या. असे असतानाही ठेकेदाराने पोलिसांच्या सूचनांना केराची टोपली दाखवत ऐन दिवाळीच्या हंगामात काम सुरू केले. पर्यायी रस्त्याची

पान १ वरुन

व्यवस्था करण्याबाबत प्रशासन आणि ठेकेदार उदासीन राहिल्याने या मार्गावरील वाहतुकीचा बोजवारा उडाला.

गेल्या चार दिवसांपासून शाळा, महाविद्यालये, नोकरी-व्यवसायासाठी जाणारे नागरिक आणि विद्यार्थ्यांना प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. सोमवारी दुपारी बामणगावमधील खारीकपाडा येथील दोन वर्षांचा आरांश ठाकूर हा बालक या कोंडीत अडकला. रुग्णालयात वेळेत पोहोचता न आल्याने त्याला योग्य उपचार मिळू शकले नाहीत. अखेर या चिमुकल्याचा मृत्यू झाला. एका निष्पाप बालकाचा जीव गेल्यानंतरही प्रशासनाला जाग येणार नाही का, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. या घटनेला ठेकेदार आणि प्रशासनाचा निष्काळजीपणा व नियोजनशून्य कारभार जबाबदार आहे. त्यामुळे संबंधितांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून बालकाच्या नातेवाईकांना प्रशासन आणि ठेकेदाराने आर्थिक मदत द्यावी. भविष्यात वाहतूक कोंडीमुळे अशा घटना घडू नयेत, यासाठी तातडीने पर्यायी रस्त्याची व्यवस्था करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा सुरेश घरत यांनी दिला आहे.

दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना शुल्कमाफीचा ठेंगा!

उताऱ्यांची काटेकोर पडताळणी करण्याची जबाबदारी महाविद्यालयांवर टाकल्याने अर्ज प्रक्रियेतही दिरंगाई होत आहे.दुष्काळाचा फटका विद्यार्थ्यांना बसत असताना त्यांना दिलासा देण्याऐवजी कागदपत्रे आणि अटींच्या जंजाळात अडकवण्याचे काम शासन आणि प्रशासनाकडून सुरू असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. घोषणा मोठ्या करायच्या; मात्र लाभ देताना हात आखडता घ्यायचा, हे धोरण विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणारे आहे. श्रीवर्धन तालुक्यातील शुल्कमाफीच्या लाभार्थ्यांची आकडेवारी तातडीने जाहीर करावी, स्थलांतरित पालकांबाबतची अट रद्द करावी आणि इतर जाचक निकष शिथिल करून सर्व पात्र गरजू विद्यार्थ्यांना शुल्कमाफी द्यावी, अशी जोरदार मागणी पालक आणि विद्यार्थी संघटनांकडून होत आहे.

न्यायालयीन कर्मचारी रस्त्यावर!

हे तत्त्व लागू करावे, या प्रमुख मागण्या कर्मचाऱ्यांनी लावून धरल्या आहेत. अलिबाग जिल्हा न्यायालयासमोर रस्त्याच्या बाजूला कर्मचाऱ्यांनी ठिय्या आंदोलन सुरू केले असून, कामकाज बंद ठेवत बेमुदत संपाची भूमिका घेतली आहे. या संपामुळे न्यायालयातील नियमित कामकाज विस्कळीत झाले असून, पक्षकार आणि वकिलांची गैरसोय होत आहे. न्यायालयीन कामकाजावर मोठा परिणाम होऊ नये, यासाठी न्यायालय प्रशासनाने विधी स्वयंसेवकांची मदत घेतली आहे. त्यांच्या माध्यमातून सकाळपासून कामकाज सुरू ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

सेवानिवृत्तांचे अन्नत्याग साखळी उपोषण

न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनीही एल्गार पुकारला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांसाठी प्रस्तावित केलेल्या वेतनवाढीच्या प्रस्तावाला शासनदरबारी दिरंगाई होत असल्याचा आरोप करीत मंगळवारी (दि. १७) सकाळपासून अलिबाग जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अन्नत्याग साखळी उपोषण सुरू करण्यात आले. वेतनवाढीचा प्रस्ताव गेल्या २० महिन्यांपासून प्रलंबित असून, शासनाकडून कोणताही निर्णय घेतला जात नसल्याने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनीही आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. या उपोषणात सुरेश महाडीक, अनंत लोहार, प्रणिता पाटील, तनुजा पाटील, गीता पवार, रामभाऊ कांबळे यांच्यासह शंभरहून अधिक कर्मचारी सहभागी झाले आहेत. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी अन्नत्याग करून आंदोलन सुरू केले आहे.

जिल्ह्यात भातझोडणीला वेग

भात झोडणीनंतर मिळणारे धान्य म्हणजे शेतकऱ्यांसाठी वर्षभराच्या मेहनतीची खरी कमाई. घरच्या वापरासाठी वर्षभराचे धान्य साठवण्याबरोबरच काही शेतकरी भातविक्रीतून आर्थिक उत्पन्न मिळवतात. त्यामुळे हातात आलेले पीक पाहून शेतकरी कुटुंबांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. पनवेल तालुक्यात शहरीकरणाचा वेग वाढत असताना अनेक ठिकाणी शेतीक्षेत्र कमी होत आहे. मात्र, प्रतिकूल परिस्थितीतही ग्रामीण भागातील शेतकरी भातशेतीची परंपरा जपत आहेत. पावसाळ्यात चिखलात राबणाऱ्या हातांना आता भाताच्या रूपाने सोन्यासारखे पीक मिळत आहे. दिवाळीच्या रोषणाईसोबतच शेतात पसरलेला पिवळ्या धान्याचा सडा बळीराजासाठी खऱ्या अर्थाने आनंदाची दिवाळी ठरत आहे.

डॉ. शीतल जोशींचे पद धोक्यात!

धोक्यात आले आहे.सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत येणाऱ्या रुग्णालयांमध्ये मंजूर आकृतिबंधानुसार अधिकाऱ्यांची पदस्थापना होणे आवश्यक आहे. रुग्णालयांमध्ये विशेष सेवा उपलब्ध करून देण्यासाठी मंजूर पदांनुसार विशेषतज्ज्ञांची नियुक्ती करणे अपेक्षित आहे. याच प्रशासकीय कारणास्तव अतिरिक्त पदभार सांभाळणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांच्या मूळ पदावर कार्यरत राहण्याचे आदेश आरोग्य विभागाने दिले आहेत.

यामध्ये डॉ. शीतल जोशी यांचाही समावेश असून, त्यांना अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सकपदाऐवजी शरीर विकृतीशास्त्रज्ञ या मूळ पदावर काम करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र, आदेशाची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. वरिष्ठ विभागाचे आदेश असतानाही कार्यमुक्ती रखडल्याने रुग्णालयातील प्रशासकीय कारभाराबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

चरी संपाचा वर्धापन दिन होणार भव्यदिव्य

देण्यासाठी यंदाचा चरी संपाचा वर्धापन दिन चरी या ठिकाणी साजरा केला जाणार आहे. यावर्षी सकाळी शाळेतील विद्यार्थ्यांमार्फत प्रभातफेरी काढण्यात येणार आहे. त्यानंतर स्मारक पूजन, स्वागत, प्रास्ताविक, मान्यवरांची भाषणे, खारेपाटातील स्थानिक कलाकारांद्वारे कला पथकाचे सादरीकरण, शेतकऱ्यांना शेती अवजारे वाटप तसेच शाळेतील मुले व मुलींना सायकल वाटपाचा कार्यक्रम यानिमित्ताने होणार आहे. सकाळी नऊ वाजल्यापासून सुरु होणारा हा कार्यक्रम संध्याकाळपर्यंत असणार आहे. चरीच्या संपामुळे देशातील शेतकऱ्यांना त्यांचे हक्क मिळाले आहेत. त्यामुळे या संपाचे महत्त्व आजच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी एक भव्यदिव्य असा कार्यक्रम घेतला जाणार आहे. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील नागरिक, शेतकरी व सर्व घटकातील मंडळींनी उपस्थिती राहावे, असे आवाहन चित्रलेखा पाटील यांनी केले.

स्थानिक, शेतकऱ्यांचा विचार करून प्रकल्प उभारावे

शेतकरी कामगार पक्ष शेतकऱ्यांच्या पाठीशी कायमच ठाम उभा आहे. शेतकऱ्यांचे नेते स्व. नारायण नागू पाटील यांच्याकडून मिळालेल्या प्रेरणेतूनच शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी शेकाप लढत आहे. सध्या कार्पोरेट खोती उदयास आली आहे. त्यांच्यामार्फत शेतकऱ्यांची पिळवणूक होत आहे. प्रकल्पाला कधीही विरोध नाही. परंतु शेतकरी, तेथील पर्यावरणाचा विचार करून प्रकल्प आणणे गरजेचे आहे. प्रकल्प उभारत असताना त्यापूर्वी स्थानिकांना रोजगार मिळेल अशा पद्धतीने कौशल्य विकासाचे उपक्रम राबविणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच प्रकल्प उभे केले पाहिजे. टोरंट प्रकल्पाबाबत शेतकरी, स्थानिक यांना विश्वासात घेऊन निर्णय सरकारने घेणे गरजेचे आहे. झाडे जगली पाहिजेत, जनसुनावण्या योग्य पद्धतीने होणे अपेक्षित आहे. प्रकल्प उभारत असताना तंत्रज्ञानाचा वापर होतो, मात्र देशातील नागरिकांना रोजगार मिळावा, यासाठीदेखील प्रयत्न होणे गरजेचे आहे, असेही चित्रलेखा पाटील म्हणाल्या.

मच्छिमार आक्रमक

खाडीत मासेमारी करून उदरनिर्वाह करीत आहेत. २००४ मध्ये राजपुरी खाडीतील दिघी बंदरात दिघी पोर्टची निर्मिती झाल्याने मासेमारीचे क्षेत्र कमी झाले. त्याचा विपरीत परिणाम मासेमारी व्यवसायावर झाला असून, आधीच संकटात सापडलेल्या मच्छिमारांसमोर आता नव्या पुलाचे संकट उभे राहिले आहे.

मुरूड तालुक्यातील टोकेखार आणि म्हसळा तालुक्यातील तुरूंबाडीदरम्यान प्रवासी पूल उभारण्याच्या हालचाली सुरू आहेत. १३ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री यांच्या हस्ते या कामाचे भूमीपूजनही करण्यात आले. मात्र, स्थानिक मच्छिमारांना विश्वासात न घेताच भूमीपूजन सोहळा पार पडल्याचा आरोप करण्यात येत आहे. प्रस्तावित पुलामुळे राजपुरी खाडीतील १३ कोळीवाड्यांमधील मच्छिमारांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर होणार आहे. हजारो कुटुंबांचे पारंपरिक मासेमारी व्यवसायाचे साधनच नष्ट होण्याची भीती विजय गिदी यांनी व्यक्त केली आहे. सरकारने मच्छिमारांच्या उपजीविकेचा विचार करून राजपुरी खाडीवरील १३ कोळीवाड्यांची पाहणी करावी आणि अटल सेतूप्रमाणे प्रत्येक कुटुंबातील सदस्याला मोबदला द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. अन्यथा पुलाच्या कामासाठी एकही दगड लावू देणार नाही. १५ दिवसांत मागण्यांवर निर्णय न झाल्यास मच्छिमार सागरी आंदोलन छेडतील, असा स्पष्ट इशारा विजय गिदी यांनी दिला आहे.

पंतप्रधानांच्या दौऱ्यासाठी रस्ता उखडला

भूमीपूजनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी येणार असल्याने लाखाची वाडी येथे जमीन सपाटीकरणाचे काम सुरू आहे. हेलिपॅड ते कार्यक्रमस्थळापर्यंत जाण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याच्या कामाची निविदा काढली. मात्र, निविदा प्रक्रिया पूर्ण होण्याआधीच सावळे गावाकडे जाणारा रस्ता खोदून ठेवण्यात आला. त्यानंतर महिनाभर उलटूनही रस्त्याचे काम झाले नाही. पंतप्रधानांचा दौरा रद्द झाला, मात्र ग्रामस्थांच्या वाट्याला खोदलेला रस्ता आला. प्रशासनाच्या या कारभारामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी थेट कामाच्या ठिकाणी धडक देत सपाटीकरणाचे काम बंद पाडले. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अनेक दुचाकीस्वार घसरून पडले असून, एका महिलेलाही दुखापत झाली आहे. मंजुरी नसताना रस्ता खोदला कशासाठी, असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला. यावेळी पोलिसांनी घटनास्थळी येऊन आंदोलनाबाबत ग्राम स्थांना सूचना केल्या.

रस्त्याच्या कामासाठी साडेतीन लाखांचा निधी मंजूर असून, निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. येत्या दोन दिवसांत ठेकेदार निश्चित होऊन कामाला सुरुवात होईल.**– राहुल देवांग, उपअभियंता, सा.बां. विभाग**

निवडक

चेअरमनपदी हितेंद्र म्हात्रेंची निवड

उरण : उरण तालुक्यातील वशेणी गावातील सामाजिक कार्यकर्ते तथा आदर्श शिक्षक हितेंद्र म्हात्रे यांची पेण प्राथमिक शिक्षक पतपेढीच्या चेअरमनपदी निवड झाली आहे. तर व्हाईस चेअरमनपदी विठोबा पाटील यांची निवड झाली आहे. उरण तालुक्यातील वशेणी गावातील सामाजिक कार्यकर्ते हितेंद्र म्हात्रे हे हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे निष्ठावंत कार्यकर्ते असून ते आदर्श शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी गोर गरीबांच्या कल्याणासाठी अहोरात्र मेहनत घेतली असून शासनस्तरावर सर्वसामान्य जनतेला व शिक्षकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. अशा होतकरू तथा आदर्श शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या हितेंद्र म्हात्रे यांची पेण प्राथमिक शिक्षक पतपेढीच्या चेअरमनपदी झाल्याने त्यांचे अभिनंदन केले जात आहे.



(छायाचित्र : संजय गायकवाड)

जागतिक मधुमेह दिन उत्साहात

कर्जत : कर्जत लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, हेल्थकेअर कर्जत टीम व टास्क फोर्स टीम, कर्जत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मधुमेह दिनानिमित्त कोंदिवडे व सालपे गावात मधुमेह जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रात मधुमेह म्हणजे काय, त्याची कारणे, लक्षणे, धोके, प्रतिबंधात्मक उपाय, संतुलित आहार, नियमित व्यायाम, रक्तातील साखर तपासणी व औषधोपचार याबाबत तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. ग्रामस्थांच्या शंकांचेही यावेळी निरसन करण्यात आले. या जनजागृती सत्राला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कोंदिवडे गावात १३, तर सालपे गावात ३३ असे एकूण ४६ लाभार्थी उपस्थित होते. यावेळी हेल्थकेअर कर्जत टीमच्या मेडिकल ऑफिसर डॉ. मिनल जाधव, परिचारीका सारिका वेहेले, मेडिकल सोशल वर्कर केशव कवठे आणि हेल्थ एज्युकेटर तन्वेश कदम उपस्थित होते. तसेच टास्क फोर्स टीमचे प्रमुख दशरथ देशमुख व सर्व टास्क फोर्स सदस्य व ग्रामस्थ यावेळी हजर होते. ग्रामीण भागात आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या टास्क फोर्स टीमच्या वतीने सर्व सहभागी ग्रामस्थ व हेल्थकेअर टीमचे आभार मानण्यात आले.

कल्याणमध्ये हुक्का पार्लरवर धाड

कल्याण: कल्याण साईचौकातील ऑर्बिट कमर्शियल कॉम्प्लेक्समध्ये सुरू असलेल्या बेकायदेशीर हुक्का पार्लरवर खडकपाडा पोलिसांनी कारवाई केली आहे. द व्हिंटेज स्काय लॉज या नावाने हुक्का पार्लर चालवला जात होता. रात्री सवा अकराच्या सुमारास छापा टाकण्यात आला. याप्रकरणी पार्लरच्या मालकासह व्यवस्थापक, कर्मचारी आणि ग्राहकांसह एकूण वीस जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जागेचा मालक अजीम कांबळे, मॅनेजर हुसेन कल्याणवाला, कॅशियर साहिल आसरानी, हुक्का मेकर रवी दास आणि चार वेटर हे चौघेजण हुक्का पार्लर चालवत होते. सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करण्यास बंदी असतानाही या ठिकाणी तंबाखूजन्य आणि ज्वालाग्राही हुक्का ग्राहकांना पुरवला जायचा. पोलिसांच्या छाप्यादरम्यान बारा ग्राहक हुक्का ओढताना आढळून आले. मालक, व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यांसह हंजला शहा, अकबाल अली, अफ्तार अली, इरफान शेख, हितेश मंगलानी, आसीर काझी, अजलाम शेख, उमर मोहम्मद, नबील खान, सूरज सिंग, अक्षय पाटील आणि अल्पेश म्हात्रे यांच्यासह एकूण वीस जणांविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

वीस जणांवर गुन्हा दाखल

दुष्काळी गावांत जलसंधारणाची मोहीम

मुंबई : राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश दिले आहेत. राज्यातील ट्रिगर-१ आणि ट्रिगर-२ लागू झालेल्या ३०४ तालुक्यांमध्ये प्रत्येक गावात किमान १०० जलशोषक खड्डे तयार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय नाल्यांचे खोलीकरण आणि रुंदीकरण, बंधाऱ्यांची दुरुस्ती तसेच जलसाठ्यांच्या संवर्धनाची कामे हाती घेण्याच्या सूचना मृदू व जलसंधारण विभागाला देण्यात आल्या आहेत. या कामांसाठी मृदू व जलसंधारण विभागाच्या योजनांसह उपलब्ध निधीचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित कामांचे नियोजन करताना गावपातळीवरील पाणीटंचाई आणि स्थानिक गरजांचा विचार करण्यास सांगण्यात आले आहे. जलसंधारणाच्या कामांमुळे पावसाचे पाणी अडविणे आणि जमिनीत मुरविण्यास मदत होईल, या उद्देशाने ही उपाययोजना आखण्यात आली आहे. दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता कायम ठेवण्यासाठी राज्य शासनाने चारापिकांच्या लागवडीला प्राधान्य देण्याचे निर्देश दिले आहेत. कृषी विभागाच्या अखत्यारितील जमिनींवर मका, न्यूट्रीफीड, शुगरग्रास, ज्वारी आणि बाजरी यांसारख्या चारापिकांची लागवड करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

प्रत्येक गावात १०० जलशोषक खड्डे



आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

पाली : लाईफ ऑफ लाईफ ट्रस्ट आणि लँडमार्क केअर्स यांच्या सौजन्याने तसेच फिरता दवाखाना युनिटच्या सहकार्याने सुधागड तालुक्यातील दुर्गम अशा गौळमाळ गावात जागतिक मधुमेह दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित विशेष आरोग्य जनजागृती शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत आरोग्य सुविधा पोहोचवणे आणि मधुमेहाविषयी योग्य व शास्त्रीय माहिती देणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋतुजा रमाकांत शिंदे, परिचारिका मानसी शिवडावकर, औषधीतज्ज्ञ मुस्कान गुप्ता आणि आरोग्य शिक्षिका प्रियंका शिद यांनी विशेष परिश्रम घेतले. या आरोग्य शिबिराचा गौळमाळ गावातील ५२ ग्रामस्थांनी प्रत्यक्ष लाभ घेतला. ग्रामीण भागात अशा उपक्रमांमुळे मधुमेह व इतर असंसर्गजन्य आजारांबद्दल लोकांमध्ये सकारात्मक आणि आरोग्याची योग्य जागरूकता निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. या स्तुत्य उपक्रमाबद्दल ग्रामस्थांकडून आयोजकांचे आभार मानण्यात आले. कार्यक्रमादरम्यान दृकश्राव्य माध्यमातून ग्रामस्थांना मधुमेहाचे प्रकार, प्राथमिक लक्षणे, आहारातील आवश्यक बदल, नियमित तपासण्या, योग्य औषधोपचार आणि वेळीच काळजी न घेतल्यास होणारे दुष्परि

निवडक



४० मोबाईल मूळ मालकांना परत

कळंबोली : दिवाळी आणि भाऊबीजेच्या शुभमुहूर्तावर नवी मुंबई पोलिसांनी नागरिकांना एक अनोखी आणि आनंदाची भेट दिली आहे. पनवेल गुन्हे शाखा कक्ष ३ ने तांत्रिक तपासाच्या आधारे नागरिकांचे गहाळ झालेले आणि चोरीला गेलेले १०० हून अधिक मोबाईल फोन शोधून काढले आहेत. यापैकी पहिल्या टप्प्यात संपर्क झालेल्या ४० नागरिकांना पोलीस ठाण्यात बोलावून त्यांचे सुमारे १० लाख रुपये किमतीचे मोबाईल सुपूर्द करण्यात आले.नागरिकांच्या तक्रारींची गंभीर दखल घेत, पनवेल गुन्हे शाखा कक्ष ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने हा तपास हाती घेतला होता. अत्याधुनिक तांत्रिक विश्लेषण आणि सायबर तपासाच्या मदतीने पोलिसांनी विविध ठिकाणांहून हे १०० हून अधिक मोबाईल हस्तगत करण्यात यश मिळवले. भाऊबीजेच्या निमित्ताने आयोजित एका कार्यक्रमात, पहिल्या टप्प्यात ४० तक्रारदारांना त्यांचे हरवलेले मोबाईल परत देण्यात आले. आपला गहाळ झालेला महागडा मोबाईल सणासुदीच्या दिवसांत परत मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद पाहायला मिळाला. उपस्थित नागरिकांनी नवी मुंबई पोलीस आणि विशेषतः वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील व त्यांच्या पथकाचे मनापासून आभार मानले. उर्वरित शोधलेल्या मोबाईलच्या मूळ मालकांशी संपर्क साधण्याची प्रक्रिया सुरू असून, लवकरच दुसऱ्या टप्प्यात तेही मोबाईल परत केले जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांच्या या तत्पर आणि कौतुकास्पद कामगिरीचे सर्वत्र स्वागत होत आहे.

रायगड सहलीतून स्वच्छतेचा संदेश

महाड : साक्षी क्लासेस यांच्या वतीने विद्यार्थी व पालकांसाठी ऐतिहासिक रायगड किल्ल्यावर शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीचा उद्देश विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास, रायगड किल्ल्याचे



ऐतिहासिक महत्त्व आणि स्वराज्याची प्रेरणा प्रत्यक्ष अनुभवातून समजावून देणे हा होता. यासाठी अनुभवी मार्गदर्शकांची व्यवस्था करण्यात आली होती. विद्यार्थ्यांसह पालकांनीही या सहलीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. इतिहासाची माहिती जाणून घेतल्यानंतर परतीच्या प्रवासादरम्यान साक्षी क्लासेसच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कचरा गोळा करून परिसर स्वच्छ करण्यासाठी पुढाकार घेतला. ऐतिहासिक वास्तू, गड-किल्ले आणि पर्यटनस्थळांचे सौंदर्य जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, हा संदेश या माध्यमातून देण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, स्वच्छतेची सवय आणि पर्यावरण संवर्धनाची भावना रुजविण्याचा स्तुत्य प्रयत्न साक्षी क्लासेसने केला. इतिहासाचा अभिमान आणि स्वच्छतेचे भान या विचाराची सुंदर सांगड या सहलीतून घालण्यात आली.

योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

रायगड : मत्स्यव्यवसाय क्षेत्रामध्ये शाश्वत विकासाद्वारे निलक्रांती घडविण्यासाठी प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेच्या धर्तीवर मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना अंतर्गत ६ राज्यस्तरीय व १९ जिल्हास्तरीय योजनांना तसेच सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या ३ जिल्हास्तरीय योजनांमध्ये सुधारणा करण्यात आलेल्या असून कृषी व पदुम विभागाच्या निर्णयान्वये मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना अंमलात आलेली आहे. होतकरू लाभार्थी आणि मच्छिमार बांधवांनी मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेचा लाभ घेवून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय रायगड-अलिबाग जे.एस. पटेल यांनी केले आहे. महाराष्ट्राने २०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्र-विकसित भारतासाठी हे ध्येय निश्चित केले असून या योजनांच्या आधारे विकसित महाराष्ट्र २०४७ चे उद्दिष्ट साध्य होण्यास प्रोत्साहन मिळेल व मच्छिमारांचे आर्थिक उत्पन्नात वाढ होण्यास सहाय्य होईल.मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना ही सर्वसमावेशक योजना असून यामध्ये संस्थेकडे मासेमारीकरीता ठेक्याने असलेल्या पाटबंधारे तलावांची दुरुस्ती, गाळ काढणे व पुनर्जीवन करणे, नवीन मत्स्यसंवर्धन तलाव बांधकाम व निविष्ठा अनुदान, मत्स्य संवर्धन अस्तित्वातील तलावात पॉलीथीकरण अस्तरीकरण, तयार जाळी व बिगर यांत्रिक नौकांवर अनुदान, मच्छिमार महीलांकरिता हॅण्ड ग्लोज व गमबुट उपलब्ध करुन देणे, फिरते मासे विक्री केंद्र, शितपेटी ई-बाईकसह खरेदीसाठी अनुदान, बिगर यांत्रिक नौकांचे यांत्रिकीकरण, पारंपारीक नौकांकरीता जीवरक्षक उपकरणांवर अनुदान, किरकोळ मासळी विक्रेत्यांना साहित्य **खरेदीवर अनुदान, मासे सुकविण्यासाठी सौर सयंत्र खरेदीवर अनुदान, मच्छिमार सहकारी संस्थांचा विकास, नवीन बर्फ कारखाना उभारणे या सारख्या योजनांचा समावेश आहे.**

दळी धारक होणार जमिनींचे मालक

|| ३९ हजार हेक्टरचे सातबारात रूपांतर || भूमिअभिलेख विभागाकडून मोजणी पूर्ण

| रायगड | प्रतिनिधी |

जिल्ह्यातील दळीधारक आदिवासी लवकरच जमिनींचे मालक होणार आहेत. त्यासाठी महसूल विभागाकडून गेल्या दीड महिन्यांपासून विशेष मोहीम राबविली जात आहे. ज्या अंतर्गत ३९ हजार हेक्टर वनपट्ट्यांचे सात बाऱ्यात रुपांतर करण्यात आले असून, लवकरच वन हक्क पट्ट्यांचे वाटप केले जाणार आहे.

रायगड जिल्ह्यातील वनजमिनी मध्ये दळी जमिन हा एक विशेष प्रकार आहे . ह्या जमिनी इंग्रज सरकारने आदिवासींच्या उपजीविकेचे साधन म्हणून कसायला दिल्या होत्या. वैयक्तीकपणे न देता, सामुहिकपणे एकेका वाडीला या जमिनी देण्यात आल्या होत्या. ज्याची नोंद दळीबुक नावाचे रेकोर्ड मध्ये होती. जे वेळोवेळी वनखात्याने अद्ययावत करावयाचे होते. स्वातंत्र्या नंतर फटाक्यांच्या मोठ्या प्रमाणातील आतषबाजीमुळे हवेत धूर आणि सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण वाढते. २.५ आणि १० या सूक्ष्म कणांमुळे श्वसनसंस्थेवर विपरीत परिणाम होऊ शकतो. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनविकार असलेल्या व्यक्तींना याचा अधिक त्रास होण्याची शक्यता असते. रात्री उशिरापर्यंत वाजणाऱ्या मोठ्या आवाजाच्या फटाक्यांमुळे ध्वनीप्रदूषणाचाही प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे सण साजरा करताना पर्यावरण आणि आरोग्याचे भान राखणे आवश्यक बनले आहे.

माणगाव बायपासचे काम अद्याप पूर्ण झालेले नसल्याने मुंबई-गोवा महामार्गावरील वाहनांचा मोठा भार शहरातूनच जात आहे. दिवाळीच्या सुट्ट्या आणि पर्यटन हंगामात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. तासन्तास एकाच ठिकाणी अडकलेल्या वाहनांमधून बाहेर पडणारा धूर शहरातील हवेत मिसळतो. त्यातच महामार्गाच्या बांधकामातून उडणारी माती आणि सिमेंटची धूळ नागरिकांच्या आरोग्यासाठी चिंतेचा विषय ठरत आहे. बायपासचे काम पूर्ण करून वाहतूक शहराबाहेर वळविणे ही काळाची गरज बनली आहे.

माणगावची जीवनदायिनी असलेल्या काळ नदीत सांडपाणी मिसळणे, नागरी कचऱ्याची अयोग्य विल्हेवाट आणि वाढत्या नागरीकरणामुळे जलप्रदूषणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. नदीपात्रातील पाण्याचा रंग बदलणे, दुर्गंधी आणि पृष्ठभागावर दिसणारे तवंग याबाबत नागरिकांकडून चिंता व्यक्त होत आहे. नदीचे अस्तित्व आणि जलचरांचे संरक्षण करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया व्यवस्था प्रभावी करणे आवश्यक आहे.

माणगाव, रोहा परिसरातील प्रस्तावित औद्योगिक प्रकल्प आणि बल्क ड्रग पार्कबाबत स्थानिक नागरिकांनी पर्यावरणीय परिणामांविषयी चिंता व्यक्त केली आहे. वृक्षसंपदा, जलस्रोत आणि जैवविविधतेचे नुकसान होऊ नये, यासाठी प्रकल्पांचे पर्यावरणीय मूल्यमापन पारदर्शकपणे होणे गरजेचे आहे.



प्रश्न कायमचा निकाली निघण्याची शक्यता

गेल्या चार दशकांहून अधिक काळ रखडलेला हा प्रश्न कायमचा निकाली निघण्याची चिन्ह दिसू लागली आहेत. महसूल विभागाने वन हक्क दावे निकाली काढण्यासाठी मोहीम उघडली आहे. ५०८ गावांमधील १ लाख २२ हजार ६२६ हेक्टर दळी जमिनी आहेत. ज्यांपैकी ५८ हजार ७०५ हेक्टर जमिनींचे सात बारा तयार करण्याचे ३३० प्रस्ताव महसूल विभागाकडे वनविभागकडून दाखल करण्यात आले होते. ज्यापैकी भूमिअभिलेख विभागाने ३९ हजार ९२८ हेक्टर वरील २३३ प्रस्तावांची मोजणी पूर्ण केली आहे. यानंतर महसूल विभागाने ३० हजार हेक्टरवरील १७० प्रस्तावांचे सातबारे तयार केले आहेत. त्यामुळे लवकरच या सर्व जमिनी वन हक्क कायद्या अंतर्गत दळी धारकांच्या नावे होणार आहेत. त्यामुळे गेल्या चार दशकांपासून प्रलंबित राहिलेला दळी जमिनींचा प्रश्न सुटण्याची चिन्ह दिसू लागली आहेत.

चार दशकांचा संघर्ष

सत्तरीच्या दशकात महाराष्ट्रभर आदिवासीच्या हक्कांसाठी आंदोलने झाली. यानंतर १९७० ला दळी जमिनी आदिवासींच्या नावावर करण्याचा निर्णय १९७० मध्ये झाला. ज्या दळी जमिनीपैकी कसण्या योग्य जमिनी आदिवासींना द्याव्यात असे ठरले. पण नंतर १९७१ मध्ये हा ठराव दुरुस्त करून सर्वच्या सर्व दळी जमिनी आदिवासीच्या नावावर कराव्यात असा ठराव झाला. सुमारे १० टक्के जमिनी हस्तांतरित झाल्या आणि हे काम बंद पडले. १९८० मध्ये वन संवर्धन कायदा झाला. वनांचा विषय सामायिक सूचित गेला. केंद्र सरकारच्या परवानगी शिवाय जमीन हस्तांतरित होऊ शकत नाही असे सांगून आदिवासींना दळीजमीनीच्या हक्कापासून दूर ठेवण्यात आले होते. आदिवासीना जमीन हक्क देण्याचे अनेक प्रयत्न झाले.

उरणमध्ये सांस्कृतिक केंद्राला मंजुरी

| उरण | वार्ताहर |

आगरी-कोळी संस्कृती आणि स्थानिक कलांचे जतन करण्यासाठी नगर परिषदेच्या माध्यमातून सांस्कृतिक केंद्र उभारण्यात येत आहे. या प्रकल्पाला मंजुरी मिळाली असून, प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाली आहे. केंद्रासाठी आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून केंद्र सरकारकडून तीन कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. हे भवन वर्षभरात पूर्ण करण्याचे नियोजन असल्याची माहिती नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांनी दिली. गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांसाठी स्वतंत्र सांस्कृतिक भवन उपलब्ध नाही. त्यामुळे विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनावर मर्यादा येत आहेत. शहरातील एकमेव राजीव गांधी टाऊन हॉलचे कामही रखडल्याने या अडचणीत भर पडली आहे. ही गरज लक्षात घेऊन सांस्कृतिक केंद्र उभारण्याचा निर्णय घेतला आहे.

दिवाळीनंतर रायगडच्या पर्यावरणाचा श्वास कोंडला!

| माणगाव | प्रतिनिधी |

निसर्गाचे वरदान लाभलेला रायगड जिल्हा आज वाढत्या प्रदूषणाच्या समस्येला सामोरा जात आहे. दिवाळीतील फटाक्यांची आतषबाजी, मुंबई-गोवा महामार्गावरील प्रचंड वाहतूक कोंडी, अपूर्ण रस्ते बांधकामातून उडणारी धूळ, वाढते नागरीकरण आणि औद्योगिक प्रदूषण यामुळे माणगावसह जिल्ह्यातील पर्यावरणावर ताण निर्माण होत आहे. विकासाच्या धावपळीत स्वच्छ हवा, शुद्ध पाणी आणि निसर्गसंपदेचे संवर्धन मागे पडत असल्याची चिंता पर्यावरणप्रेमी नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

दिवाळीच्या काळात

कर्मचारी भरतीबाबत बनावट जाहिरातींचे पेव

| रायगड | प्रतिनिधी |

महावितरणमध्ये तब्बल २३ हजारांवर विविध पदांसाठी कोणतीही परीक्षा किंवा मुलाखत न घेता थेट भरती सुरू असल्याच्या खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या जाहिराती किंवा माहिती सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. केवळ दहावी उत्तीर्ण उमेदवारांसाठी ही भरती असल्याचे सांगत हजारो रुपयांच्या वेतनाचे आमिष दाखवले जात आहे. मात्र या सर्व जाहिराती किंवा माहिती दिशाभूल करणारी असून त्याचा महावितरणशी कोणत्याही प्रकारचा संबंध नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध झालेल्या नाहीत, अशा कोणत्याही बनावट जाहिरातींबाबत उमेदवारांनी सावध राहावे. सर्व पदांच्या भरती प्रक्रियेबाबतची कोणतीही अधिकृत जाहिरात किंवा वेळोवेळी दिली जाणारी माहिती अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाते. उमेदवारांनी महावितरणमधील कर्मचारी भरतीबाबत कोणतीही माहिती किंवा जाहिरातीबाबत अधिकृत संकेतस्थळावर खात्री करून घ्यावी असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

रोहा येथे महिलांसाठी सखी मेळावा

| खांब | प्रतिनिधी |

महिलांमधील आत्मविश्वास, सामाजिक जाणीव, परस्पर संवाद आणिकर्तृत्वालानवीदिशामिळावी, या उद्देशाने रोहा व परिसरातील महिलांसाठी सख्यांसाठी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. नव्या ताकदीने नवे स्वप्न पाहू ही या मेळाव्याची संकल्पना असून १९ नोव्हेंबर रोजी रोहा येथील विवेकानंद रिसर्च अणि ट्रेनिंग इन्स्टिट्यूट येथे हा मेळावा संपन्न होणार आहे.

शिक्षण क्षेत्रात आपल्या उल्लेखनीय कार्याचा ठसा उमटविणाऱ्या तसेच विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजपरिवर्तनासाठी कार्यरत असलेल्या पुणे येथील ज्ञान प्रबोधिनी संस्थेच्या माध्यमातून स्त्री शक्ती प्रबोधन पुणे गटातर्फे शहरी तसेच ग्रामीण भागात महिलांसाठी विविध उपक्रम राबविले जातात.या उपक्रमांची माहिती रोहा व परिसरातील महिलांपर्यंत पोहोचविणे, त्यांना सामाजिक कार्याच्या विविध संधींची ओळख करून देणे, मनमोकळ्या गप्पांमधून एकमेकींना समजून घेणे या मेळाव्यामागील प्रमुख हेतू आहे.

महिलांनी केवळ स्वत:पुरते मर्यादित न राहता एकमेकींच्या सहकार्यने नवी स्वप्ने पाहावीत, स्वत:मधील क्षमता ओळखाव्यात आणि समाजासाठी सकारात्मक योगदान देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असा प्रेरणादायी विचार या मेळाव्यातून पुढे येणार आहे.

मुरुड समुद्रकिनाऱ्याला ब्ल्यू फ्लॅग मानांकनाची प्रतीक्षा

| आगरदांडा | प्रतिनिधी |

श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याला आंतरराष्ट्रीयस्तरावरीलप्रतिष्ठेचेब्ल्यू फ्लॅग मानांकन मिळाल्याचे समोर आले आहे. मात्र, निसर्गसौंदर्याने नटलेला आणि पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेला मुरूड-जंजिरा समुद्रकिनारा अद्याप या मानांकनापासून वंचित असल्याने मुरुडकरांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

मुरूड समुद्रकिनाऱ्याला ब्ल्यू फ्लॅग मानांकन मिळाल्यास शहराच्या पर्यटन विकासाला नवी दिशा मिळू शकते. या मानांकनामुळे समुद्रकिनाऱ्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण होण्यासोबतच पर्यावरण संवर्धन, समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता, सुरक्षितता, पाणी गुणवत्ता आणि पर्यटकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यास मदत होणार आहे.



- **लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेण्याची नागरिकांची अपेक्षा**
- **मुरुडचा समावेश व्हावा; नागरिकांची मागणी**

विशेषतः मुरुड परिसरातील पर्यटन व्यवसायाला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाल्यास पर्यटकांची संख्या वाढण्याची शक्यता असून, हॉटेल व्यवसाय, स्थानिक व्यावसायिक, छोटे दुकानदार, मच्छिमार आणि पर्यटनाशी संबंधित विविध घटकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

मुरुड समुद्रकिनाऱ्याला ब्ल्यू फ्लॅग मानांकन मिळवून देण्यासाठी आवश्यक निकषांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने लोकप्रतिनिधी, नगरपालिका प्रशासन आणि संबंधित शासकीय विभागांनी समन्वयाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याला मिळालेल्या मानांकनाच्या पार्श्वभूमीवर आता मुरुडच्या समुद्रकिनाऱ्यालाही आंतरराष्ट्रीय दर्जाचे ब्ल्यू फ्लॅग मानांकन कधी मिळणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. मुरुडच्या पर्यटन विकासाला नवी झळाळी देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी या विषयात लक्ष घालून ठोस पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा मुरुडकर नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

लक्ष्मण भाये यांना कुणबी जीवन गौरव पुरस्कार

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

म्हसळा तालुक्यातील गोंडघर येथील ज्येष्ठ समाजसेवक लक्ष्मण भाये यांना त्यांच्या उत्तुंग व प्रेरणादायी सामाजिक कार्याची पावती म्हणून कुणबी समाजोन्नती संघ, श्रीवर्धन यांच्यातर्फे अत्यंत प्रतिष्ठित अशा कुणबी जीवन गौरव पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले.

कुणबी समाज मंदिर येथे हा भव्य सोहळा पार पडला. यावेळी असंख्य समाज बांधवांच्या साक्षीने आणि जाहीर सभेत, स्थानिक अध्यक्ष सीताराम साळवी, मुंबई अध्यक्ष सूर्यकांत गीजे, माजी आमदार तुकाराम सुर्वे आणि सुरेश भुवड यांच्या शुभहस्ते लक्ष्मण सुडकोजी भाये यांना त्यांच्या पत्नीसह मानाची घोंगडी, पुणेरी पगडी, स्मृतिचिन्ह, श्रीफळ, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. या नेत्रदीपक सोहळ्यामुळे संपूर्ण श्रीवर्धन परिसरात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.



मुंबई ते पुणे प्रवासाचा वेळ वाचणार

■ अटल सेतू-एक्स्प्रेसदरम्यानचे ६७ टक्के काम पूर्ण

| पनवेल | प्रतिनिधी |

एमएमआरडीएकडून अटल सेतू ते मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेदरम्यान ७.३५ किलोमीटर लांबीचा सहापदरी उन्नत जोडमार्ग उभारला जात आहे. त्याचे ६७ टक्के काम पूर्ण झाले आहे.

हा मार्ग वाहतुकीसाठी खुला झाल्यानंतर दक्षिण मुंबई ते पुणे प्रवासाच्या वेळेत सुमारे ६० ते ९० मिनिटांची बचत होणे अपेक्षित आहे.



अटल सेतूमुळे निर्माण झालेल्या दळणवळण सुविधांचा विस्तार करणारा अटल सेतू ते मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे.

अटल सेतूला थेट मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाशी जोडून वाहतुकीतील प्रमुख अडथळे दूर करणे, वाहनांची वाहतूक अधिक सुरळीत करणे हा एमएमआरडीएचा उद्देश आहे.

पनवेल मुख्य जंक्शन परिसरात, वाहतुकीचा अतिरिक्त निर्माण होत आहे. या ठिकाणी अटल सेतूवरून येणारी वाहतूक प्रमुख महामार्गावरील वाहतुकीशी एकत्रित होते. ही समस्या दूर करण्यासाठी एमएमआरडीए ताण चिर्ले आणि पळस्पे विभागांतून स्वतंत्र सहापदरी उन्नत मार्ग विकसित करत आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- ८७८८०२१५१०
- नागाव येथील हॉटेलसाठी कर्मचारी भरती रिक्त पदे : १) नाईट शिफ्टसाठी पुरूष कर्मचारी २) रिसेप्शनिस्ट ३) किचन हेल्पर (महिला) ४) मोरी कामगार ५) कॅप्टन (रेस्टॉरंट) ६) वेटर ७) ऑलराऊंडर कुक (स्वयंपाकी) कामाचे ठिकाण : नागाव, अलिबाग इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा. मो. ७५५९१८४६१२
- जमिन तसेच, जुने/नवीन घर विकत/भाड्याने पाहिजे. 7378480151
- पाहिजेत-अलिबागमध्ये ऋतुजा इन्फ्रास्टकचर्स या कंपनी करीता टॅली/जी.एस.टी. कामासाठी मुलगा/मुलगी पाहिजेत संपर्क-९८२३४९२६२६/७९९८६१९१९१ विद्यानगर-अलिबाग
- अलिबाग बिगस्प्लॅश हॉटेलमध्ये रिसेप्शनिस्ट, वेटर, कॅप्टन, हाउसकीपिंग या पदांसाठी उमेदवार पाहिजेत संपर्क : 8483999229
- दुकानगाळा भाड्याने देणे आहे विक्री करणे आहे २० गुंठे जागा अलिबाग पासून २ किमीवर ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

राजाभाऊ ठाकूर यांचा भाजपवर हल्लाबोल | हजारोंच्या उपस्थितीत संपर्क मेळावा

माणगावात काँग्रेसचे मत चोरीविरोधात रणशिंग!

| माणगाव | प्रतिनिधी |

मत वाचवा, देश वाचवा या अभियानाच्या माध्यमातून लोकशाही आणि मतदानाच्या अधिकारांच्या संरक्षणाचा मुद्दा जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी माणगावात काँग्रेसने जोरदार शक्तिप्रदर्शन केले. माणगाव तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने आयोजित संपर्क मेळाव्याला हजारोंच्या संख्येने कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली. याच कार्यक्रमात नवीन तालुका काँग्रेस कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले, तर पक्षाच्या संघटनात्मक विस्तारासाठी नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्याही करण्यात आल्या.



या मेळाव्याला रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष राजा ठाकूर, जिल्हा कोषाध्यक्ष रामप्रकाश कुशवाह, श्रीवर्धन विधानसभा अध्यक्ष विलास सुर्वे आणि माणगाव तालुकाध्यक्ष डॉ. नरेंद्र सिंह, ज्येष्ठ नेते अशोक मोरे, जिल्हा उपाध्यक्ष आश्पाक पानसरे, जिल्हा खजिनदार राम प्रकाश कुशवाह, निसार फिरफिरे, म्हसला तालुका अध्यक्ष नजमा मुकादम आदी उपस्थित होते. श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील विविध विभागांचे पदाधिकारी, विविध सेलचे प्रतिनिधी आणि महिला काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

यावेळी जिल्हाध्यक्ष राजा ठाकूर यांनी भाजपवर मतचोरीचा आरोप करत काँग्रेसच्या नेत्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्ता म्हणून जनतेत उतरून काम करण्याची गरज व्यक्त केली. भाजपकडून मतांची चोरी केली जात असल्याचा मुद्दा जनमानसात पोहोचविण्यासाठीच हा संपर्क मेळावा आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जे काम करायचे आहे, ते जनतेसाठी करा, असे आवाहनही त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

मतदानाचा अधिकार हिरावून घेण्याचे काम भाजप सरकार करीत असल्याचा आरोप करत ठाकूर म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील नागरिकांना मतदानाचा अधिकार दिला आहे. या अधिकाराचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. खासदार राहुल गांधी हे मत वाचवा, देश वाचवा अभियानाच्या माध्यमातून लोकशाही वाचविण्यासाठी प्रयत्नशील आहेत.भाजप हिंदू-मुस्लिम आणि भारत-पाकिस्तान अशा मुद्द्यांवरून राजकारण करीत असल्याची टीका करताना त्यांनी मंदिरांमधील चोरीच्या घटनांचाही उल्लेख केला. जनतेच्या मूलभूत प्रश्नांऐवजी धार्मिक आणि भावनिक मुद्द्यांना प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांमुळे पक्षविस्तार, ग्रामीण भागातील जनसंपर्क आणि आगामी निवडणुकांच्या तयारीला गती देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि, मी मृणालिनी पराग भोगले खालील वर्णन केलेली मिळकत सुवर्णा अनंता आंबोलकर यांच्याकडुन खालील मिळकत कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

मौजे पाच्छापूर तालुका-सुधागड, जिल्हा रायगड

अनु क्र.	स.नं/ ग.नं	क्षेत्र हे.आर. चौमी,	आकार रू.पै.
१.	२२३	२-८७-०० क्षेत्र ००-४१-०० पोटखराबा ०३-२८-०० एकुण क्षेत्र पैकी ००-६०-०० मालकीचे क्षेत्र	१.४२ पैकी ०.३०

या मिळकती संदर्भात कोणाही व्यक्ती/व्यक्तीचे किंवा आर्थिक संस्थांचे कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती, विक्री, गहाण, ताबा, जबाबदारी, बक्षीस, भेट, वारसाहक्क किंवा इतर काही जर असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत संबंधीत असलेल्या दस्तऐवजाशी प्रमाणित केलेल्या प्रतिसहीत खाली सही केलेल्या यांच्या कार्यालयीन पत्यावर संपर्क साधावा अन्यथा विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर कुठल्याही कोणतेही प्रकारचे येणाऱ्या हरकती/तक्रारीचा विचार करणात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
ॲड. सुरेखा रविंद्र सागावकर
३०६, केणी व्हिला, प्लॉट नं. १५०,
सेक्टर आर २, चिंचपाडा,
पनवेल -४१०२०६
मोबाईल नंबर ९३२६१९७०३८

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिल १) श्री. प्रणय रामनाथ भेंडे रा.घर नं.६४१, जुई गाव, हनुमान मंदिर जवल, पोस्ट-कामोठे, पनवेल - ४१०२०६, २) श्री.दर्शन ज्ञानदेव पाटील रा.बोलें, पोस्ट-आजिवली, शेडुंग टोल नाका, ता.पनवेल- ४१०२०६, यांनी खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे खालील नमुद विद्यमान मालक यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

मौजे-धामणी, ता.कर्जत, जि.रायगड येथिल मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,

जमीन मालक	भूमापन कमांक व उपविभाग	एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ)	आकार रू.पै.
तरूण ललित अग्रवाल	७४/२	एकुण क्षेत्र २.२७.०० हे.आर.पॉ. पैकी लिहून देणार यांच्या मालकीचे क्षेत्र ०.२०.०० हे.आर.पॉ.	०.१५

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युप्रत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

तारीख :- १८/११/२०२६

ॲड. कल्याणी रवी गायकर
ओम श्रम साफल्य को.ऑप.हौसिंग सोसायटी
कोतवालनगर-कर्जत, जि.रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

दि.महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटिव्ह मार्केटींग फेडरेशन लिमिटेड

कनमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, पो.बॉ.नं.५०८०,
मस्जीद बंदर- ४०००००९
Email ID- manager.statepro@gamil.com

जाहीर ऑफर सूचना

विकेंद्रीत धान खरेदी योजनेअंतर्गत, पणन हंगाम २०२६-२०२७ मध्ये किमान आधारभूत किंमत धान खरेदी योजनेअंतर्गत रायगड जिल्ह्यात लवकरच धान खरेदी करण्यात येणार असून सदरील धनाची भरडाई करण्यासाठी जिल्ह्यातील स्थानिक तसेच लगतच्या जिल्ह्यातील इच्छुक मिलधारकांकडून, सिलबंद लिफाफ्यामध्ये ऑफर्स मागविण्यात येत आहेत. सदर धान भरडाईसाठी स्थानिक मिलधारकांनाच प्राधान्य देण्यात येईल. इच्छुक मिलधारकांनी फेडरेशनने प्रस्तावित केलेल्या ऑफर्स फॉर्ममध्ये फक्त फोटींफाईड सीएमआर तांदूळ तयार करण्याच्या ऑफर्स द्याव्यात. शासनाच्या निर्देशानुसार भरडाई करावयाच्या धाना संबंधितच्या अटी/शर्ती व कोरे ऑफर्स फॉर्म संबंधित जिल्हा मार्केटींग अधिकारी यांच्याकडे कार्यालयीन वेळेत प्राप्त होतील. ऑफर्स भरण्याचा कालावधी/कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

अ) ऑफर्स विक्री कालावधी :- दि.१८-११-२०२६ ते ३०-११-२०२६ (कार्यालयीन वेळेत)

आ) ऑफर्स भरण्याची अंतिम तारीख :-दि.३०-११-२०२६ दुपारी २.०० वाजेपर्यंत

इ) ऑफर्स उघडण्याची तारीख :- दि. ३०-११-२०२६ दुपारी ३.०० वाजता

जिल्हा मार्केटींग अधिकारी
रायगड-अलिबाग

पत्ता :-
जिल्हा मार्केटींग अधिकारी कार्यालय,
पत्ता :- बाफना बाग बी, रो हाऊस नं.१४,
बिग फ्लॅश हॉटेलच्या मागे,
रेवस रोड, ता.अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं. ९१६८०५९९२५, ८४०८८६६६१९.

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे कोर्लई, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दिपक नारायण जाधव व. २, रा. घर नं. डी८९, जानकी कुटीर, गावठाण रोड नं. ३, चेंबूर पोस्ट ऑफिस जवळ, चेंबूर, मुंबई यांच्या नांवे असलेली भातशेती मिळकत माझे अशिल यांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र.व उपविभाग क्र.	हिस्सा.नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
१.कोर्लई ता.मुरुड	४५/१	-	१-०७-००	२.००
		पो.ख.	०-०३-००	
		एकूण	१-१०-००	
२ कोर्लई ता.मुरुड	४६/१	-	०-३४-००	०.५८
३. कोर्लई ता.मुरुड	४६/१४	-	०-३७-००	०.६२
४. कोर्लई ता.मुरुड	४६/१७/फ	-	०-०४-००	०.०८
५. कोर्लई ता.मुरुड	४७/१	-	०-३८-००	०.७२
		पो.ख.	०-०१-००	
		एकूण	०-३९-००	
६. कोर्लई ता.मुरुड	४८/४		०-१८-००	०.३४
७. कोर्लई ता.मुरुड	४९/१/अ	-	०-२७-००	३.००
		पो.ख.	०-०४-००	
		एकूण	०-३१-००	
८. कोर्लई ता.मुरुड	४९/१/ब	-	०-२६-७०	३.००
		पो.ख.	०-०४-४०	
		एकूण	०-३१-१०	

सबब वर नमूद मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : / ११/२०२६ सही/-
ॲड. मनोज परशुराम ओव्हाळ
पत्ता : मा. दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८८१२७७४४९

-जाहीर नोटिस-

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे आशिलांनी मौजे चेंढरे, ता.अलिबाग येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत, मिळकतीचे विद्यमान वैभव रमेश गोसावी यांचेकडून विकत घेण्याचे ठरवून तसा विक्रीचा व्यवहार आमचे अशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये ठरलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे चेंढरे, ता.अलिबाग, भूमापन क्रमांक व उपविभाग ८७/४, क्षेत्र ०-२०-४०, पो.ख. ०-०२-५०, एकूण क्षेत्र ०-२२-९० (हे.आर.) आकार रु.४.५६/- या मिळकतीपैकी वैभव रमेश गोसावी यांच्या मालकीची पश्चिम दिशेकडील ०-०४-४ गुंठे क्षेत्र जमीन मिळकत हा या नोटिसचा विषय आहे.

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत विद्यमान मालकांच्या ताबे कब्जाची, वहिवाटीची, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीं संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्नवस्त्र, हवाला, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, वाटणी, बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी. या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.

ॲड. राधिका फाटक
२०२, त्रिमुर्ती प्लाझा CHS, अलिबाग, ता.अलिबाग

जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल करंजा मच्छिमार वि. का.स.सोसायटी लि. करंजा उरण तर्फे चेअरमन श्री. प्रदिप बाळू नाखवा यांचे विरुद्ध विठ्ठल दामोदर थळी यांनी मौजे चाणजे, ता.उरण सर्व्हे नं./हिस्सा नं. ३७१/१ क्षेत्र ०-४३-८ हे.आर. आकार ५.९ रु.पैसे या मिळकतीबाबत उरण येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात रे.मु.नं. ४७/२०२५ चा दावा दाखल केलेला आहे. तो दावा मे. कोर्टात चौकशीकरीता सन २००८ पासून प्रलंबित आहे. सदर दाव्याचेकामी विठ्ठल थळी यांचे विरुद्ध मे.न्यायालयाने मनाई हुकूमाचा आदेश ही केलेला आहे. असे असताना विठ्ठल दामोदर थळी यांचे नातेवाईक विवेके विठ्ठल थळी यांनी बेकायदेशीरपणे सदर मिळकत दिनेशकुमार मुरलीधर पासोरीया, योगेश पोपटलाल ठक्कर यांना बेकायदेशीरपणे दि. ६/११/२०२६ रोजीच्या खरेदीखताने विकल्याचे दिसून येत आहे. सदरचे खरेदीखतास मालमत्ता हस्तांतरण कायदा कलम ५२ ची हरकत येत असून सदर दोन इसम सदर मिळकतीचे प्रामाणिक खरेदीदार नाहीत. आमचे अशिलांनी त्यांचे विरुद्ध दिवाणी व फौजदारी कार्यवाही सुरु केलेली आहे. त्यामुळे सदरचे खरेदीखत आमचे अशिलांवर बंधनकारक नाही. तरी सदर मिळकतीबाबत दिनेशकुमार मुरलीधर पासोरीया, योगेश पोपटलाल ठक्कर यांचेबरोबर कोणीही कोणताही व्यवहार करु नये.

हे कळावे.
अलिबाग,
दि. १७-११-२०२६.

सही/-
ॲड. आर.बी.कोसमकर
चिरायु, ब्राह्मणआळी, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड.

जाहिर नोटिस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली जमीन मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक श्री.यशवंत पंडीत सोनावणे यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन

मौजे	खाते क्र.	गट क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे.आर.	आकार. रू.पै.
मांडला ता.मुरूड	३८०	६०	एकूण ६-२४-०० पैकी ०-२१-४०	०.५८

वर नमुद केलेली मिळकतीपैकी श्री.यशवंत पंडीत सोनावणे यांच्या मालकी हिश्याचे क्षेत्र ०-२१-४० हे. आर. ही मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ०७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग,
दिनांक : १७/११/२०२६

सही/-
ॲड. राकेश नारायण पाटील
रा. आगरी पॅलेस, मु.पो.चिंचोटी
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ९२७२६२०००५

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे ताडवागळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मनोहर नामदेव जुईकर रा. ताडवागळे, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली भातशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा करार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. उपविभाग क्र.	क्षेत्र (हे.आर.)	आकार रु. पैसे
ताडवागळे ता.अलिबाग	२०९/२	०-१३-८०	३.३६
		पो.ख.०-०२-२०	
		एकूण ०-१६-००	

सबब सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू वरकस मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १७/११/२०२६ सही / -
ॲड. नेहा विलास तांबट
जिल्हा न्यायालय,
रायगड-अलिबाग
मो.नं. ९७६५६३८११४

जाहीर हरकत नोटीस

सर्व लोकांस या जाहीर हरकत नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की, आमचे अशिल श्री. भाऊ गोमा भोईर यांच्या मालकीच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीच्या मौजे शिलार, ता. कर्जत, जि. रायगड येथिल सर्व्हे नं. ११/३/क एकुण क्षेत्र ०.८७.२८ हे.आर.ची.मी. आकारणी ०.६० रु. पै. व सर्व्हे नं. ११/३/ड एकुण क्षेत्र ०.८७.६० हे.आर.ची.मी. आकारणी ०.६० रु.पै. या मिळकतींबाबतची कामे करणेकरीता आमचे अशिलांनी श्री.समीर अनंतराय शहा यांस दिलेले कुलमुखत्यारपत्र दि.१६/११/२०२६ रोजीच्या नोटीसीने रद्द केलेले आहे. सबब आता सदर मिळकतींबाबतची सर्वतोपरी कामे करणेस आमचे अशिल सक्षम व समर्थ आहेत.

असे असतानाही सदर मिळकतींबाबत श्री.समीर अनंतराय शहा यांस दिलेल्या कुलमुखत्यारपत्राचे आधारे सदर मिळकतींबाबत श्री.समीर अनंतराय शहा हे इतर कोणाबरोबरही कोणतेही बेकायदेशिर व्यवहार करणेची शक्यता आहे. तरी सदर मिळकतींबाबत श्री.समीर अनंतराय शहा यांचेसोबत कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार वा कृती करु नये, सदर सर्व व्यवहार व कृतीबाबत आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. व तरीही सदर मिळकतींबाबत श्री.समीर अनंतराय शहा यांचेसोबत कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार वा कृती केल्यास सदरचे व्यवहार वा कृती आमचे अशिलांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत. तसेच सदर बाबत संबंधितांविरुध्द कायदेशिर कारवाई केली जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पत्ता :
"श्री सदगुरू कृपा", १४४अ,
मु.पो.शेलु, ता.कर्जत, जि.रायगड.
मोबा.नं. ९८६०६२६२४६

ॲड.संदिप गोपाळ बागडे
हरकतदार तर्फे ॲडव्होकेट

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे गावखार, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. संध्या सुरेश सुर्वे रा. निलगिरी गार्डन सोसायटी क्र. १०/३०१, ऑपोझिट वंडर पार्क, ठाणे-उरण रोड, बेलापूर सेक्टर २४, नवी मुंबई, कोकण भवन, ठाणे यांच्या नांवे असलेली भातशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा करार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. उपविभाग क्र.	क्षेत्र (हे.आर.)	आकार रु.पैसे
गावखार ता.अलिबाग	९/७	०-५६-२०	७.८२
		पो.ख. ०-०५-१०	
		एकूण ०-६१-३०	

वर नमूद भातशेती मिळकतीपैकी सौ. संध्या संदेश सुर्वे हिच्या हिश्श्याची मिळकत खाते क्र. ६२ क्षेत्र ०-०३-०० हे.आर., आकार रु. ०.४२ पैसे मिळकत

सबब सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू वरकस मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरून माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १७/११/२०२६ सही /-
ॲड. नेहा विलास तांबट
जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग
मो.नं. ९७६५६३८११४

रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ

समर्थ सदन, दुसरा मजला ००२, प्लॉट नं. २४, सेक्टर ८, बँक ऑफ इंडियाच्या वरती,
खांदा कॉलनी, नविन पनवेल (प.), जि. रायगड ४१० २०६. दुरध्वनी क्र. ०२२-२७४५४७५०.
Email ID :- raigaddistsgb@gmail.com

जा.क्र. राजिसुरमं/२०२६/ दिनांक :-

जाहीर सुचना

विषय:- रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्यामध्ये वाढ करणेबाबत.

रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/सुरक्षा अधिकारी यांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या विविध कामगार संघटना यांनी सध्याच्या महागाईचा वा राहणीमानाचा विचार करता, सुरक्षा रक्षक/सुरक्षा अधिकारी यांच्या विद्यमान वेतन व भत्ते यामध्ये वाढ/ सुधारणा करावी अशी मागणी केलेली आहे व मंडळाकडे या आशयाचे प्रस्ताव/निवेदने सादर केलेली आहेत. यापूर्वी मंडळातील नौदीत सुरक्षा रक्षकांच्या वेतन व भत्यामध्ये दि. ०१ मे २०२३ पासून वेतनवाढ करण्यात आलेली होती व सदर वेतनवाढीस ३ वर्षे पूर्ण झालेली असल्याने, सुरक्षा रक्षक संघटनांनी माहे १ मे २०२६ पासून वेतन व भत्यामध्ये वाढ करण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना (सुधारीत) २००२ मधील खंड ३० मधील तरतुदीनुसार नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतनाचे दर, भत्ते आणि अतिकालिक काम सेवेच्या इतर शर्ती निश्चित करण्याच्या किंवा त्यात सुधारणा करण्याच्या किंवा फेरबदल करण्याच्या प्रयोजनासाठी मंडळातील नोंदीत मुख्य मालक /नियोक्ता व त्यांच्या मालक संघटना (Association of Small Principal Employers) आणि त्यांच्याकडे मंडळातील कार्यरत नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या कामगार संघटना तसेच मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक व इतर सर्व संबंधितांच्या सूचना व हरकती मागवत वेतनाचे भत्ते व सेवा शर्ती निश्चित करण्याचे सुरक्षा रक्षक मंडळास अधिकार आहेत.

सुरक्षा रक्षकांना मिळणारे सध्याचे विद्यमान वेतन व भत्ते हे मागील काळात वाढलेला महागाई निर्देशांक, राहणीमान इत्यादी बाबींचा विचार करून वेतन व भते पुनः निर्धारीत करण्याचा प्रस्ताव मंडळाच्या विचाराधीन आहे.

त्यानुसार मंडळाने दिनांक १ मे २०२६ पासून पुढील ३ वर्षाकरीता (दि. ०१ मे २०२६ ते ३० एप्रिल २०२९ या कालावधीकरिता) मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक /सुरक्षा अधिकारी यांचे प्रस्तावित मूळ वेतन व इतर भत्ते पुनः निर्धारीत करण्याचे निश्चित केले असून, प्रस्तावित वेतन व भत्यांचे दर पुढीलप्रमाणे असतील.

अ. क्र.	हुद्दा	मूळ वेतन	विशेष भत्ता/ महागाई भत्ता (रु.)	घरभाडे भत्ता (मूळ वेतन व म.भत्त्यावर २०%) (रु.)	प्रवास भत्ता (रु.)	धुलाई भत्ता (रु.)	एकुण वेतन व भत्ते रूपये	लेव्ही ४२.७५ टक्के लेव्ही (मुळ पगार व महागाई भत्ता)	एकुण वेतन व लेव्ही
१	सुरक्षा रक्षक	१४७१९	४१३४	३७७१	२६५०	१६७०	२६९४४	८०६०	३५००४
२	मुख्य सुरक्षा रक्षक	१४९९४	४१३४	३८२६	२६५०	१६७०	२७२७४	८१७७	३५४५१
३	सुरक्षा पर्यवेक्षक	१५६९४	४१३४	३९६६	२६५०	१६७०	२८११४	८४७६	३६५९०
४	सहा.सुरक्षा अधिकारी	१५९१९	४१३४	४०११	२६५०	१६७०	२८३८४	८५७३	३६९५७
५.	सुरक्षा अधिकारी	१६३६९	४१३४	४१०१	२६५०	१६७०	२८९२४	८७६५	३७६८९
६	मुख्यसुरक्षा अधिकारी	१६८१९	४१३४	४१९१	२६५०	१६७०	२९४६४	८९५७	३८४२१

प्रस्ताविक वेतन व भत्यांचे दरांबाबत मंडळातील नोंदीत मुख्य मालक/ नियोक्ता व त्यांच्या भालक संघटना (Association of Small Principal) आणि त्यांच्याकडे मंडळातील कार्यरत नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या कामगार संघटना तसेच मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक व इतर सर्व संबोधतांच्या काही सूचना/ हरकती असल्यास ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसाच्या आत मंडळाकडे लेखी स्वरुपात पाठविण्याची विनंती आहे. सदर सूचना / हरकती यांचा सागोपांग विचार करून सुरक्षा रक्षक/सुरक्षा अधिकारी यांच्या वेतनात सुधारणा/ वाढ करण्याबाबत अंतिम निर्णय घेण्यात यईल. विहीत केलेल्या मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या सूचना / हरकती यांचा विचार मंडळ करणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
(अमोल मा. जाधव)
सरकारी कामगार अधिकारी, मुंबई
तथा सचिव, रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ

दि. १७/११/२०२६

जाहीर नोटिस

या नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे कुरूळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक १) गिरीष छोटालाल भयानी २) मधुबाला मुकेश जैन यांचे कडुन आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे व तशी अंतीम बोलणी सुद्धा झालेली आहेत.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्र.व उपविभाग क्र.	क्षेत्र हे.आर.	आकार रू.पै.
कुरूळ, ता.अलिबाग, जि.रायगड	७१/२/४	०-०८-२९	८२.९०

मिळकतीच्या मालकांनी सदर मिळकत ही पूर्ण निर्वेध, बोजा विरहीत असल्याची खात्री आमच्या अशिलांना दिलेली आहे. परंतु तरी सुद्धा सदर मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, वहिवाट, तारण गहाण, लोन, लीन, पोटगीचा हक्क, वारसा हक्क, इत्यादी असल्यास तो त्यांनी योग्य त्या कागदपत्रांसह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत खालील नमुद पत्त्यावर हरकतीसह कळवावा. वर नमुद मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकतींचे मालकांबरोबर खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या खरेदी घेणाऱ्यावर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

ॲड. जितेंद्र अनंत लेले
ऑफीस : अ-१, तिरूपती बिल्डींग,
बालाजी नाका, अलिबाग, जि. रायगड
मोबा. नं. - ९८८१९१५१६१

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णनाच्या जमीन मिळकती, मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन सर्व हक्कांगासह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत.

मिळकतींचे वर्णन

मौजे	गट नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पैसे)	मालकाचे नाव
१)मांडला, ता.मुरूड, जि.रायगड	१२०	०-७०-९० पो.ख ०-०३-५० एकुण ०-७४-४०	१८.४४	श्री.इब्राहिम हसनमियाँ दाखवे
२) मांडला, ता.मुरूड, जि.रायगड	८४	०-४६-०० पो.ख. ०-०६-०० एकुण ०-५२-००	०.८४	श्री. राजेश बाळु गायकवाड वगैरे

सदरहू गट नं. ८४ या मिळकतीतून गट नं. १२० या मिळकतीत जाण्यायेण्याकरीता पश्चिमेकडुन उत्तर-दक्षिण ६ मीटर रूंदीचा पोहोच रस्ता.

सदरहू जमीन मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १७/११/२०२६

(ॲड. संजय द. म्हात्रे)
पत्ता - श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती शोभना काशिनाथ गडमुळे रा.१११, शोभा सदन, अभिलाषा बिल्डींग जवळ, श्रीबाग नं. २, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार

टीम इंडियाची 'कसोटी'

■ न्यूझीलंड विरूद्ध दोन सामने खेळणार

■ साई सुदर्शन, ऋषभ पंत यांना दिली संधी



| ॲडलेड | वृत्तसंस्था |

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील एकदिवसीय आणि टी-२० मालिका संपली आहे. दोन्ही संघांनी प्रथम टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका खेळली. ही मालिका टीम इंडियाने ३-२ ने जिंकली. त्यानंतर दोन्ही संघात एकदिवसीय मालिकेचा थरार रंगला. भारताने ही मालिका ३-१ ने खिशात घातली. आता हे दोन्ही देश कसोटी मालिका खेळण्यासाठी सज्ज झाले आहेत. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळली जाणार आहे.

भारताच्या न्यूझीलंड दौऱ्याची शेवट कसोटी मालिकेने होईल. या दोन्ही संघांमध्ये दोन सामने खेळले जातील. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिला कसोटी सामना वेलिंग्टनमधील बेसिन रिझर्व्ह क्रिकेट मैदानावर होईल.

हा सामना १९ नोव्हेंबर रोजी सुरू होऊन २३ नोव्हेंबरपर्यंत चालेल. यानंतर दोन्ही संघांना तीन दिवसांची विश्रांती मिळेल. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील दुसरा कसोटी सामना २७ नोव्हेंबर रोजी क्राइस्टचर्चमधील हॅगली ओव्हल मैदानावर सुरू होईल. भारताचा न्यूझीलंड दौरा १ डिसेंबर रोजी संपेल. यानंतर, भारतीय संघ १३ डिसेंबरपासून श्रीलंकेविरुद्ध मैदानात उतरेल.

पहिली कसोटी: १९-२३ नोव्हेंबर २०२६, भारत विरुद्ध न्यूझीलंड (बेसिन रिझर्व्ह, वेलिंग्टन)

दुसरी कसोटी: २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०२६, भारत विरुद्ध न्यूझीलंड (हॅगली ओव्हल, क्राइस्टचर्च)

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील कसोटी सामना स्थानिक वेळेनुसार सकाळी ११:०० वाजता सुरू होईल. दोन्ही देशांमधील वेळेच्या फरकामुळे, सामना भारतात रात्री उशिरा सुरू होईल. भारतीय प्रमाणवेळेनुसार सामन्याची सुरुवात पहाटे ३:३० वाजता होईल. चाहते सोनी स्पोर्ट्स नेटवर्कच्या टीव्ही चॅनेलवर सामन्याच्या थेट प्रक्षेपणाचा आनंद घेऊ शकतात. हा सामना सोनी लिव्ह ॲप आणि वेबसाइटद्वारे देखील थेट पाहता येईल

भारत संघ : शुभमन गिल, केएल राहुल, यशस्वी जैस्वाल, देवदत्त पडिक्कल, साई सुदर्शन, ऋषभ पंत, ध्रुव जुरेल, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, नितीश कुमार रेड्डी, अंशुल कंबोज, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, आकाश दीप, गुरनूर ब्रार

न्यूझीलंड संघ: टॉम लॅथम, टॉम ब्लंडेल, डेव्हॉन कॉनवे, जेकब डफी, मॅट हेन्री, काईल जेमिसन, डॅरिल मिचेल, हेन्री निकोल्स, ग्लेन फिलिप्स, रचिन रवींद्र, मिचेल सँटनर, नॅथन स्मिथ, ब्लेअर टिकनर, विल यंग.

शमी राजस्थानकडून खेळणार



| जयपूर | वृत्तसंस्था |

२०२७ पूर्वी राजस्थान रॉयल्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात तीन खेळाडूंची अदलाबदल झाली आहे. मोहम्मद शमी राजस्थानकडून, तर इंग्लंडचा अष्टपैलू सॅम करन लखनौच्या संघाकडून खेळणार आहे. त्याचबरोबर लखनौचा डावखुरा फिरकीपटू एम. सिद्धार्थही राजस्थानच्या संघात सामील होणार आहे.याशिवाय सनरायझर्स हैदराबादचा वेगवान गोलंदाज हर्षल पटेल गुजरात टायटन्समध्ये सामील होणार आहे. आयपीएलच्या अहवालानुसार, गुजरातने या ऑल-कॅश ट्रेडसाठी ४ कोटी रुपये देण्यास सहमती दर्शवली आहे.

राजस्थानला गेल्या हंगामात प्लेऑफमध्ये स्थान मिळवूनही पॉवरप्लेमधील गोलंदाजीच्या कमकुवतपणाचा सामना करावा लागला होता. संघाने सुरुवातीच्या ६ षटकांत प्रति षटक १०.१४ धावा दिल्या होत्या. अशा परिस्थितीत मोहम्मद शमीचा संघात समावेश करणे हा पॉवरप्लेतील गोलंदाजी मजबूत करण्याचा प्रयत्न मानला जात आहे. त्याची जोडी जोफ्रा आर्चरसह जमू शकते.

३६ वर्षीय शमीने २०२६ मध्ये लखनौ सुपर जायंट्ससाठी १३ सामन्यांत १२ बळी घेतले होते. त्याचा इकॉनॉमी रेट ९.०० राहिला. २०२४ पासून आतापर्यंत त्याने पॉवरप्लेमध्ये १४ बळी घेतले आहेत आणि या कालावधीत ८.७६च्या इकॉनॉमी रेटने धावा दिल्या आहेत. दुसरीकडे, २०२६ मध्ये लखनऊच्या पॉवरप्लेतील गोलंदाजीचा इकॉनॉमी रेट ८.७१ राहिला होता. संघाने सुरुवातीच्या ६ षटकांत २३ बळी घेतले होते, ज्यात शमीची महत्त्वाची भूमिका राहिली.

निवडक

ठाण्याच्या धनश्रीची इंग्लंडमध्ये भरारी!

ठाणे : ठाण्याची प्रतिभावान यष्टिरक्षक आणि मधल्या फळीतील आक्रमक फलंदाज धनश्री वाघमारे हिने क्रिकेटविश्वात मोठी झेप घेतली आहे. आगामी हंगामात इंग्लंडमधील महिला काउंटी क्रिकेट स्पर्धेत खेळण्यासाठी धनश्रीला करारबद्ध करण्यात आले आहे. इंग्लंड दौऱ्यातील प्रभावी कामगिरीच्या जोरावर हेस क्रिकेट क्लबने तिची संघात यष्टिरक्षक म्हणून निवड केली आहे. त्यामुळे धनश्रीला आता इंग्लंडमध्ये आपले क्रिकेट कौशल्य दाखवण्याची संधी मिळणार आहे. ओमनी क्रिकेट क्लबचा महिला आणि मुलांचा संघ नुकताच इंग्लंडचा यशस्वी दौरा पूर्ण करून मायदेशी परतला. या दौऱ्यात ओमनी क्रिकेट क्लबच्या महिला संघाने एकूण सात सामने खेळले. त्यापैकी पाच सामन्यांत धनश्रीला खेळण्याची संधी मिळाली. यष्टिरक्षण करताना तिने तब्बल दहा फलंदाजांना बाद करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. विशेष म्हणजे, एका सामन्यात फलंदाजीची संधी मिळाल्यानंतर तिने नाबाद ३५ धावांची आक्रमक खेळी साकारली. तिच्या या खेळीमुळे संघाच्या विजयात मोलाची भर पडली. इंग्लंड दौऱ्यातील या सातत्यपूर्ण आणि अष्टपैलू कामगिरीची दखल घेत ओमनी क्रिकेट क्लबने धनश्रीला सर्वोत्तम महिला क्रिकेटपटू पुरस्काराने गौरवले. क्लबतर्फे आयोजित कार्यक्रमात मुंबई क्रिकेट संघटनेचे कार्यकारिणी सदस्य संदीप विचारे यांच्या हस्ते तिला पारितोषिक प्रदान करण्यात आले.यावेळी मुंबई क्रिकेट संघटनेचे सचिव डॉ. उमेश खानविलकर, माजी ज्येष्ठ रणजीपटू आणि प्रशिक्षक गोपाळ कोळी, ओमनी क्रिकेट क्लबचे प्रमुख ओंकार मंडलिक आणि प्रशिक्षक नरेश वाघमारे उपस्थित होते.

क्रिकेट चाहत्यांना रिटेन्शन लिस्टची प्रतिक्षा

मुंबई : आयपीएलच्या २० व्या मोसमाला काही महिने बाकी आहेत. मात्र मिनी ऑक्शनआधी होणाऱ्या रिटेन्शनच्या यादीकडे खेळाडूंसह क्रिकेट चाहत्यांचं लक्ष असणार आहे. नियमानुसार, दरवर्षी बीसीसीआयकडून १ तारीख देण्यात येते. त्यानुसार १० संघांना मिनी ऑक्शनआधी त्यांच्या गोटातील कायम ठेवलेल्या आणि करारमुक्त केलेल्या खेळाडूंची नावं जाहीर करावी लागतात. बीसीसीआयने आगामी २०व्या हंगामासाठी रिटेन्शनची अधिकृतपणे तारीख जाहीर केलेली नाही. मात्र मीडिया रिपोर्ट्सनुसार, १७ नोव्हेंबर ही खेळाडूंची नावं जाहीर करण्याची शेवटची तारीख असल्याचं म्हटलं जात आहे. त्यामुळे मंगळवारी खेळाडूंचा फैसला होणार. त्यामुळे कोणती टीम कोणत्या खेळाडूला करारमुक्त करणार आणि कुणाला सोबत ठेवणार? हे थोड्याच वेळात स्पष्ट होईल, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. मीडिया रिपोर्ट्सनुसार, मंगळवारी दिवसभरात खेळाडूंची नावं केव्हाही जाहीर केली जाऊ शकतात. तर काही वृत्तांनुसार, संध्याकाळी ५च्या आसपास नावं जाहीर होतील, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. सध्या तरी एकाही संघाकडून करारमुक्त खेळाडूंची नावं जाहीर करण्यात आलेली नाहीत. रिटेन्शनआधी अनेक संघांनी सामंजस्याने खेळाडूंची अदलाबदल केली आहे. याचा अर्थ त्यांना करारमुक्त केलं असं नाही. रिटेन आणि ट्रेड यात मोठा फरक आहे. रिटेन म्हणजे एखाद्या खेळाडूला करारमुक्त करणं. मात्र ट्रेड म्हणजे २ संघांत सामंजस्याने करण्यात आलेली खेळाडूंची अदलाबदल. या ट्रेडनुसारच पंजाब आणि मुंबईने आपल्या खेळाडूंची अदलाबदल केली. मुंबईचा हार्दिक पंड्या पंजाबमध्ये गेला. तर पंजाबचा अर्शदीप मुंबई टीममध्ये आला. रिटेन्शनआधी होणाऱ्या या प्रक्रियेला ट्रेड विंडो असं म्हणतात.

रुग्णालयांच्या मैदानात क्रिकेटचा महासंग्राम

मुंबई : मुंबई रुग्णालयांच्या विश्वात आता क्रिकेटचा धुरळा उडणार आहे. मुंबईतील रुग्णालयीन क्रिकेटपटूंसाठी प्रतिष्ठेचा वर्ल्ड कप मानल्या जाणाऱ्या हिंदुजा-टाटा रुग्णालय आयोजित गिरनार चहा पुरस्कृत आंतर रुग्णालयीन क्रिकेट स्पर्धेचा रणसंग्राम रंगणार आहे. मुंबईतील १६ नामांकित रुग्णालयांचे संघ या स्पर्धेत विजेतेपदासाठी मैदानात उतरतील. ब्रीच कँडी आणि कोकिळाबेन अंबानी या एलिट गटातील दोन बलाढ्य संघांमधील लढतीने स्पर्धेचा श्रीगणेशा होणार आहे. मिलिंद सावंत आणि डॉ. हुमायूं जाफरी यांच्या पुढाकारातून १९९४ मध्ये या स्पर्धेची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. खासगी आणि सरकारी रुग्णालयांतील क्रिकेटपटूंना क्रिकेटच्या माध्यमातून व्यासपीठ मिळावे आणि त्यांना कायमस्वरूपी रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. या स्पर्धेचे उद्घाटन १७ नोव्हेंबरला मुंबई क्रिकेट संघटनेचे सचिव डॉ. उन्मेष खानविलकर, कोषाध्यक्ष अरमान मलिक आणि स्पर्धा सचिव विघ्नेश कदम यांच्या उपस्थितीत शिवाजी पार्कच्या बंगाल क्लबमध्ये होणार असल्याची माहिती आयोजक मिलिंद सावंत यांनी दिली. यंदाची स्पर्धाही एलिट आणि प्लेट अशा दोन गटांत रंगणार आहे. एलिट गटात मुंबईतील आठ नामांकित रुग्णालयांचे संघ विजेतेपदासाठी एकमेकांना आव्हान देतील, तर प्लेट गटातही आठ संघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे. एलिट गटात नानावटी, हिंदुजा, टाटा, जे. जे., केईएम, जसलोक, ब्रीच कँडी आणि कोकिळाबेन अंबानी या संघांचा समावेश आहे. तर प्लेट गटात बॉम्बे, हिरानंदानी, रहेजा, लोकमान्य टिळक, कस्तुरबा, लीलावती आणि ग्लेन ईगल्स हे रुग्णालयीन संघ आपले कौशल्य पणाला लावतील.

किल्ले बांधणी स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा संपन्न



■ राजगड किल्ल्याची प्रतिकृती प्रथम

■ द्वितीय क्रमांक रायगडच्या प्रतिकृतीचा

| रोहा | प्रतिनिधी |

आमदार अनिकेत तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राष्ट्रवादी युवक काँग्रेस, भुवनेश्वर जि.प.गट तसेच धाटाव व भुवनेश्वर पं.समिती गण अंतर्गत किल्ले बांधणी स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेचे बक्षीस वितरण कार्यक्रम शासकीय विश्रामगृह येथे रविवारी (दि.१५) पार पाडण्यात आला.

किल्ले ही महाराष्ट्राची संपत्ती आहे.ती आपण जपली पाहिजे हा मुख्य हेतू लक्षात घेऊन या स्पर्धेच आयोजन केल होतं. या स्पर्धेत एकूण २४ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.या स्पर्धेला सकारात्मक पाठिंबा मिळाला. प्रथम क्रमांक ३ हजार रुपये, अभी चाळके ग्रुप मालसई (राजगड), द्वितीय क्रमांक २ हजार रुपये, तेजस मोरे ग्रुप तळाघर (रायगड), तृतीय क्रमांक १ हजार रुपये, सोनगाव कट्टा, सोनगाव (लोहगड), व चतुर्थ क्रमांक १ हजार रुपये मावळा ग्रुप भुवनेश्वर (पद्मदुर्ग) तसेच सहभागी स्पर्धेकांना सन्मानचिन्ह व प्रशास्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

किल्ल्यांचे परीक्षण राम महाडिक, विक्रांत बाकाडे, शरद कदम, महेश तुपकर, चेतन मालुसरे व शंतनू रटाटे यांनी केले.कार्यक्रमचे सूत्रसंचालन महेश बामुगडे यांनी केले. अमित मोहिते, महेश तूपकर, मयूर मोंडे यांनी स्पर्धेकांना मार्गदर्शन व पुढील वर्षी अजून आकर्षक किल्ले बांधून आपली परंपरा जपू या, असे आवाहन केले. तसेच आभार प्रदर्शन शंतनू रटाटे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली. पुढील वर्षी अजून मेहनत घेऊन नावीन्य आणू, असे महेश बामुगडे यांनी आश्वासन दिले.

तटकरे पॉलिटेक्निक गोवेचा महाराष्ट्रात तृतीय क्रमांक



| कोलाड | प्रतिनिधी |

श्रीमती. गीता द.तटकरे पॉलिटेक्निक, गोवे कोलाड या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये आयोजित इंटर इंजिनिअरिंग डिप्लोमा स्टुडंट्स स्पोर्ट्स असोसिएशनच्या महाराष्ट्र राज्यस्तरीय स्पोर्ट्स जनरल चॅम्पियनशिपमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून तृतीय क्रमांक पटकावून संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये केलेली उल्लेखनीय कामगिरी, त्यांची मेहनत, जिद्द, चिकाटी तसेच प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि क्रीडा समितीचे नियोजनबद्ध प्रयत्न यांमुळे संस्थेला हे यश प्राप्त झाले आहे.या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेला इन्स्टिट्यूट परफॉर्मन्स थर्ड रँक हा सन्मान प्रदान करण्यात आला.

संस्थेच्या वतीने क्रीडा विभागप्रमुख प्रा. चैतन्य भगत आणि क्रीडा सचिव प्रा.मनीष पाटील यांनी गवर्नमेंट पॉलिटेक्निक,पुणे येथे हा पुरस्कार स्वीकारला.

या यशाबद्दल संस्थेचे विश्वस्त संदीप तटकरे, प्राचार्य विपुल मसाळ, रजिस्ट्रार व वर्चस्वचे सचिव अजित तेलंगे यांनी विद्यार्थी, प्रशिक्षक, क्रीडा समिती आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.संस्थेच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा क्षेत्रातही संस्था सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करत असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

बुद्धिबळ महोत्सवाचा मोहम्मद इम्रान विजेता

| पुणे | प्रतिनिधी |

आर्यन्स बुद्धिबळ अकादमीच्या वतीने स्वर्गीय भारतबाई हलकुडे मेमोरियल एलबीएचएम बुद्धिबळ महोत्सव तसेच स्वर्गीय प्रकाश कुंटे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित अखिल भारतीय खुल्या फिडे बुद्धिबळ स्पर्धेत आंध्रप्रदेशच्या मोहम्मद इम्रानने विजेतेपद पटकावले. नवव्या फेरीअखेर ९ गुणांची कमाई करत त्याने स्पर्धेत आपली आघाडी कायम ठेवली. या स्पर्धेच्या नवव्या आणि अंतिम फेरीत पहिल्या पटावरील लढतीत मोहम्मद इम्रानने तामिळनाडूच्या सुदर्शन बालाजीचा पराभव केला.

राज्यस्तरीय शालेय हॉकी स्पर्धा

मुलांमध्ये पुणे, तर मुलींमध्ये कोल्हापूर अव्वल

| बुलढाणा | प्रतिनिधी |

स्थानिक सहकार विद्या मंदिर येथे सुरू असलेल्या राज्यस्तरीय शालेय हॉकी १४, १७ वर्षांआतील मुले, मुली क्रीडा स्पर्धेत मुलींच्या गटात कोल्हापूर तर मुलांच्या गटात पुणे विभागाने बाजी मारली.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत, जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणा यांचे वतीने, महाराष्ट्र हॉकी व बुलढाणा हॉकी असोसिएशन यांचे तांत्रिक सहकार्याने, तथा बुलढाणा अर्बन क्रेडीट को. ऑप सोसायटी, बुलढाणा यांचे सहकार्याने सहकार विद्यामंदिर, चिखली रोड, बुलढाणा येथे मैदान क्र.१ व २ वर राज्यस्तर शालेय हॉकी क्रीडा स्पर्धाचे आयोजन सुरू आहे.



दरम्यान, शनिवारी दुपारी २ वाजता १४ वर्षाआतील मुले व मुलींच्या वयोगटातील अंतिम निकालात १४ वर्ष मुले या वयोगटात पुणे विभागाने प्रथम क्रमांक प्राप्त केला असून द्वितीय क्रमांक कोल्हापूर विभागाने तर तृतीय क्रमांक मुंबई या विभागाने प्राप्त केला. तसेच मुलींच्या वयोगटात प्रथम क्रमांक कोल्हापूर विभागाने तर पुणे व मुंबई विभागाने अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. प्राविण्य प्राप्त संघातील खेळाडूस प्रमाणपत्र, मेडल्स व संघास ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

यावेळी सहकार विद्यामंदिर बुलढाणा येथे आयोजित कार्यक्रमाला पोलीस उपअधीक्षक रवींद्र राठोड, प्राचार्य अलगर सामी आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य खुल्या बॅडमिंटन स्पर्धा

हर्षित महिमकरची दुहेरी मुकुटाला गवसणी



| मुंबई | प्रतिनिधी |

बॉम्बे जिमखाना आयोजित योनेक्स सनराइज बॉम्बे जिमखाना महाराष्ट्र राज्य खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत ग्रेटर मुंबईच्या हर्षित महिमकरने दुहेरी मुकुट पटकावत शानदार कामगिरी केली. पुरुष एकेरी आणि १९ वर्षांखालील मुलांच्या एकेरीत विजेतेपद मिळवत त्याने स्पर्धेवर आपली छाप पाडली. मुलींच्या १९ वर्षांखालील गटात मुंबई उपनगरच्या स्पृहा जोशीने, तर १७ वर्षांखालील गटात अन्विषा घोरपडेने विजेतेपद मिळवले.

पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात तिसरे मानांकन असलेल्या हर्षितने ठाण्याच्या चौथ्या मानांकित वेद भोईरचा १५-६, १५- ३ असा सरळ दोन गेममध्ये पराभव केला. त्यानंतर १९ वर्षांखालील मुलांच्या एकेरीच्या अंतिम फेरीतही हर्षितने आपले वर्चस्व कायम राखले. अव्वल मानांकित हर्षितने पालघरच्या सहाव्या मानांकित ऋतुराज चिपटला पराभूत करत दुसरे विजेतेपद आपल्या नावावर केले.

मुलींच्या १९ वर्षांखालील एकेरीत मुंबई उपनगरच्या बिगरमानांकित स्पृहा जोशीने शानदार पुनरागमन केले. पहिला गेम गमावल्यानंतरही तिने संयम आणि जिद्द दाखवत ग्रेटर मुंबईच्या अन्विषा घोरपडेचा १२-१५, १५-६, १६-१४ असा पराभव केला. मात्र, अन्विषाने १७ वर्षांखालील मुलींच्या एकेरीत बाजी मारली. अंतिम सामन्यात तिने इमान मोटरवाला हिचा १५-९, १५-७ असा पराभव केला.

इतर गटांत १७ वर्षांखालील मुलांच्या एकेरीत अक्षत रायसुराणा, मुलींच्या दुहेरीत खुशी पहावा आणि युविका बजाज, मिश्र दुहेरीत सोहम फाटक आणि सिया सिंग यांनी विजेतेपद पटकावले. मुलांच्या १९ वर्षांखालील दुहेरीत निधीश मोरे आणि यश ढेंबरे, तर १७ वर्षांखालील दुहेरीत अक्षत रायसुराणा आणि विक्रांत नेगी यांनी बाजी मारली. पुरुष दुहेरीत विप्लव कुवळे आणि विराज कुवळे यांनी विजेतेपद मिळवले.

कर्णधार सूर्यकुमारची वादळी खेळी



| कोलकाता | वृत्तसंस्था |

सूर्यकुमार यादव याने आपला तडाखा कायम ठेवत सलग दुसऱ्या सामन्यात वादळी खेळी केली. सूर्यकुमारने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत गुजरात विरुद्ध तोडफोड बॅटिंग करत सलग दुसरं अर्धशतक ठोकलं. सूर्याने केलेल्या या खेळीच्या जोरावर मुंबईने गुजरातवर दणदणीत विजय मिळवला.

गुजरातने मुंबईसमोर १९८ धावांचं आव्हान ठेवलं होतं. सूर्याच्या ८२ धावांच्या खेळीमुळे मुंबईने हे आव्हान २६ बॉलआधी ५ विकेट्स राखून पूर्ण केलं. मुंबईने १५.४ ओव्हरमध्ये ५ विकेट्स गमावून २०१ धावा केल्या. मुंबईचा हा या स्पर्धेतील सलग दुसरा विजय ठरला. मुंबईने सलामीच्या सामन्यात हैदराबादला पराभूत केलं होतं.

मुंबईची विजयी धावांचा पाठलाग करताना निराशाजनक सुरुवात राहिली. गुजरातने मुंबईला पहिल्या २ ओव्हरमध्ये २ झटके दिले. अंगकृष रघुवंशी याच्या रुपात मुंबईने पहिली विकेट गमावली. अंगकृषने ४ धावा केल्या. तसंच हैदराबाद विरुद्ध अर्धशतक करणारा मुशीर खान या सामन्यात अपयशी ठरला. मुशीर १४ धावांवर बाद झाला. त्यामुळे मुंबईची २ आऊट २५ अशी स्थिती झाली. मुशीरनंतर सूर्यकुमार यादव चौथ्या स्थानी आला. सूर्या आणि हार्दिक या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी केली.

सर्फराझची चाबूक खेळी

सूर्या आऊट झाल्यानंतरही मुंबईला विजयासाठी आणखी ६४ धावांची गरज होती. सूर्यानंतर सर्फराज खान याने टॉप गिअरमध्ये बॅटिंग केली. सर्फराज आणि शिवम दुबे या दोघांनी पाचव्या विकेटसाठी २० बॉलमध्ये ३९ रन्स जोडल्या. शिवम ११ धावांवर बाद झाला. त्यानंतर सर्फराज आणि अथर्व अंकोलेकर या दोघांनी उर्वरित धावा करुन मुंबईला विजयी केलं. सर्फराजने फक्त १७ बॉलमध्ये ५ फोर आणि २ सिक्सच्या मदतीने नॉट आऊट ४० रन्स केल्या. तर अथर्वने नाबाद १५ धावा केल्या. गुजरातसाठी रवी बिश्नोई याने सर्वाधिक २ विकेट्स मिळवल्या.

लाठी-काठी व तलवारबाजीचे थरारक प्रात्यक्षिक | अक्षय कुमार आणि भूमी पेडणेकर यांच्या समवेत बसण्याचा मान

श्राव्या शिरशिवकरची शिवगर्जना!



| महाड | प्रतिनिधी |

अहमदाबाद येथील वीर सावरकर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये आयोजित १८व्या अक्षय कुमार इंटरनॅशनल कूडो स्पर्धेत महाडच्या शिवकन्या श्राव्या शिरशिवकर हिने आपल्या मर्दानी खेळांच्या दमदार सादरीकरणातून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. लाठी-काठी आणि तलवारबाजीचे कौशल्यपूर्ण प्रात्यक्षिक सादर करत हातात तलवार-ढाल घेऊन केलेल्या शिवगर्जनेने तिने मराठमोळ्या शौर्यपरंपरेचा परिचय करून दिला.

तिच्या सादरीकरणातून शौर्य, आत्मविश्वास आणि शिवकालीन मर्दानी परंपरेची झलक पाहायला मिळाली. शौर्य गुरुकुलचे मंगेश गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली श्राव्या मर्दानी खेळांचे प्रशिक्षण घेत आहे. सातत्यपूर्ण सराव आणि मेहनतीच्या जोरावर तिने आत्मसात केलेल्या कौशल्याचे प्रदर्शन आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या भव्य मंचावर करण्याची संधी तिला मिळाली.

या स्पर्धेसाठी श्राव्याला विशेष निमंत्रण देण्यात आले होते. तिला मंचावर आमंत्रित करून अभिनेता अक्षय कुमार आणि अभिनेत्री भूमी पेडणेकर यांच्या समवेत बसण्याचा बहुमान देण्यात आला.

श्राव्याच्या या यशस्वी वाटचालीत तिचे आई-वडील सौरभ शिरशिवकर आणि दिशा शिरशिवकर यांचाही मोलाचा सहभाग आहे. मुलीच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे, तिच्या प्रशिक्षणासाठी सातत्याने पाठबळ देणे आणि प्रत्येक टप्प्यावर तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, यामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. आई-वडिलांचे प्रोत्साहन आणि प्रशिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच श्राव्याला आपले कौशल्य आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर सादर करण्याची संधी मिळाली आहे. या स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्याला अभिनेता अक्षय कुमार, अभिनेत्री भूमी पेडणेकर आणि गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी उपस्थित होते. तसेच महाराणा ऑफ मेवाड चॅरिटेबल फाउंडेशनचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त लक्ष्याराज सिंह मेवाड आणि त्यांच्या पत्नी निवृत्ती कुमारी मेवाड यांचीही उपस्थिती होती.

१५ ते १८ नोव्हेंबरदरम्यान आयोजित या स्पर्धेत देशभरातील खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. लाठी-काठी, तलवारबाजी आणि शिवगर्जनेच्या माध्यमातून आपली कला सादर करणाऱ्या श्राव्या शिरशिवकर हिचे महाडमध्ये कौतुक होत आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)